# आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प
# सामाजिक परिणाम निर्धारण अहवाल: २०१९

ज्ञानदेव तळुले
विजय ककडे
महादेव देशमुख

**अर्थशास्त्र अधिविभाग**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६००४

**जानेवारी २०२०**

## Study Team


| | |
|---|---|
| **Vijay Kakade** | **SIA Coordinator** |
| **Dnyandev Talule** | **Principal Author and Report Editing** |
| **Mahadev Deshmukh** | **Field Coordination** |
| **Subhash Kombade** | **FGDs and Field Visits** |
| **Pravin Babar** | **Data Entry, Tabulation and Staistical Processing** |
| **Vittal Thabbe** | **Field Survey and Project Office** |
| **Vilas Mankar (GIPE)** | **Report Setup and Printing** |


**Disclaimer:**

*The entire information and data base that the present report carries are strictly based on the field investigation, FGDs and the field observations of the study team. Neither the information in any form in the present report carries any personal impression nor does it carry any biased mention by any of the member of the study team.*

*University or University Staff shall not be responsible to mishap or damage caused to manpower or property while further applying the results of the consultancy project.*

# आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प
# सामाजिक परिणाम निर्धारण अहवाल: २०१९

ज्ञानदेव तळुले
विजय ककडे
महादेव देशमुख

अर्थशास्त्र अधिविभाग
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६००४

जानेवारी २०२०

प्रा. (डॉ.) देवानंद बी. शिंदे
एम.एस्सी., पीएच्.डी.
कुलगुरू
Prof. (Dr.) Devanand B. Shinde
M.Sc.,Ph.D.
Vice-Chancellor

Estd :1962
NAAC 'A' Grade
शिवाजी विद्यापीठ,
विद्यानगर, कोल्हापूर – ४१६ ००४.
SHIVAJI UNIVERSITY,
Vidyanagar, Kolhapur - 416 004.

दूरध्वनी : कार्यालय – (०२३१) २६०९०६०
निवास – (०२३१) २६०९०५३
फॅक्स : ००९१-२३१-२६९१५३३
Tel. : Office - (0231) 2609060
Resi. - (0231) 2609053
Fax : 0091-231-2691533
E-mail : vcoffice@unishivaji.ac.in
Web : www.unishivaji.ac.in

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाचा समावेश शासनाच्या विविध कल्याणकारी व आर्थिक योजनांचे मूल्यांकन करणारी संस्था म्हणून महाराष्ट्र शासनाने आपल्या नामिकेत केला ही आनंदाची व अभिमानाची तसेच जबाबदारीची बाब ठरते. या कामी अर्थशास्त्र विभागाने अथक परिश्रम घेऊन प्रस्तुत सामाजिक परिणाम निर्धारण अहवाल तयार केला आहे. शासन सामाजिक व आर्थिक विकासासाठी जे विविध प्रकल्प राबविते त्यातून काही लाभार्थी घटक व काही त्याचा भार सहन करणारे प्रकल्पग्रस्त होतात. ज्यांना लाभ होतो त्यांनी ज्यांचे नुकसान होते त्यांना पुरेशी नुकसान भरपाई दिली तर सामाजिक कल्याणात वाढ होते. परंतु प्रत्यक्ष अनुभव असे दाखवतो की विविध सिंचन प्रकल्प, रस्ते बांधणी याबाबत प्रकल्पग्रस्तांकडे पुरेशा गांर्भीयाने व तातडीने लक्ष न दिल्याने प्रकल्प रेंगाळून खर्च जसे वाढले तसेच त्याची आर्थिक व मानसिक, सामाजिक किंमत प्रकल्पग्रस्तांनी दिली. या प्रश्नांची सोडवणूक अधिक प्रभावी व समाधानकारक होणेसाठी 2014 मध्ये नविन "भुमी अधिग्रहण, पुनर्वसन आणि पुनर्स्थापना कायदा" करण्यात आला. त्यामध्ये प्रकल्पांचा सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यास करण्याची महत्वाची अट घालण्यात आली. अशा सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यासातून तटस्थ परंतु व्यावहारिक उपाययोजना सुचविण्यासाठी त्या प्रकल्पांचे सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक परिणाम तपासणे महत्वाचे ठरतात. साकलिक अभ्यास, करून "आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्पाचा सामाजीक परिणाम निर्धारण अहवाल" अर्थशास्त्र विभागाचे प्राध्यापक व प्रकल्प समन्वयक विजय ककडे, सहसमन्वयक ज्ञानदेव तळुले व एम. एस. देशमुख यांनी तयार केलेला असून हा अहवाल शासनास धोरण निश्चितीसाठी महत्वाचे साधन ठरते. शिवाजी विद्यापीठाचे असे सामाजिक योगदान उत्तरोत्तर वाढत जाईल याची मला खात्री वाटते व असे मुल्यांकनाचे कार्य सतत विस्तारत राहावे अशी शुभेच्छा व्यक्त करून संपूर्ण अभ्यासगटाचे अभिनंदन करतो. शासनाने व्यक्त केलेला विश्वास ही महत्वाची जबाबदारी शिवाजी विद्यापीठ पूर्ण क्षमतेने पार पाडेल याची खात्री वाटते.

15 JAN 2020

(देवानंद शिंदे)
कुलगुरू

# महाराष्ट्र शासनाच्या योजनांच्या मूल्यमापनासाठी
# सल्लागार समिती

| अ.क्र. | नांव | पदनाम |
|---|---|---|
| १ | प्रा. डॉ. देवानंद शिंदे, मा. कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | अध्यक्ष |
| २ | डॉ. विलास डी. नांदवडेकर, मा. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | सचिव |
| ३ | प्रा. डॉ. व्ही. बी. ककडे, अर्थशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | मुख्य समन्वयक |
| ४ | प्रा. डॉ. एम. एस. देशमुख, अर्थशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | सह. समन्वयक |
| ५ | डॉ. जी. एस. कुलकर्णी, उपकुलसचिव, अभियांत्रिकी विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | सह. समन्वयक |
| ६ | श्री. ए. बी. चौगुले, वित्त व लेखा अधिकारी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | वित्त सल्लागार |

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | तपशील |
|---|---|
| कार्यकारी सारांश (Executive Summary) | |
| प्राक्कथन | |
| औपचारिक वास्तव | |
| सामाजिक परिणाम निर्धारण प्रक्रिया | |
| परिणामे | |
| सारांशात | |
| प्रकरण: १ | जलसिंचन धोरण व भूसंपादनविषयक विवेचन |
| प्रास्ताविक | |
| १.१ | जलसंपदा व राज्य सरकार |
| १.२ | प्रकल्पपूर्तीस विलंब व व्ययवृध्दीची समस्या |
| १.३ | न्याय्य विस्थापन आणि पुनर्वसनाच्या दिशेने |
| प्रकरण: २ | आर्थिक उदारीकरण व भूसंपादनविषयक विवेचन |
| प्रास्ताविक | |
| २.१ | महामार्ग प्रकल्प कामी प्रसंगी अतिरिक्त जमीन अधिग्रहण |
| २.२ | सरकारकरीता धडा |
| २.३ | न्याय्य विस्थापन आणि पुनर्वसनाच्या दिशेने |
| प्रकरण: ३ | अभ्यास माहिती संकलन व अभ्यास कार्यपद्धती |
| प्राथमिक व द्वितीय माहिती संकलन पार्श्वभूमी | |
| ३.१ | माहिती संकलनातील प्रमुख टप्पे |
| ३.१.१ | माहिती संकलन साधनांची निर्मिती |
| सारणी ३.१ | माहिती संकलन साधनांचे विवेचन |
| ३.१.२ | कौटुंबिक मुलाखती |
| ३.१.३ | सघन समूह चर्चा |
| ३.१.४ | प्रतिगामी व अवगामी भागधारकांच्या सखोल मुलाखती |

| | |
|---|---|
| **सारणी ३.२** | आंबेओहोळ सामाजिक परिणाम निर्धारण प्राथमिक माहिती संकलन वेळापत्रक |
| ३.१.५ | द्वितीय माहिती संकलन |
| ३.२ | अभ्यासाची उद्दिष्टे |
| ३.३ | अभ्यास पद्धती |
| ३.४ | अभ्यासाची पूर्वपीठीका |
| ३.५ | सामाजिक परिणाम अहवाल साधने आणि पद्धती |
| ३.५.१ | सामाजिक परिणाम निर्धारण प्रक्रिया |
| ३.६ | सापनि अभ्यास पद्धतीतील टप्पे |
| ३.७ | प्रकल्पप्रभाव क्षेत्राची पार्श्वभूमी |
| ३.७.१ | बहुविधस्त्रोत माहिती संकलन |
| ३.७.२ | प्रकल्पबाधित, प्रतिगामी-अवगामी भागधारक आणि नियंत्रण समूह संवाद |
| ३.७.३ | प्रश्नावली, प्राथमिक माहिती संकलन व नमुना निवड |
| ३.७.४ | नमुना निवड |
| ३.७.५ | सघन समूह चर्चा |
| **प्रकरण: ४** | **आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्पाची व्यवहार्यत** |
| **प्रास्ताविक** | |
| **सारणी ४.१** | आंबेओहोळ प्रकल्पाचाी पार्श्वभूमी |
| ४.१ | भूसंपादन व पुनर्वसनाची सद्यस्थिती |
| **सारणी ४.२** | प्रकल्पाचे बुडित क्षेत्र व भूसंपादन |
| ४.२ | प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन |
| **सारणी ४.३** | प्रकल्प लाभक्षेत्रातून उपलब्ध पर्यायी जमिन क्षेत्र (१.६१ हे. स्लॅब प्रमाणे) |
| ४.३ | पुनर्वसनाचा प्राधान्यक्रम |
| **प्रथम प्राधान्य टप्पा १: धरण पाया, खाणक्षेत्र व सांडवा** | |
| **द्वितीय प्राधान्य टप्पा २: बुडित क्षेत्र** | |
| **सारणी ४.४** | प्रकल्पबाधित खातेदार व त्यांना देय क्षेत्राचा गोषवारा |

| | |
|---|---|
| ४.४ | प्रकल्पबाधित खातेदारांना देय भूखंड व पुनर्वसित गावठाणांची सद्यस्थिती |
| **सारणी ४.५** | प्रकल्पबाधित खातेदारांना देय भूखंड व पुनर्वसित गावठाणांची सद्यस्थिती |
| ४.५ | प्रकल्पबाधित खातेदारांना सुधारित पुनर्वसन आराखड्याप्रमाणे देय भूखंड |
| **सारणी ४.६** | सुधारित पुनर्वसन आराखड्याप्रमाणे प्रकल्पबाधित खातेदारांना देय भूखंड |
| ४.६ | सानुग्रह अनुदान मागणी प्रस्ताव |
| ४.७ | निधी |
| ४.८ | पुनर्वसन विषयक अडचणी |
| ४.९ | आंबेओहोळ प्रकल्पाचे लाभ-खर्च गुणोत्तर |
| **सारणी ४.७** | आंबेओहोळ प्रकल्पाचे लाभ-खर्च गुणोत्तर |
| ४.१० | आंबेओहोळ प्रकल्पाचा एकूण नफा |
| **अ** | **सिंचित स्थितीतील एकूण नफा** |
| **सारणी ४.८** | आंबेओहोळ प्रकल्पाचा सिंचित स्थितीतील एकूण नफा (१००० हेक्टर) |
| ४.११ | पिकांचा आकृतीबंध |
| **सारणी ४.९** | विद्यमान पिकांचा आकृतीबंध |
| ४.१२ | प्रकल्पाच्या कमांड क्षेत्रातील पिकांसाठी पाणी महसूली दर व सुधार पट्टीची वसुली |
| **सारणी ४.१०** | सिंचन क्षेत्र/ कमांड क्षेत्रासाठी पाणी महसूली दर व सुधार पट्टीची वसुली |
| ४.१३ | प्रकल्पाचा एकूण खर्च |
| **सारणी ४.११** | प्रकल्पाचा एकूण खर्च |
| **प्रकरण: ५** | **आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्पाचे अवलोकन** |
| **प्रास्ताविक** | |
| ५.१ | प्रशासकीय मान्यतेचा तपशील |
| ५.२ | प्रकल्पाचा सर्वसाधारण आराखडा |

| | |
|---|---|
| ५.३ | प्रकल्पाचे प्रमुख घटक |
| ५.४ | पाणी वापर |
| ५.५ | सिंचन प्रकार |
| ५.६ | कालवा निहाय/जिल्हा निहाय क्षेत्र |
| ५.७ | प्रकल्पाची ठळक वैशिष्ट्ये |
| ५.८ | प्रचलित नियमानुसार आवश्यक मान्यता व त्याबाबतची सद्य:स्थिती |
| ५.८.१ | पाणी उपलब्धता |
| ५.५.२ | कृषी विभागाने मंजूर केलेली पीक रचना |
| ५.८.३ | महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण मान्यता, तसेच मान्यतेच्या अटीची असल्यास पूर्तता |
| ५.८.४ | पर्यावरण मान्यता |
| ५.८.५ | वन विभागाची मान्यता |
| ५.८.६ | केंद्रीय जल आयोगाची मान्यता |
| **प्रकरण: ६** | **आंबेओहोळ प्रकल्प भूमि अधिग्रहण व पुनर्वसनविषयक अवलोकन** |
| ६.१ | पुनर्वसन व भूसंपादन विषयक |
| ६.२ | भूसंपादन सद्य:स्थिती |
| ६.३ | प्रकल्पग्रस्तांची सर्वसाधारण माहिती |
| ६.४ | पर्यायी जमिन वाटप |
| ६.५ | स्वेच्छा पुनर्वसन |
| ६.६ | शिल्लक पात्र प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिन वाटपाचे नियोजन |
| ६.७ | भूखंड वाटप |
| ६.८ | नागरी सुविधांच्या कामांची सद्य:स्थिती |
| ६.९ | प्रकल्प घटकांची बांधकाम सद्य:स्थिती |
| ६.१० | निर्मित पाणीसाठा, सिंचन क्षमता व तिचा प्रत्यक्ष वापर |
| ६.११ | उर्वरित कामाचा घटकनिहाय भौतिक व आर्थिक तपशील |
| ६.१२ | उर्वरीत कामांची अंदाजपत्रके |

| | |
|---|---|
| **प्रकरण: ७** | **आंबेओहोळ सिंचन प्रकल्पबाधित गावांची पार्श्वभूमी** |
| **प्रास्ताविक** | |
| **सारणी ७.१** | आंबेओहोळ प्रकल्पबाधितांच्या गावांची जनगणनाविषयक आकडेवारी |
| **सारणी ७.२** | आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्पबाधितांच्या गावांची मूलभूत पायाभूत सुविधांविषयक स्थिती |
| **सारणी ७.३** | आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्पबाधितांच्या गावातील शिक्षणविषयक सुविधांविषयीची स्थिती |
| **सारणी ७.४** | आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्पबाधितांच्या गावातील आरोग्य सुविधांविषयीची स्थिती |
| **सारणी ७.५** | आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्पबाधित शेतकऱ्यांच्या गावांची भूसर्वेक्षणविषयक स्थिती |
| **सारणी ७.६** | आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्पबाधित शेतकऱ्यांच्या गावांची एकंदरीत पिकपद्धती |
| **प्रकरण: ८** | **आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्पबाधित शेतकरी कुटुंबांचे सर्वेक्षण** |
| **प्रास्ताविक** | |
| **प्राथमिक आकडेवारीचे विश्लेषण** | |
| **सारणी ८.१** | आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्पबाधित शेतकरी कुटुंबे, सर्वेक्षणकामी नमुना प्रमाण आणि गावनिहाय प्रकल्पबाधित शेतजमिनीचे विवरण |
| **सारणी ८.२** | आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित कुटुंबांचे जनगणना विवेचन |
| **सारणी ८.३** | आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित कुटुंब सदस्यांचा सार्वजनिक जीवनातील सहभाग |
| **सारणी ८.४** | आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित कुटुंबाचे शिधापत्रिका उपलब्धतेनुसार विवेचन |
| **सारणी ८.५** | आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित कुटुंबाकडील शिधापत्रिकेनुसार विवेचन |
| **सारणी ८.६** | आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित कुटुंबाचे घर मालकीनुसार विवेचन |

| | |
|---|---|
| **सारणी ८.७** | आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित कुटुंबाचे घराच्या छतानुसार विवेचन |
| **सारणी ८.८** | आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित कुटुंबाच्या घराच्या आकारमानानुसार विवेचन |
| **सारणी ८.९** | आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित कुटुंबातील नोकरीविषयक विवेचन |
| **सारणी ८.१०** | आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित कुटुंब सदस्यांच्या नोकरीचे स्वरूप |
| **सारणी ८.११** | आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित कुटुंबातील सदस्यांचे नोकरी-व्यवसाय निमित्ताने स्थलांतर |
| **सारणी ८.१२** | आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित कुटुंबाच्या राहत्या घराच्या जमीन तुकड्याचे आकारमान |
| **सारणी ८.१३** | आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित कुटुंबाकडील टिकावू उपभोग्य वस्तूमालकी विवरण |
| **सारणी ८.१४** | आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित कुटुंबाकडील कृषि औजारे मालकी विवरण |
| **सारणी ८.१५** | आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित कुटुंबाची जमीन मालकी विवरण |
| **सारणी ८.१६** | आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित क्षेत्रातील विविध प्रकारच्या जमिनींची प्रचलित सरासरी बाजार किंमत |
| **सारणी ८.१७** | आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित कुटुंबाची पीकपद्धती व पीकवार लागवड प्रमाण |
| **सारणी ८.१८** | आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित शेतकऱ्यांच्या फळबाग लागवडीसंबंधी विवेचन |
| **सारणी ८.१९** | आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित शेतकऱ्यांच्या फळबाग व वनवृक्ष मालकीचे विवरण |
| **सारणी ८.२०** | आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित शेतकऱ्यांकडील पाणीपुरवठा सुविधांविषयीचे विवेचन |
| **सारणी ८.२१** | आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित क्षेत्रातील सरासरी भूजलपातळी |

| | |
|---|---|
| **सारणी ८.२२** | आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित शेतकऱ्यांकडील पाईपलाईन उपलब्धतेविषयीचे विवेचन |
| **सारणी ८.२३** | आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित शेतकऱ्यांकडील पाळीव प्राणी मालकीविषयक विवेचन |
| **सारणी ८.२४** | आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित शेतकरी कुटुंबांचे बिगर कृषि जोड उत्पन्नाचे मार्ग |
| **सारणी ८.२५** | आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित शेतकरी कुटुंबाचे बिगर कृषि उत्पन्न व्यवसाय |
| **सारणी ८.२६** | आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित कुटुंबाचे वित्तीय सेवा वापराविषयीचे विवेचन |
| **सारणी ८.२७** | आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित कुटुंबाचे कर्जप्रकार, कर्ज रक्कम, परतफेड व थकबाकीविषयी विवेचन |
| **सारणी ८.२८** | आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना प्रकल्पबाधित जमिनीच्या मोबदल्यात मिळणाऱ्या किंमत समाधानाबाबतचे विवेचन |
| **सारणी ८.२९** | आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित शेतकऱ्यांनी सिंचन प्रकल्पास केलेल्या विरोधाच्या प्रकारान्वये विवेचन |
| **सारणी ८.३०** | आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित शेतकऱ्यांच्या शासनाकडून प्रमुख मागण्या |
| **सारणी ८.३१** | आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित शेतकऱ्यांचे प्रकल्पाच्या फायद्याविषयी मतप्रदर्शन |
| **सारणी ८.३२** | आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित शेतकऱ्यांचे प्रकल्पामुळे शक्य लाभांविषयी मतप्रदर्शन |
| **सारणी ८.३३** | आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित शेतकऱ्यांचे शेती व्यवसाय न करण्याविषयीची कारणमिमांसा |
| **सारणी ८.३४** | आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित शेतकरी प्रकल्पबाधित शेतीच्या मोबदल्यातून नवीन शेती घेवू इच्छिण्याची कारणे |
| **सारणी ८.३५** | आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना प्रकल्पबाधित शेतजमिनीच्या मोबदल्यात शक्य जमीन खरेदीविषयक अपेक्षांचे विवेचन |

| | |
|---|---|
| **सारणी ८.३६** | आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित शेतकऱ्यांचे प्रकल्प कामाविषयी मतप्रदर्शन |
| **सारणी ८.३७** | आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित शेतकऱ्यांचे प्रकल्पोपरांत रोजगार संधीविषयी मतप्रदर्शन |
| **सारणी ८.३८** | आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधितांना प्रकल्प पूर्णत्वानंतर अपेक्षित परिणाम |
| **सारणी ८.३९** | आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित शेतकऱ्यांचे प्रकल्प कामावर रोजंदारीस जाण्याविषयी मतप्रदर्शन |
| **प्रकरण: ९** | **गडहिंग्लज तालुक्यातील चित्री मध्यम सिंचन प्रकल्पलाभधारक तथा आंबेओहोळ पुनर्वसनकामी प्रकल्पबाधित शेतकरी कुटुंबांचे सर्वेक्षण** |
| **प्रास्ताविक** | |
| **सारणी ९.१** | आंबेओहोळ मध्यम प्रकल्पाकरीता चित्री लाभक्षेत्र संपादन |
| **सारांशात** | |
| **प्रकरण: १०** | **निष्कर्ष व शिफारशी** |
| **प्रकरण: ११** | **ताजा कलम (Post Script)** |
| **परिणामे** | |
| **सारांशात** | |
| **संदर्भ सूची** | |
| **परिशिष्ट: १** | आंबेओहोळ धरण प्रकल्प बाधीत कुटुंबांशी सघन समूह चर्चा फोटो |
| **परिशिष्ट: २** | आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यास<br>धरण प्रकल्प बाधीत कुटुंब प्रश्नावली |
| **परिशिष्ट: ३** | आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यास<br>लाभधारक-प्रकल्प पुनर्वसनार्थ भूमि अधिग्रहण कुटुंब प्रश्नावली |
| **परिशिष्ट: ४** | आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यास<br>प्रकल्पबाधीत गावाच्या सामाजिक परिणामांचे मूल्यांकन |

| | |
|---|---|
| | गाव प्रश्नावली |
| **परिशिष्ट: ५** | आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यास<br>प्रकल्पबाधीत गावाच्या सामाजिक परिणामांचे मूल्यांकन<br>लक्षीत गट चर्चेसाठी मुद्दे |

## कार्यकारी सारांश (Executive Summary):

### I) प्राक्कथन:

हिरण्यकेशी आंबेओहोळ मध्यम प्रकल्प ता. आजरा, जि. कोल्हापूर अंतर्गत हिरण्यकेशी नदीखोऱ्यातील आंबेओहोळ या नाल्यावर आर्दाळ या गावानजिक मातीचे धरण बांधण्यात येत आहे. धरणाची एकूण साठवण क्षमता ३५.११ द.ल.घ.मी. १.२४ द.घ.फू. इतकी आहे. प्रकल्पांतर्गत एकूण ८ को. प. बंधारे प्रस्ताविक आहेत. त्यामधून खाजगी उपसा सिंचनाद्वारे आजरा तालुक्यातील ४५० हे. व गडहिंग्लज तालुकयातील २६१५ हे. अशा प्रकारे एकूण ३०६५ हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे. तसेच जलाशयावरील खाजगी उपसांद्वारे आजरा तालुक्यातील ८६० हे. क्षेत्रास सिंचनलाभ देणे नियोजित आहे. अशा प्रकारे प्रकल्पाद्वारे एकूण ३९२५ हे. क्षेत्रास सिंचनलाभ प्रस्तावित आहे.

आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प हा आजरा तालुक्यातील हिरण्यकेशी नदीखोऱ्यातील मौजे (उत्तूर, होन्याळी, करपेवाडी, वडकशिवणे, महागोंड, हालेवाडी व) आर्दाळ गावानजिक बांधणे प्रस्तावित असून ऑक्टोबर २००० पासून अद्यापपर्यंत प्रलंबित आहे. प्रकल्पाच्या दीर्घकाळ प्रलंबनामुळे एकूण प्रकल्पव्ययात प्रचंड वृद्धी झाल्याने अंदाजीत प्रकल्पव्ययाची रक्कम रूपये २३० कोटी पेक्षाही अधिक झाली आहे. प्रस्तुत प्रकल्पाचे एकूण बुडीत क्षेत्र ८६८ हेक्टर तर सिंचन क्षमता ३९२५ हेक्टर इतकी असून गडहिंग्लज व आजर अशा एकूण २ तालुकयातील गावांचा प्रस्तावित लाभक्षेत्रात समावेश होणार आहे. प्रकल्प दीर्घकाळ प्रलंबित असण्याची प्रमुख कारणे प्रकल्पग्रस्तांचे उत्पादक व निवासी पुनर्वसन व पर्यायी शेतजमीनी आणि इतर बुडीत मालमत्तांच्या मोबदल्याशी निगडीत आहेत. अशा कारणांमुळे प्रकल्पग्रस्तांचे जीवनमान व उदरनिर्वाहाचे प्रश्न निर्माण झाल्यामुळे मौजे पारपोली, पारपोली गावठाण व मौजे उत्तूर, होन्याळी, करपेवाडी, वडकशिवणे, महागोंड, हालेवाडी व आर्दाळ येथील प्रकल्पबाधीतांचा प्रस्तुत प्रकल्पास

विरोध आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकल्पाच्या प्रलंबनाच्या कारणांचा मागोवा घेवून उभायपक्षी (प्रकल्पबाधीत व राज्य सरकार) मान्य होवू शकेल असा अभ्यासपूर्ण सापनि (Social Impact Analysis) अहवाल तयार करण्याचे काम शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागामार्फत पूर्ण करण्यात आले आहे.

प्रस्तुत अहवाल प्रामुख्याने प्राथमिक माहितीवर निर्धारित असून याकामी जनगणना पद्धतीचा अवलंब करून प्रकल्पबाधीत मौजे उत्तूर , होन्याळी, करपेवाडी, वडकशिवणे, महागोंड, हालेवाडी व आर्दाळ येथील शेतकरी कुटुंबांना प्रत्यक्ष भेटून प्राथमिक माहितीचे संकलन केले असल्याने प्रस्तुत सापनि अहवाल सत्यतेच्या निकषांवर पात्र ठरू शकतो अशाप्रकारे तयार करण्याचा प्रयत्न केला आहे.

**II) औपचारिक वास्तव:**

- प्रस्तुत सामाजिक निर्धारण अहवालाकरीता गुणवत्तापूर्ण सांख्यिकीय माहिती जमा करून तिचे पृथ:करण व विश्लेषण करून तथ्य समोर आणणे अत्यंत आवश्यक होते. याकामी प्रामुख्याने प्राथमिक व द्वितीय माहिती स्त्रोतांचा वापर करून अचूक व तुलनाक्षम आकडेवारी संकलित केली आहे. प्राथमिक माहिती संकलनाकरीता पूर्वनियोजित प्रश्नावलीच्या माध्यमातून आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्पबाधीत एकूण ७ गावांमधील प्रकल्पबाधीतांच्या कुटुंबांना प्रत्यक्ष भेटी देऊन माहिती संकलन केले आहे. ही सर्व गावे आजरा तालुक्यात येतात. याव्यतिरिक्त गडहिंग्लज तालुक्यातील प्रकल्प लाभधारक तथा प्रकल्पबाधीत शेतकरी की, ज्यांची शेतजमिन कमाल भूमिधारण कायद्यातील तरतुदीनुसार संपादित करून आजरा तालुक्यातील प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांना देऊ केली आहे. अशा कुटुंबाकरीता एक वेगळी प्रश्नावली तयार करून त्यांचे सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षणाचे कारण असे होते की, हे बहुतांश प्रकल्प लाभधारक तथा प्रकल्पबाधीत शेतकरी त्यांच्या जमिन अधिग्रहण विरोधात न्यायालयात गेले असल्याने आंबेओहोळ प्रकल्पाचे कृषी पुनर्वसन रखडले आहे. आंबेओहोळ

प्रकल्पबाधीत व प्रकल्प लाभधारक तथा प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांकडून प्राथमिक माहिती संकलन करताना पूर्वनियोजित प्रश्नावली व्यतिरिक्त पूर्वनियोजित बिंदूनुसार विशेष समूह चर्चा दोन्ही प्रकल्पबाधीत कुटुंबांसोबत चर्चा व सखोल मुलाखतींचे तंत्र अवलंबिण्यात आले.

- प्राथमिक माहिती संकलनात प्रामुख्याने प्रकल्पबाधीत कुटुंबे, प्रकल्प लाभधारक तथा बाधीत कुटुंबे प्रकल्पबाधीत गावांचे पायाभूत सर्वेक्षण व विशेष समूह चर्चा इ. बाबींचा समावेश आहे. याव्यतिरिक्त सिंचन विभागातील प्रशासकीय अधिकारी प्रकल्पबाधीत कुटुंबे तसेच बाधीत तथा लाभार्थी कुटुंबाबरोबर विशेष समूह चर्चा घडवून आणल्या. या प्रत्येक घटकाकरीता आम्ही पूर्वनियोजित प्रश्नावली व चर्चेकरीता पूर्वनियोजित बिंदूंचा आधार घेतला होता. कारण असे करणे संकलित आकडेवारीच्या गुणवत्तेकरीता व त्यातील दोष निर्मूलनाकरीता अत्यावश्यक होते. या सर्व बाबी पार पाडल्यानंतर उपरोल्लेखित सर्व प्रश्नावली व पूर्वनियोजित बिंदूंची प्रत्यक्ष गावांना भेटी देऊन पूर्वपाहणी केली व त्या पाहणीद्वारा या सर्व माहिती संकलन साधनात आवश्यक ते बदल व सुधारणा घडवून आणल्या.

- आजरा तालुक्यातील आंबेओहोळ प्रकल्पबाधीत अनुक्रमे उत्तूर , होन्याळी, करपेवाडी, वडकशिवणे, महागोंड, हालेवाडी व आर्दाळ या सात गावातील प्रकल्पबाधीत शेतकरी तसेच गडहिंग्लज तालुक्यातील प्रकल्प लाभधारक तथा प्रकल्पबाधीत कुटुंबांना प्रत्यक्ष भेटी देऊन दोन वेगवेगळ्या पूर्वनियोजित प्रश्नावलींच्या सहाय्याने मुलाखती घेऊन प्राथमिक माहितीचे संकलन करण्यात आले.

- उपरोल्लेखित व्यतिरिक्त आंबेओहोळ प्रकल्पबाधीत व चित्री प्रकल्प लाभधारक तथा प्रकल्पबाधीत कुटुंबांबरोबर पूर्वनिर्धारित बिंदू तथा प्रश्नावलीच्या सहाय्याने विशेष समूह चर्चा आयोजित केल्या होत्या. अशा समूह चर्चामध्ये प्रकल्पबाधीत

तसेच लाभधारक तथा बाधीत कुटुंबांव्यतिरिक्त आजरा व गडहिंग्लज तालुक्यामधील संबंधित गावातील सरपंच, ज्येष्ठ नागरिक, ज्ञानी व्यक्ती, ग्रामपंचायत सदस्य इ. चा समावेश या समूह चर्चांमध्ये जाणीवपूर्वकपणे करण्यात आला होता.

- प्राथमिक माहिती संकलनातील हा तिसरा महत्त्वाचा टप्पा आहे. यात प्रामुख्याने सिंचन विभागातील अधिकारी व कर्मचारी, प्रकल्पबाधीत कुटुंबे, प्रकल्प लाभधारक तथा बाधीत कुटुंबे, ग्रामपंचायत सदस्य तथा इतर अनुभवी व्यक्तींचा समावेश करण्यात आला होता.

- द्वितीय माहिती संकलनात प्रामुख्याने आंबेओहोळ सिंचन प्रकल्पासंबंधी कोल्हापूर सिंचन विभागाकडून प्राप्त सर्व माहितीचा आधार घेण्यात आला. यात प्रामुख्याने प्रकल्पबाधीत गावे व शेतकऱ्यांची नावे, प्रकल्प लाभधारक तथा बाधीत गावे व शेतकऱ्यांची नावे, खातेदार निहाय प्रकल्पबाधीत जमिनीचे क्षेत्रफळ, प्रकल्पाची सुरूवात, निविदा, व्यय, आर्थिक तरतूद, सुप्रमा, पुनर्वसनार्थ भूसंपादन, पुनर्वसनार्थ आर्थिक तरतूद, प्रकल्प व्ययवृद्धी, प्रकल्प नकाशे, प्रकल्प जलवाहिनी/पाट नकाशे, लाभक्षेत्र नकाशा, न्यायालयीन खटले व प्रलंबने इत्यादी...इत्यादी... बाबींविषयक अवलोकन करून घेण्याचा प्रयत्न केला.

- प्रस्तुत अहवालाच्या प्रकरण एकमध्ये नमूद केल्याप्रमाणे आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प जुलै २००० पासून म्हणजे गेली दोन दशके प्रलंबित आहे. त्यामुळे मूळच्या प्रकल्प व्ययात वृद्धी होवून तो ३० कोटी वरून ११४.९३ कोटी व नंतर २३० कोटींपर्यंत वाढला आहे. प्रस्तुत प्रकल्प विलंबाचे महत्त्वाचे कारण म्हणजे भूमि अधिग्रहण व पुनर्वसन आणि पुनर्वसनासंबंधी निर्माण झालेली तेढ होय.

❖ प्रस्तुत सामाजिक परिणाम निर्धारण अहवाल खाली नमूद केलेल्या प्रमुख उद्दिष्टांवर आधारित आहे.

- प्रकल्पाचा सामाजिक व आर्थिक परिणाम अभ्यास करणे.
- प्रकल्प बाधित व लाभ धारकांवरील संभाव्य आर्थिक व सामाजिक परिणामांची चिकित्सा करणे.
- प्रकल्प बाधित व लाभ धारकांवरील संभाव्य संधी, व्यय व त्याग या घटकांची चिकित्सा करणे.
- डिसेंबर २०१३ च्या भूमी अधिग्रहण, पुनर्वसन आणि पुनरनिवास कायद्यान्वये प्रकल्पबाधीतांच्या पुनर्वसन प्रगतीची चिकित्सा करणे.
- प्रकल्पबाधीतांच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक पुनर्वसनाची चिकित्सा करणे.
- भूमि अधिग्रहण, पुनर्वसन व पुनरनिवासविषयक प्रगतीचा आढावा घेणे.
- पर्यायी जमिनी व पर्यायी निवासी पुनर्वसनाची प्रगती आणि सद्यस्थिती तपासणे.

वरील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी प्राथमिक व द्वितीय स्त्रोतांद्वारे माहितीचे संकलन, पृथक्करण व विश्लेषण करून अहवाल तयार करण्यात आला आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा तालुक्यातील आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्पात अनुक्रमे उत्तूर, अरदाळ, महागोंड, करपेवाडी, होन्याळी, वडकशिवने, हालेवाडी गावांमधील सर्व प्रकल्पबाधित कुटुंबे आणि प्रस्तावित अधिग्रहण जमिनींवर मालकी हक्क असलेल्या कुटुंबासाठी योग्य रचना केलेली मुलाखत अनुसूचीद्वारे अभ्यास केला. जनगणना पद्धतीद्वारे जमीन किंवा घरांची, खाजगी जमीन, सार्वजनिक जमीन आणि इतर हानी

झाल्यास अप्रत्यक्षपणे प्रकल्पबाधित झालेल्या कुटुंबांवर त्याचा परिणाम शोधण्यासाठी संबंधित कुटुंबाचे सर्वेक्षण करण्यात आले.

### III) सामाजिक परिणाम निर्धारण प्रक्रिया:

प्रस्तुत सामाजिक परिणाम अहवालात प्रलंबित आंबेओहोळ प्रकल्पाबाबत अपेक्षित असलेले सकारात्मक व नकारात्मक बदल तसेच प्रकल्पाचा सामाजिक व आर्थिक परिणाम समजणे, मोजणे आणि त्याकरिता संवाद साधने अत्यंत आवश्यक होते. सामाजिक व आर्थिक स्थित्यंतरांचे मोजमाप करण्यासाठी खालील पद्धतीचा वापर करण्यात आला. अपेक्षित, सुयोग्य, सत्याधारित व पृथक्करणक्षम माहिती संकलनाकरिता अभ्यास गटासमोर खाली नमूद केलेले प्रमुख संशोधन प्रश्न होते;

१. कुणाकडून कोणत्या घटकांविषयी माहिती संकलित करावी?

२. अपेक्षित माहिती संकलन कसे साध्य करावे?

३. नेमकी कोणत्या प्रकारची माहिती संकलन करणे आवश्यक आहे?

४. संबंधित माहिती संकलन सुयोग्य व अचूकपणे कसे करता येईल?

५. संकलित माहितीच्या सहाय्याने अचूक प्रकल्प परिणाम कसे निश्चित केले जावू शकतात?

६. प्रलंबित प्रकलपाचे अचूक परिणाम दर्शविणारी माहिती म्हणजे नेमकी कोणती माहिती व आकडेवारी असू शकेल?

७. संकलित माहितीचे पृथक्करण व विश्लेषण करण्याचा अचूक व सुयोग्य मार्ग अथवा पद्धती कोणत्या असू शकतात?

८. प्रकल्पबाधीतांबरोबरील संवादातून नेमके काय साध्य होणार?

९. संकलित माहिती व आकडेवारीतून निष्पन्न होणारे निष्कर्ष नेमके कोणत्या उद्दिष्टांची पूर्तता करू शकणारे असतील?.......इत्यादी

❖ कायदे व नियमांनुसार सापनि प्रक्रियेत मूलभूतपणे तीन घटकांचा समावेश करणे अत्यावश्यक आहे. ते तीन घटक पुढीलप्रमाणे आहेत;

१. प्रकल्पबाधीतांवर नकारात्मक परिणाम होऊ शकतात अशा सामाजिक–आर्थिक परिस्थितीचे सविस्तर मूल्यांकन करण्याची आवश्यकता.

२. दुर्बल घटक जसे की; महिला, मुले व वयस्क यांचेवर होणारा परिणाम आणि प्रकल्पबाधीत व स्थावर विस्थापन जसे की; घरे, वृक्षसंपदा, पशु निवारा, जैवनैसर्गिक घटक, पशुपक्षी आणि वनसंपदेचे स्खलन व नाश इत्यादी परिणामांचा सविस्तर अभ्यास. आणि...

३. तदनुषंगिक किमान अनिष्ट परिणामांसाठी सुयोग्य आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक आणि उत्पादनक्षम पुनरवसन व पुनर्निवासनासंबंधी उपाययोजन व एक विस्तृत योजना सुचविणे.

➢ आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प गेली एकोणीस (१९) वर्षे प्रलंबित आहे. प्रलंबनाची मुख्य कारणे प्रकल्पबाधीतांकडून करावयाचे भूसंपादन, पुनर्वसन व प्रकल्पबाधीत लोकांचे उत्पादक स्थलांतर आणि संपादित जमिनींचा मोबदला व पर्यायी जमिनींची तरतूद.....इत्यादी असल्याची आमच्या लक्षात आले.

➢ एकूण ४६७ प्रकल्पग्रस्तांना ३२७.४३ हेक्टर क्षेत्र देय आहे. माहे जुलै २०१६ अखेर ८० पात्र प्रकल्पग्रस्तांना ६२.०० हे. आर क्षेत्राचे वाटप करण्यात आलेले आहे. शिल्लक ३८७ प्रकल्पग्रस्तांना २७० हे. आर क्षेत्र देय आहे.

➢ एकूण ८२२ प्रकल्पग्रस्तांपैकी ३५५ प्रकल्पग्रस्तांनी स्वेच्छा पुनर्वसन स्विकारलेले आहे. स्वेच्छा निवाडेनुसार मंजूर झालेल्या ५.३८ कोटी रू. अनुदानापैकी ३.४८ कोटी रूपयांचे वाटप प्रकल्पग्रस्तांना केलेले आहे. प्रकल्पग्रस्तांकडून आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करून घेऊन करपेवाडी वगळता इतर गावातील शिल्लक

अनुदान वाटपाची प्रक्रिया उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र. ६ कोल्हापूर यांचेमार्फत सुरू आहे.

- बाधीत गाव करपेवाडी ९१.११ हे. आर अंतिम निवाडा व मोबदला वाटप पूर्ण असून जमिनीचे मूळ मालक श्री. जगतगुरू स्वामी यांनी कुळ खातेदारांना मोबदला वाटप चुकीचा झाले संदर्भात उच्च न्यायालयात दाखल केलेले रिट पिटीशन क्र. ७०९७/२०१२ अंतिम निर्णयावर प्रलंबित असलेमुळे करपेवाडीचे स्वेच्छा पुनर्वसन अनुदान रक्कम रू. १,१६,५४५/- अद्याप वाटप करणेचे शिल्लक आहे.

- प्रस्तावित तीन पुनर्वसन गावठाणापैकी अद्याप एका गावठाणाची जागा महसूल खात्याकडून निश्चित झालेली नसल्याने त्या गावठाणामध्ये देय असलेल्या नागरी सुविधांची तरतूद ही कडगांव वसाहतीच्या नागरी सुविधांच्या अंदाजपत्रकावर आधारित असून असे करताना कडगांव वसाहतीच्या नागरी सुविधांच्या एकूण किंमतीवर २५% इतकी वाढ गृहित धरली आहे.

- मौजे करपेवाडी येथील शेतकऱ्यांची जमिन अनेक पिढ्या त्यांच्याकडे आहे. संबंधित शेतकरी ती जमिन कसतात. संबंधित शेतजमिन कागदोपत्री त्यांच्या नावे आहे. त्यांच्या नावे ७/१२ व ८-अ उताराही निघतो. परंतु संबंधित शेतजमिनी इनामी जमिनी असल्यामुळे इतर हक्कात देवस्थान ट्रस्टचे नाव लागलेले आहे. या प्रकरणी देवस्थान ट्रस्टची अशी भूमिका आहे की करपेवाडीच्या सर्व शेतजमिनी देवस्थान ट्रस्टच्या इनामी व पर्यायाने मालकीच्या असल्यामुळे संबंधित प्रकल्पबाधित शेतकऱ्यांचा त्या जमिनींवर काहीही अधिकार संभवत नाही. अर्थात हे योग्य नाही.

- देवस्थान ट्रस्टचे असे म्हणणे आहे की; प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना त्यांच्या प्रकल्पबाधन जमिनीच्या बदल्यात पुनर्वसन धोरणांतर्गत जमिन न देता प्रती एकर

रोख रक्कम आदा करण्याचे धोरण स्विकारावे. परंतु संबंधित रोख रक्कम प्रत्यक्ष प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना देता कामा नये. कारण करपेवाडीच्या प्रस्तुत प्रकल्पबाधित शेतजमिनी प्रत्यक्षात देवस्थान ट्रस्टच्या मालकीच्या असल्याने त्यापोटी देय असलेली रक्कम शेतकरी प्रकल्पबाधितांऐवजी देवस्थान ट्रस्टला आदा करण्यात यावी असा देवस्थान ट्रस्टचा दावा आहे.

- एकूण ८६८ प्रकल्पबाधितांची गावनिहाय विभागणी अनुक्रमे २५२ (आर्दाळ), १५३ (करपेवाडी), ५१ (उत्तूर), १७२ (हालेवाडी), १६५ (होन्याळी), ३० (महागोंड) आणि ४५ (वडकशिवने)अशी असून याच क्रमाने गावनिहाय प्रकल्पबाधित/नियोजित बुडित जमिनीचे अनुक्रमे आकारमान ८८.८२, ९९.३९, २८.८४, ६३.८३, ७०.६९, १०.४३ आणि १२.०८ हेक्टर आर असे असून एकूण प्रकल्पबाधित जमीन ३७४.०८ हेक्टर आर इतकी आहे.

- सर्वेक्षणकामी सापनि अभ्यासगटाने एकूण ४०१ प्रकल्पबाधित शेतकऱ्यांची नमुना निवड केली असून त्याची प्रकल्पबाधित गावनिहाय संख्या अनुक्रमे १०१, १०३, १५, ६७, ८४, २३ आणि ०८ इतकी असून यात एकूण प्रकल्पबाधित शेतकऱ्यांपैकी सरासरी ४५.८७ टक्के प्रकल्पबाधितांचा समावेश केला आहे. अर्थात याचे गावनिहाय सरासरी प्रमाण ४०.०८, ६७.३२, २९.४१, ३८.९५, ५०.९१, ७६.६७ आणि १७.७८ टक्के असे येते.

- मध्यंतरी कोल्हापूरच्या वर्तमानपत्रात आंबेओहोळ सिंचन प्रकल्पबाधितांना एकरी सत्तावीस (२७) लक्ष रूपये प्रमाणे एकतर्फी किंमतीची घोषणा केल्याचे वाचनात आले. परंतु अशी किंमत प्रकल्प विभागाने कशी निश्चित केली याचा तपशील समजू शकला नाही. अर्थात अशी अंदाजे किंमत निश्चिती २०१३ च्या ‘‘भूमी अधिग्रहण, पुनर्वसन आणि पुनरनिवास’’ कायद्यातही अपेक्षित नाही.

- शेतकऱ्यांचा प्रखर विरोध झाल्यामुळे मुंबई–नागपूर सृमृद्धी महामार्ग प्रकल्पबाधितांना जर एक कोटी रूपये प्रती एकर व अशीच तयारी नाणार प्रकल्पबाधितांबाबत महाराष्ट्र राज्य सरकारने दर्शविली होती तर तशाच प्रकारचे धोरण राज्यातील सिंचन प्रकल्पांसहित इतर योजनांच्या बाबतीत लागू केले तर पुनर्वसन धोरणातील भेदभाव नष्ट होवू शकेल.

- आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्पबाधित एकूण सात गावांच्या शेतकऱ्यांच्या पुनर्वसनातील महत्त्वाची अडचण म्हणजे गडहिंग्लज तालुक्यातील चित्री मध्यम सिंचन लाभधारक पट्ट्यातील जमिनींचे अधिग्रहण होय. आंबेओहोळ सिंचन प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनकामी गडहिंग्लज तालुक्यात चित्री लाभपट्ट्यातील शेतकऱ्यांच्या जमिनींचे अधिग्रहण केले आहे. निदान कागदोपत्री तरी तसे सिद्ध होते. या शेतकऱ्यांना विविध कारणांमुळे त्यांच्या शेतजमिनींचे अधिग्रहण म्हणजे त्यांच्यावरील अन्याय वाटत असल्यामुळे त्यांनी प्रस्तुत पुनर्वसनार्थ अधिग्रहणविरोधी न्यायालयात धाव घेतल्याने पुनर्वसनार्थ भूमि अधिग्रहण प्रक्रिया न्यायप्रविष्ट झाली आहे. पर्यायाने आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्पाच्या पुनर्वसनाचे काम ठप्प झाले आहे. कारण प्रकल्पबाधितांना त्यांच्या जमिनीच्या बदल्यात पुनर्वसनार्थ देण्यासाठी कागदोपत्री जरी उपलब्ध असल्या तरी प्रत्यक्षात मात्र जमिनी उपलब्ध नाहीत ही वास्तव स्थिती आहे.

- आंबेओहोळ सिंचन प्रकल्पबाधितांच्या उत्पादक पुनर्वसनार्थ गडहिंग्लज तालुक्यात चित्री प्रकल्पलाभक्षेत्रातील अनुक्रमे बेळगुंदी, जरळी, हेब्बाळ, कसबा नूल, मुगळी, दुंडगे, भडगांव, गडहिंग्लज, हरळी खुर्द, हरळी बुद्रुक, महागाव आणि रिलगे या गावांतील एकूण कायदेशीर अडचण असलेले आणि कायदेशीर अडचण नसलेल्या शेतकऱ्यांकडून अनुक्रमे ६०.४१ आणि ५८२.९४६ हेक्टर आर अशी एकूण ६४३.३५६ हेक्टर आर इतकी जमीन संपादन प्रक्रिया शासनाने राबविली आहे. परंतु यापैकी अनेक शेतकऱ्यांना आपल्यावर अन्याय होत

असल्याची भावना असल्याने त्यांनी न्यायालयात धाव घेवून आपले म्हणणे मांडले असल्याने पुनर्वसनाची प्रक्रिया रखडली आहे.

- विशेष म्हणजे चित्री प्रकल्पलाभक्षेत्रातील या शेतकऱ्यांच्या जमिनी यापूर्वीही प्रकल्पबाधितांना पुनर्वसनार्थ देण्याकरीता अधिग्रहित केल्या होत्या व त्यामुळे आता पुन्हा आंबेओहोळ प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनार्थ त्यांच्या जमिनींचे अधिग्रहण म्हणजे त्यांना त्यांच्यावर अन्याय वाटत असल्याने त्यांचा प्रस्तुत पुनर्वसनार्थ अधिग्रहणास विरोध आहे. त्यामुळे हे शेतकरी न्यायालयात गेले असल्याचे समजते.

- कमाल जमिनधारणा तत्त्वाचे अवलंबन करून गडहिंग्लज तालुक्यातील या सर्व शेतकऱ्यांच्या जमिनींचे पुनर्वसनार्थ अधिग्रहण अवलंबले आहे. परंतु यातील अनेक कुटुंबे एकत्र कुटुंब पद्धतीची आहेत. परंतु त्यांची कागदोपत्री जमिन खातेफोड झालेली नसल्याने वडील किंवा मोठ्या भावाच्या नावावरच जमिनी असल्यामुळे कमाल जमिनधारणा तत्त्वानुसार त्यांच्याकडे अधिकच्या जमिनी दिसतात. परंतु अनेक कुटुंबांच्या बाबतीत खातेफोड आवश्यक आहे. आणि अशी खातेफोड झाली म्हणजे कुटुंबातील इतर भाऊ किंवा वय वर्षे अठरापेक्षा जास्त पुरुषांच्या नावे जमीन विभाजित केली तर कमाल जमिनधारणा सूत्राची अंमलबजावणी करता येणे कदापि शक्य नसणार अशी अनेक कुटुंबे आहेत.

- महसूल विभागाने जमिनींच्या कागदोपत्री नोंदीवरून अधिग्रहणाचे तत्त्व न अवलंबिता संयुक्त कुटुंबपद्धतीच्या अशा कुटुंबांचे सर्वेक्षण करून जमीन खातेफोडीची आवश्यकता लक्षात घेवूनच या जमिनींच्या पुनर्वसनार्थ अधिग्रहणाचा विचार करणे योग्य ठरेल.

- गडहिंग्लज तालुक्यातील पुनर्वसनार्थ जमीन अधिग्रहण करावयाच्या नावांमध्ये अनेक ठिकाणी देवस्थानच्या जमिनी, इनामी जमिनी, राजेरजवाड्यांच्या जमिनी,

वनजमिनी, सरकारी पडिक जमिनी, गायरान जमिनी इत्यादी अनेक प्रकारच्या जमिनी उपलब्ध आहेत. अशा जमिनींचे पुनर्वसनार्थ हस्तांतरण/अधिग्रहण करून या जमिनी आंबेओहोळ प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनाकरीता वापरता येणे शक्य आहे.

- काही शेतकऱ्यांच्या बाबतीत अशीही परिस्थिती लक्षात आली की या शेतकऱ्यांना जरी चित्री प्रकल्प लाभधारकतेच्या परिक्षेत्रात समाविष्ट केले असणे व त्यामुळे सिंचन प्रकल्प लाभधारक समजून त्यांच्या धारणक्षेत्रावर बागायती कमाल जमिन धारणा तत्त्व लागू केले असले तरीही त्यापैकी अनेकांना अद्याप चित्री धरण पाण्याचा लाभ झालेला नाही. अशा कुटुंबाच्या जमिनधारणेवर बागायती कमाल जमिनधारणा तत्त्व लागू करणे त्यांच्यावरील अन्याय आहे अस

- खातेफोडीचे सर्वेक्षण न करताच पुनर्वसनार्थ भूमि अधिग्रहणाचा अन्याय, परिक्षेत्रात अनेक सार्वजनिक जमिनी उपलब्ध असताना त्याकडे प्रशासकीय दुर्लक्ष करून शेतकऱ्यांच्या जमिनींचे अधिग्रहण, चित्री प्रकलपाचे पाणी न पोहोचता अनेक शेतकऱ्यांवर बागायती जमिन कमाल धारण मर्यादा तत्त्व लागू करणे, यापूर्वीही याच शेतकऱ्यांच्या जमिनी चित्री प्रकल्प पुनर्वसनार्थ अधिग्रहण झाल्याने पुन:श्च अधिग्रहणाचा अन्याय इत्यादी बाबींमुळे हे शेतकरी न्यायालयात गेल्याचे दिसून आले आहे.

- प्रशासकीय दुर्लक्ष आणि सहजतेने ज्यांच्या जमिनी अधिग्रहित करता येतील अशा शेतकऱ्यांवर घाला घालते अशीच काहीशी भावना सापनि अभ्यासगटास गडहिंग्लज तालुक्यात पाहणी करता दिसून आली. त्यामुळे आंबेओहोळ प्रकल्प पुनर्वसनाचे काम रखडे आहे असे दिसून येते.

**परिणामे;**

महाराष्ट्रातील जलसिंचन प्रकल्प भूसंपादन व जमिन मूल्यांकनाविषयीही राज्य सरकारने मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गाप्रमाणे धोरण अंगिकारण्यास हरकत नसावी. तसेच जमिन मूल्यांकन धोरण जलसिंचन खाते भूमिअधिग्रहणार्थ लागू करून प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा मोबदला देण्यास हरकत नसावी. याच्या पुष्ट्यर्थ असा युक्तिवाद असू शकतो की स्वेच्छा पुनर्वसन घेणाऱ्या शेतकऱ्यांचे उदरनिर्वाह व रोजगाराचे साधन कायमस्वरूपी संपुष्टात येते. तसेच ज्या प्रकल्पबाधीतांना प्रकल्पलाभक्षेत्रात पर्यायी जमिनी देवू केल्या जातात त्यांनाही अनेक समस्यांना सामोरे जावे लागते असे प्रस्तुत अभ्यासगटास कटाक्षाने केलेल्या क्षेत्रभेटींवरून निदर्शनास आले आहे.

**सारांशात;**

मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गाकरिता राज्य शासनाने अवलंबिलेल्या अथवा नाणार तेलशुद्धीकरण प्रकल्पाकरिता अवलंबीलेल्या प्रकल्पबाधीत जमिन मूल्यांकनाचे / मूल्याचे धोरण राज्यातील सिंचन प्रकल्पांकरिता व प्रकर्षाने प्रस्तुत प्रकल्पाकरिता अवलंबिले तर ते राज्यातील विविध/सर्व प्रकारच्या प्रकल्पबाधीतांकरिता समान पुनर्वसन मूल्याचे व न्याय्य पुनर्वसनाचे धोरण असेल. अन्यथा विविध प्रकल्पबाधीत जमिनींकरिता विविध मूल्य धोरण प्रकल्पग्रस्तांच्या मनात भेदभावाची भावना निर्माण करणारे व पर्यायाने निम्न मूल्य प्रकल्पबाधीतांकरिता अन्यायकारक ठरेल.

# प्रकरण: १
# जलसिंचन धोरण व भूसंपादनविषयक विवेचन

## प्रास्ताविक:

महाराष्ट्रातील लघु,मध्यमआणि मोठ्या धरणांची संख्या, पाटबंधारे खात्यातील गुंतवणूक आणि पाटबंधारे खात्यातील कार्यस्त मानवी श्रमाचा विचार केला तर राज्याचा जलसिंचन विभाग देशात सर्वात मोठा असल्याचे निष्पन्न होते. देशातील एकूण मोठ्या प्रकल्पांपैकी ३५ टक्के सिंचन प्रकल्प महाराष्ट्रात आहेत. परंतु राज्यातील स्थूल पिकक्षेत्राच्या (GCA) फक्त १८ टक्के एवढेच क्षेत्र सिंचनाखाली असणे हे एक विदारक वास्तव आहे. म्हणजेच देशातील सर्वाधिक गुंतवणुक आणि धरणांची महत्तम संख्या असलेल्या राज्याचे सिंचन क्षेत्र इतर राज्यांच्या व राष्ट्रीय सरसरीच्या तुलनेत देशात कमी असल्याचे दिसून येते (नारायणमुर्ती,२०१३)[१]. राष्ट्रीय जल आयोगाच्या अहवालानुसार राज्यातील मध्यम आणि मोठ्या पाटबंधारे प्रकल्पांच्या जल उपयोग क्षमतेची राष्ट्रीय जल उपयोग क्षमतेशी तुलना केली तर अत्यंत असमाधानकारक किंवा किमान पातळीवर असल्याचे दिसून येते. याकरिता बेभरोशी पर्जन्यमानालाच फक्त दोष देता येणे शक्य नाही. तर वर्षानुवर्षे कारक ठरलेल्या इतर कारणांचाही यासंबधी उहापोह करावा लागेल. याचे महत्वाचे कारण राज्यातील अनावश्यक पिक पध्दती होय.राज्यात पाण्याचे दुर्भिक्ष असूनही ऊस लागवडीखालील क्षेत्रात सातत्याने वाढ होत असल्याचा अनुभव आहे. सन १९७१-७२ ते सन २०११-१२ च्या दरम्यान महाराष्ट्रातील ऊस लागवडीखालील क्षेत्र सहा पटींनी वाढले आहे (कित्ता,२०१३)[२]. याच काळात देशपातळीवर मात्र ऊस पिकाखालील क्षेत्रात झालेली वाढ१.७८ पट एवढी सिमित असल्याचे दिसून आले.

---

[1] *A Narayanmoorthy (2013), Diagnosing Maharashtra's Water Crisis, Economic and Political Weekly, Oct. 12, 2013, Vol. VLVIII, No. XXXXI, PP. 23.*
[2] *A Narayanmoorthy (2013), Diagnosing Maharashtra's Water Crisis, Economic and Political Weekly, Oct. 12, 2013, Vol. VLVIII, No. XXXXI, PP. 23.*

परिणामे ३.५टक्के ऊसाखालील क्षेत्र राज्यातील ६० टक्के पाणी वापरते अशी स्थिती निर्माण झाली आहे. अशी परिस्थिती असल्याने महाराष्ट्रातील जल उत्पादकता अत्यंत किमान पातळीवर राहिली. उत्तरप्रदेशाची जल उत्पादकता महाराष्ट्रापेक्षा १०६ टक्के अधिक आहे(CAG, 2012)[3]. प्रति किलो साखर उत्पादनाकरिता उत्तरप्रदेशपेक्षा महाराष्ट्रात १००० लिटर अधिक पाण्याचा वापर केला जातो. याची प्रमुख कारणे राज्यातील सिंचन पध्दती आणि अनियंत्रित पाणी वापरात सापडतात.

महाराष्ट्र जल व. सिंचन आयोगाच्या (सन १९९९)[४] अहवालानुसार सन १९३० पर्यंत राज्यातील गोदावरी, तापी व कृष्णा खोऱ्यात पाण्याचा तुटवडा अधिक प्रमाणात भासू शकतो. एकंदरीत काय तर महाराष्ट्राची कृषी व जल अर्थव्यवस्था एकंदरीतच अकार्यक्षम राहिल्याचे सिध्द होते. अशा प्रकारची सरकार निर्मित सिंचन व्यवस्थेची अकार्यक्षमता एका बाजूला असताना विदर्भात एकूण १.२८ लक्ष हेक्टर सिंचन क्षमता धारित जवळपास ७००० मालगुजारी तळी दुरुस्तीच्या प्रतिक्षेत आहेत. त्याकडे मात्र सर्वदुर दुर्लक्ष झाल्याने विदर्भाच्या सिंचनक्षमतेवर गंभीर मर्यादा आल्या आहेत. याचे प्रमुख कारण म्हणजे निधीचा, एकूण वित्तिय तुट४७.६०टक्क्यांपर्यंत पोहचली आहे. (केळकर अहवाल, २०१३)[५]. पर्यायाने विदर्भाच्या एकूण जलसिंचन तुटीचे प्रमाण सुद्धा ३५.२६ टक्क्यांपर्यंत पोहोचले (केळकर अहवाल, २०१३)[६].

## १.१: जलसंपदा व राज्य सरकार:

संघराज्य प्रशासाकिय तरतूदीअंतर्गत राज्य यादी २(१७) अन्वये जलसिंचन हा विषय राज्य सरकारच्या अखत्यारित येतो. त्यामुळे राज्यातील जलस्त्रोतांचे विकास, नियोजन, जपणूक व सवंर्धनाची जबाबदारी संबधित राज्य सरकारची असते.वास्तविक पाहता

---

*[3] Govt of India (2012), Comptrol and Accountant General of India*
*[4] Govt of Maharashtra (1999), Maharashtra Irrigation Commission.*
*[5] Govt of Maharashtra/ Vijay Kelkar (2013), Report of the High Level Committee on Balanced Regional Development Issues in Maharashtra, GoM, Planning Department, Oct. 2013.*
*[6] Govt of Maharashtra - Vijay Kelkar (Chairman) (2013), Report of the High Level Committee on Balanced Regional Development Issues in Maharashtra, GoM, Planning Department, Mumbai, Oct. 2013.*

जलस्त्रोत हा नैसर्गिकदृष्टया स्वयंनुतनिकृत सार्वजनिक वस्तू असून ती राज्यातील लोकांच्या उपयोगीतेयोग्य बनविण्याची राजकोषीय जबाबदारी संबधित राज्य सरकारची मानली जाते. याकामी राज्य सरकारने जलस्त्रोत व्यवस्थापनाकरिता आवश्यक त्या सर्व बाबींवर पर्याप्त खर्चाचे वेळेवर नियोजन करणे अपेक्षित आहे. हे सर्व करत असताना राज्य सरकारने पुरेसा निधी वेळेवर उपल्ब्ध करुन त्याचा योग्य विनियोग करणे व प्रस्तावित वेळेत प्रकल्पाची कामे पूर्ण करुन सिंचन सुविधांचे जाळे निर्माण करुन राज्यातील कृषी क्षेत्राच्या विकासाला चालना देणे अपेक्षित आहे. अलिकडच्या काळात वेगाने होणारे शहरीकरण व ग्रामीण आणि नागरी औद्योगिकरणामुळे पाण्याची गरज अनेक पटींनी वाढली आहे. पर्यायाने पाणी वापराचा अग्रक्रम बदलला गेला. उदाहरणार्थ दोन दशकांपूर्वी पुणे शहराकरीता खडकवासला धरणातून प्रतिवर्षी चार दशलक्ष घनमिटर इतके पाणी वापरण्याची आवश्यकता भासत असे. त्यात आता किमान चार पट वाढ झाली आहे. अशा प्रकारच्या जलमागणी वृ.द्धीमुळे एकूणच राज्याच्या निर्मित जलस्त्रोतांवर ताण निर्माण झाला आहे. पर्यायाने उर्वरित जलक्षमतेचा पूर्णपणे वापर करण्याकरिता राज्यसरकारने पर्याप्त अर्थिक तरतूद करुन राज्यातून वाहुन जाणारे पाणी अडवीने आवश्यक आहे. तसेच राष्ट्रीय जल लवादाच्या निवाड्याप्रामाणे आंतरराज्य नदीखोऱ्यातील आपल्या वाट्याचे पाणी अपेक्षित वेळेत अडविणे आवश्यक असल्याने प्रत्येक नदी खोऱ्यातील धरणे निर्धारित वेळेत पूर्ण करण्याचे आव्हानही राज्यासमोर आहेच.

## १.२: प्रकल्पपूर्तीस विलंब व व्ययवृध्दीची समस्या:

ज्याप्रमाणे महाराष्ट्रराज्य जलसिंचन प्रकल्पसंरचनेबाबत देशात अग्रेसर आहे त्याच प्रमाणात जलसिंचन प्रकल्पपूर्ती दिरंगाईतही राज्य संपूर्ण देशात वरच्या क्रमांकावर असल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रकल्प पूर्तीचा कालावधी वाढून त्याचे लाभ मिळण्यास विलंब तर होतोच परंतु प्रकल्पाचा व्यय अनेक पटींनी वाढतो. महाराष्ट्रात जवळजवळ ३०२ प्रकल्पांची कामे गेली १५ वर्षे सुरु अथवा अर्धवट अवस्थेत अपूर्ण आहेत. या

सर्व प्रकल्पांच्या प्रकल्पबाधीतांच्या पुनर्वसनात अक्षम्य दिरंगाई झाल्यामुळे प्रकल्प व्ययात ४२८ टक्के इतकी वृध्दी झाल्याचे दिसून येते (CAG, 2012)[7].

अशा प्रकारच्या व्यय वृध्दीमुळे इतर विकासकामांवरील खर्च कमी करुन तो निधी अशा अपूर्ण प्रकल्पांवर खर्च करावा लागतो. पर्यायाने तात्कालीक गरजेचे प्रकल्प मागे पडून विकास तूट निर्माण होते. प्रकल्पपूर्तीच्या विलंबास अनेक कारणे दिली जातात. एकतर सिंचन प्रकल्पांना मोठा निधी आवश्यक असतो.परंतु सरकारकडून सुरुवातीस उपलब्धतेनुसार शक्य तितक्या निधीची तरतुद केली जाते. परिणामे प्रकल्पाचे काम पूर्ण क्षमतेने सुरु होवू शकत नाही. त्यामुळे वेळेचा अपव्यय होवून मूळ व्ययात वृद्धी होणे अपरिहार्य बनते. तसेच जलसिंचन प्रकल्पांना लागणारी जमिन व त्या अनुशंगाने करावे लागणारे भूमी अधिग्रहण हा तर प्रकल्पपूर्तीच्या मार्गातील सर्वात मोठा अडथळा मानला जातो. कारण पूर्वीच्या प्रकल्पबाधीतांचा अनुभव चांगला नसल्याने संभाव्य प्रकल्पबाधीत शेतकरी सहजा सहजी जमीन देण्यास तयार होत नाहीत. जमिन अधिग्रहण,मूल्यांकन व पुनर्वसनकामी सरकारचा महसूलविभाग जबाबदार असतो. परंतु जलसिंचन आणि महसूल विभागातील अधिकाऱ्यांचे अनेक बाबींवर एकमत होत नसल्यामुळे याकामी अधिकच विलंब झाल्याची उदाहरणे सर्वश्रुतआहेत. लोकशाही व्यवस्थेत प्रकल्पातील राजकीय हस्तक्षेप शक्यतो टाळला जात नाही. नव्हे तशी अपेक्षाही करणे योग्य नाही. अनेकदा राजकीय अनुनयापोटी मूळ प्रकल्पाची क्षमता नंतरच्या टप्प्यावर वाढवून अधिक पिकक्षेत्र लाभक्षेत्रात सामाविष्ट करण्याकरिता राजकीय हस्तक्षेप होतो. परिणामे प्रकल्प खर्च आणि पुरनवसनाची समस्या गंभीर स्वरुप धारण करुन प्रकल्पपूर्तीस अक्षम्य विलंब लागतो. अशी अनेक उदाहरणे देता येतील. तत्सम समस्येपासून सरदार सरोवर प्रकल्पही अलिप्त राहू शकला नाही. त्यामुळे प्रकल्पपूर्तीत अनेक दशकांचा विलंब झाला. प्रकल्प आकारमान, लाभक्षेत्रात तद्नंतर केलेला बदल व पाणी वाहून नेण्यासाठी पाट व चाऱ्यांची लांबी नंतरच्या टप्प्यात वाढविल्यामुळे प्रकल्प व्यय, भूमिअधिग्रहण व

[7] *Govt of India (2012), Comptrol and Accountant General of India*

पुनर्वसनाच्या समस्या अधिकच गंभीर स्वरुप धारण करतात. परिणामे प्रकल्पबाधीतांची आंदोलने ऊभी राहून प्रकल्पपूर्तीत काही वर्षेच नव्हे तर दशकांचाही विलंब लागतो. अशा दिर्घकालीन विलंबामुळे प्रकल्पपूर्तीचा व्यय अनेक पटींनी वाढतो. काही बहुउद्देशीय मोठे प्रकल्प राज्य व केंद्र सरकाच्या सामायिक खर्चातून साकारत असतात. अशा प्रकल्पामधील केंद्राच्या हिस्याचा निधी येण्यास काही वेळा विलंब लागतो. अशा वेळी प्रकल्प वेळेत मार्गी लावण्यासाठी जर राज्याने स्वत:च्या वित्तीय तरतुदीतून हा खर्च पूर्ण करण्याचा प्रयत्न केला तर प्रस्तूत प्रकल्प मार्गी लागण्यास मदत होते. परंतु त्या बरोबरचे राज्यातील इतर प्रकल्प मागे पडतात. राजकीय हस्तक्षेपाचे हे एक नमुनेदार उदाहरण मानले जाते. अनेकदा तर प्रशासकीय बाब म्हणून एका प्रकल्पावरील अधिकारी तथा अभियंते बदलून इतरत्र प्रकल्पावर रवानगी केले जातात. किंवा अशा कर्मचाऱ्यांच्या जागीनवीन कर्मचारी तात्काळ दिला जात नाही. त्यामुळे प्रकल्पपूर्तीत अक्षम्य विलंब झाल्याचीही अनेक उदाहरणे आहेत. पर्यायाने व्ययवृध्दी तर होतेच परंतुपुनर्वसनाची समस्याही उग्र स्वरुप धारण करते. प्रशासकीय सहकार्य आणि सरकारच्या विविध विभागांतील बेबनाव प्रकल्प दिरंगाईस अनेक ठिकाणी व अनेकवेळा कारणीभूत ठरल्याचाही अनुभव नवीन नाही. अशा अनेक कारणांमुळे महाराष्ट्रातील वहुउद्देशीय सिंचन प्रकल्प प्रदिर्घ काळ रखडले असून अशा प्रकल्पांच्या मूळ व्ययात हजारो कोटींची वृध्दी झाली आहे. त्यामुळेच राज्यातील कार्यपूर्तीत दिरंगाई झालेल्या प्रकल्पांचा समस्यानिहाय आढावा घेवून संबधित प्रकल्प शक्य तितक्या वेगाने पूर्ण होणे सरकारच्या अंदाजपत्रकीय खर्च, पुनर्वसन व कृषी, औद्योगिक व नागरीविकासाच्यादृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे. प्रस्तूत सर्फनाला सिंचन प्रकल्प गेली वीस (२०) वर्षे प्रलंबीत आहेच. त्यामुळे प्रकल्प खर्चात झालेली वृध्दी हे एक निर्विवाद सत्य आहे. परंतु वीस (२०)वर्षापासून प्रस्तावित अधिग्रहण शेतजमीनीवर प्रकल्पबाधीत शेतकरी काहीही गुंतवणूक अथवा सुधारणा करु न शकल्यामुळे संपूर्ण एका पिढीचे अक्षम्य आर्थिक नुकसान तर झाले आहेच परंतु प्रस्तावित लाभक्षेत्रापर्यंत पाणी न पोहचल्यामुळे लाभक्षेत्रात येऊ शकणाऱ्या शेतीचाही विकास होवू शकला नाही. नाही प्रस्तावित

लाभक्षेत्रात रोजगाराच्या कृषीव्यतिरिक्त इतर संधी निमार्ण होवू शकल्या. अशा सर्व समस्यांचा उहापोह करुन प्रस्तुत सर्फनाला प्रकल्प पूर्णत्वास जावून विस्थापितांचे आदर्श पुनर्वसन कसे होवू शकेल इत्यादी सर्व घटकांचा विचार करुन प्रस्तुत प्रकल्पाचा सामाजिक परिणाम मूल्यांकन अभ्यास शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागामार्फत पूर्ण केला असून सदरचा अहवाल यानंतरच्या विविध प्रकल्पांच्यादृष्टीने समस्यांचा लेखजोखा करुन उपाय सुचीविन्याचा प्रयत्न करु इच्छित आहे.

## १.३: न्याय्य विस्थापन आणि पुनर्वसनाच्या दिशेने:

बहुउद्देशिय नदी प्रकल्पपूर्तीकामी धरणांचे बांधकाम,जलाशय नियोजन, पाट व चारी खुदाई इत्यादी करीता मोठ्या प्रमाणात जमिनीची व पर्यायाने अधिग्रहणाची आवश्यकता भासते. त्यामुळे विस्थापन व पुनर्वसनाचे नियोजन ही एक मोठी समस्या मानली जाते. भूमि अधिग्रहणात फक्त शेतकऱ्यांच्या खाजगी मालकीच्या जमिनींचाच समावेश नसतो तर केंद्र व राज्य सरकाच्या विविध विभागांच्याही जमिंनीचे कित्येकदा अधिग्रहण करावे लागते. त्याकरीता प्रत्येक विभागाची उद्दिष्टे व जबाबदाऱ्या भिन्न असल्यामुळे एक विभाग दुसऱ्या विभागास प्रकल्पपूर्तीकामी आवश्यक भूमिअधिग्रहणाकरिता सहकार्य करेलच असे नाही. वन विभागाचे उदाहरण या बाबतीत विशेष महत्वाचे ठरते. इतर सरकारी विभागाच्या प्रकल्पपूर्तीकरिता जर वन विभागाची जमीन अधिअग्रहीत करावी लागणार असेल तर त्याबदल्यात इतर ठिकाणची वन जमीनीच वन विभागाला पर्याय म्हणून देवू कराव्या लागतात. स्वातंत्र्यापूर्वी ब्रिटीश व स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने जलसिंचन, औद्योगिकीकरण,शहरीकरण, संरक्षण विभाग, रेल्वे इत्यादीकरीता अनेकदा भूमिअधिग्रहण केले.परंतु मूळ मालक असलेल्या शेतकऱ्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न बहुतांश प्रकल्पांच्या बाबतीत अनुत्तरितच राहीला असे दिसून येते. अशा अनुभवामुळे आणि कृषी क्षेत्रासमोरील इतर समस्यांमूळे भारतात विविध शेतकरी चळवळी उभ्या राहून त्यांनी सरकारसमोर आपले म्हणणे मांडण्यास व प्रसंगी आंदोलनाची तयारी करण्यास प्रारंभ केला. यातूनच नंतरच्या काळात आदर्श पुनर्वसन व अधिग्रहण आणि अधिग्रहीत

जमिनीच्या मोबदल्याची समस्या अधिक तिव्र स्वरुप धारण करु लागली. प्रकल्पबाधींतांच्या रोजगार समस्येची जाणीव पूर्वी सरकारला नव्हती असेच काहीसे झाले.त्यामुळे नंतरच्या प्रकल्पबाधीतांनी रोजगार समस्येकडे अंगुलीनिर्देश करुन सरकारला विचार करण्यास भाग पाडले. अनेकदा तर जलसिंचन प्रकल्प आणि औद्योगिकीकरणाकरिता भूमि अधिग्रहण केलेल्या प्रकल्प बाधितांना मुलभूत रोजगाराच्या संधी अथवा पर्यायी जमिनी न मिळाल्याने त्यांना स्थलांतर करुन शहरी झोपडपट्टी व दारिद्रयाचे जीवन जगावे लागले.पर्यायने सरकाराला न्याय्य विस्थापन व पुनर्वसन धोरणाचा मसुदा तयार करण्याची निकड भासली. साधारपणे सन १९८० च्या दशकात भारत सरकारने सर्व प्रकल्पबाधीतांच्या न्याय्य पुनर्वसनाकरिता विचार करणे सुरु केले. या विषयावर अनेक वेळा मंत्रीमंडळ व सार्वजनिक पातळीवर चर्चा झाल्या (Ramaswami Iyer, 2007)[8]. तसेच याकरिता मंत्रीगटाची स्थापना करुन विचारविनिमय घडवून आणला (Ramaswami Iyer, 2007)[9].तब्बल दोन दशके चर्चा व मसुदा आणि पुनर्मसुदा तयार करण्यात गेली. परंतु योग्य मार्ग निघू शकला नाही. पर्यायाने मसुदा तयार होण्यात अक्षम्य दिरंगाई झाली. शेवटी ऑक्टोबर २००६ मध्ये ‘‘राष्ट्रीय पुनर्वसन धोरण २००६’’ चा मसुदा चर्चेकरीता समोर आला. त्यानंतर आलेल्या सूचनांची दखल घेवून भारत सरकाच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने शेवटी राष्ट्रीय पुनर्वसन कायद्याचा मसुदा तयार करण्याचे काम हाती घेतले. यातूनच नंतर ‘‘नॅशनल रिहॅबिलिटेशन अँड रेसेटलमेंट पॉलिसी२००७’’चा अंतीम मसूदा तयार झाला (Walter Fernandez, 2104)[10].

तद्नंतर पुढे ७ सप्टेंबर २०११ रोजी नवीन भूमि अधिग्रहण, पुनर्वसन आणि पुनर्निवास कायद्याचा मसुदा लोकसभेत मांडला गेला. एकूण २३५ सदस्यांपैकी २१६ सदस्यांनी

---

[8]*Ramaswamy Iyer (2007), Towards A Just Displacement and Rehabilitation Policy, Economic and Political Weekly, July 28, 2007, PP. 3103.*

[9]*Ramaswamy Iyer (2007), Towards A Just Displacement and Rehabilitation Policy, Economic and Political Weekly, July 28, 2007, PP. 3103.*

[10]*Walter Fernandez (2004), Rehabilitation Policy for the Displaced, Economic and Political Weekly, March 20, 2004, PP. 1191.*

मसुद्याच्या बाजूने तर १९ सदस्यांनी विरोधात मतदानकेल्याने मसुदा मंजूर झाला. दिनांक २९ ऑगस्ट२०१३ रोजी मसुदा लोकसभेत तर दिनांक ४ सप्टेंबर २०१३ रोजी राज्यसभेत पारित झाल्याने दिनांक २७ सप्टेंबर २०१३ रोजी राष्ट्रपतींनी त्यावर सही केली. आणि दिनांक १ जानेवारी २०१४ रोजी कायद्याची अंमलबजावणी सुरु झाली. प्रस्तुत कायदा पारित होऊन प्रत्यक्ष अंमलात येईपर्यंत देशात सार्वजनिक अथवा सरकारला सामाजिक व आर्थिकदृष्टीने लोककल्याणकारी वाटणाऱ्या खाजगी व सार्वजनिक प्रकल्पांकरीता ब्रिटीश पारित सन १८९४ च्या कायद्याअंतर्गतच जमिनीचे अधिग्रहण करण्याची तरदूत अंमलात आणली जात असे. परंतु सन १८९४ च्या कायद्यांतर्गत प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनाची कोणतीही जबाबदारी सरकारवर असत नव्हती. कारण सन १८९४ च्या ब्रिटीश कायद्यात भूमि अधिग्रहण, प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन व पुनरस्थैर्याच्या बाबतीत जबाबदारीचे उत्तरदायीत्व सरकारवर नव्हते. परंतु अशा उत्तरदायीत्वाची जबाबदारी सन २०१३ च्या राष्ट्रीय पुनर्वसन धोरणामुळे सरकारवर व पर्यायाने प्रकल्प विभागावर आली. इतकेच नव्हे तर या धोरणाअंतर्गत प्रकल्पबाधितांना पुनर्वसनाबरोबरच योग्य मोबदला देण्याचीही जबाबदारी संबधित राज्य अथवा केंद्र सरकारच्या प्रकल्प विभागावर देण्यात आली. तसेच या कायाद्यामुळे भूमि अधिग्रहण आणि मोबदल्याच्या बाबतीत पारदर्शकतेचा आग्रह धरण्यात आला हे विशेष.

प्रस्तुत कायद्यात विस्थापितांच्या पुनर्वसनाकरीता संबधित प्रकल्प विभागाने मध्यस्ताची (Ambudsman) नेमणूक करणे बंधनकारक करण्यात आले. परंतु या कायद्याअंतर्गत प्रकल्पग्रतांना न्यायालयीन प्रक्रियेत जाण्याकरिता फारशी संधी उपलब्ध नसल्याने त्यांचे सरकारवरचे अवलंबित्व अधिक राहते. तथापि प्रस्तुत कायद्याच्या आधिन राहून महाराष्ट्र शासनाने भूमि अधिग्रहण व पुनर्वसनकामी सकारात्मक भूमिका घेवून प्रकल्प विस्थापितांना मोबदला व पुनर्वसन आणि पुर्ननिवासाकरिता विशेष प्रयत्न करण्याचे आरंभिले आहे हे नक्कीच.प्रकल्पग्रस्तांना मोबदला देताना जमिनीच्या वर्तमान बाजारमूल्याच्या चारपट किंमत व पुर्ननिवासाकरिता भूखंड तसेच शक्य असेल तेथे

प्रकल्पग्रस्तांच्या जमिनीच्या मोबदल्यात जमिन उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जातो हे विशेष.

प्रकल्पबाधित शेतकऱ्यांची शेतजमिन प्रस्तुत सिंचन प्रकल्पामुळे बाधित होत असताना प्रकल्पबाधितांची गावे मात्र सिंचन प्रकलपाच्या पाण्याखाली जात नाहीत. प्रस्तुत प्रकल्पात उत्तूर , होन्याळी, करपेवाडी, वडकशिवणे, महागोंड, हालेवाडी व आर्दाळ अशी एकूण सात गावांची शेतजमिन कमी अधिक प्रमाणात बुडणार आहे. पर्यायाने या सात गावांतील एकूण ८६८ शेतकरी प्रकल्पबाधित होतात. या सर्व ग्रामस्थांना त्यांच्या बुडीत जमिनींच्या मोबदल्यात जमिनी देण्याची तरतूद कोल्हापूर जिल्हा प्रशासनाने केल्याचे कागदपत्र पडताळणी व प्रत्यक्ष स्थान भेटींवरून आमच्या लक्षात आले. परंतु तरीही प्रकल्पबाधितांना आपली शेतजमीन आणि गाव सोडताना सामाजिक व आर्थिक समूळोच्चाटनाची (Cultural Genocide) जाणीव भेडसावत असल्याने त्यांच्या अद्यापही काही तक्रारी किंवा अडचणी असल्याने प्रस्तुत पाटबंधारे प्रकल्प गेली दोन दशके प्रलंबित राहीला आहे. उपरोल्लेख केल्याप्रमाणे अशा दीर्घकाळ प्रकल्प प्रलंबनामुळे एकतर प्रकल्प व्यय वृद्धी होते. तसेच प्रकल्प लाभक्षेत्रात सर्वांगीण संक्रमण होऊन अपेक्षित विकासाच्या संधी दीर्घकाळ पुढे ढकलल्या जातात. किंवा कायमस्वरूपी गमवाव्या लागतात. प्रकल्प दिरंगाईच्या समस्या व्ययवृद्धी अथवा विकास दिरंगाई इतक्याच सीमित नसतात तर अशा दिरंगाईमुळे प्रकल्पबाधितांच्याही जीवन विकासात अडथळे निर्माण होतात. कारण अधिग्रहणाची घोषणा झाल्यानंतर संबधित प्रकल्पबाधितांची गुंतवणूक व कृषी सुधारणा क्षमता आपोआप कुठींत होवून संपुष्टात आल्याचे दिसून येते. सरकारवरही व्ययवृद्धीचा ताण येतो. इतकेच नव्हे तर यामुळे इतर प्रकल्पांवरील गुंतवणुकीवरही त्याचा दूरगामी परिणाम होतच असतो. या व इतर बाबी लक्षात घेवून प्रस्तुत प्रलंबित मध्यम पाटबंधारे प्रकल्पाचा सामाजिक परिणाम अभ्यास शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र विभागामार्फत आरंभीला असून अहवालात भविष्यातील

अशा सर्व घटकांचा साकल्याने विचार व अभ्यास करून प्रस्तुत प्रकल्प अहवाल तयार करण्याचा प्रयत्न आमच्यामार्फत केला आहे.

# प्रकरण: २
# आर्थिक उदारीकरण व भूसंपादनविषयक विवेचन

**प्रास्ताविक:**

आर्थिक उदारीकरणाच्या काळात विकासासाठी चक्रे वेगाने फिरू लागली तशी भांडवल गुंतवणूक आणि त्याकरीता भूमी अधिग्रहणाची प्रक्रियाही वेगाने सुरू झाली. भारतात जमीन अधिग्रहणाचे प्रमुख तीन टप्पे पडतात. पहिला टप्पा ब्रिटिशकालीन भारतात जे विविध प्रकल्प सुरू झाले त्यावेळचे भूमी अधिग्रहण महत्त्वाचे ठरते. यामध्ये प्रामुख्याने धरणे व नवशहरांचा समावेश करावा लागेल. परंतु जमीन अधिग्रहणाच्या प्रत्येक टप्प्यावर शेतकऱ्यांना दोष देण्याची विकृत प्रवृत्ती दिसून आली. असा आरोप झाला की शेतकरी विकास प्रक्रियेत सहभागी होवू इच्छित नाहीत व पर्यायाने दारिद्र्यात राहतात (Hatekar Niraj 2003)[११]. भारतात जमीन अधिग्रहणाचा दुसरा टप्पा म्हणून संबोधले जाते तो म्हणजे हरितक्रांतीचा. या काळात मोठमोठ्या सिंचन प्रकल्पांकरीता प्रचंड प्रमाणात जमिनीचे अधिग्रहण झाले. तसेच भारतीय शेतकऱ्यांनी याकरीता आपल्या जमिनी देवून हा आरोपही चुकीचा आहे हे सिद्ध केले (Subramaniam C. 1979)[१२]. कारण प्रत्येक प्रकल्पाकरीता शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी देवू केल्या किंवा तसे करणे त्यांना भाग पडले. यानंतरचा जमीन अधिग्रहणाचा प्रमुख टप्पा म्हणजे १९९१ च्या आर्थिक उदारीकरणानंतरचा कालखंड होय. उदारीकरणोपरांत गेल्या तीन दशकांच्या काळात जमीन अधिग्रहणाचे स्वरूप व आवश्यकता यात प्रचंड बदल व वाढ झाल्याचे दिसून यते. या काळात वेगाने वाढणारे शहरीकरण, उपनगरांचा विसतार व रोजगार संधींचे शहरीकरण पर्यायाने ग्रामीण-शहरी स्थलांतर या सर्व घटकांतून निर्माण झाली ती म्हणजे

[11] *Hatekar, N. (2003), Farmers and Markets in Pre Colonial Deccan: The Plausibility of Economic Growth in Traditional Society, Post and Present, No. 178, pp. 116-147.*

[12] *Subramaniam, C. (1979), The New Strategy in Indian Agriculture: The First Decade and After, New Delhi, Vikas Publishing House.*

पायाभूत व दळणवळणाच्या क्षेत्रात प्रचंड गुंतवणूक व जमीन अधिग्रहणाची आवश्यकता होय. परंतु या काळात मात्र अगोदरच्या दोन टप्प्यांवरील जमीन अधिग्रहणाप्रमाणे अत्यल्प मोबदला अथवा काही प्रमाणात सक्तीने जमीन अधिग्रहणाची प्रक्रिया राबविणे शक्य होणार नाही हे सरकार व ज्या खाजगी क्षेत्राच्या वतीने सरकार हे काम करत असे अशा खाजगी क्षेत्राचीही खात्री पटली (Dhanmanjiri Sathe 2016)[१३]. याची प्रचिती खाजगी औद्योगिक क्षेत्र व लोकनियुक्त लोकशाही सरकारलाही आली. या काळात जमीन अधिग्रहणावरून भारत तसेच इतर आशियायी देश व आफ्रिकी देशांतही अनेक तंटे उद्‌भवले (Cao et. al. 2008, FAO 2009)[१४, १५]. भारतातील प्रमुख उदाहरणात पश्चिम बंगालमधील नंदिग्राम, सिंगूर (Maitreesh Ghatak et.al. 2010)[१६] आणि महाराष्ट्रातील नवी मुंबईचा महा मुंबई विशेष आर्थिक क्षेत्र व गोवा विशेष आर्थिक क्षेत्र (Dhanmanjiri Sathe 2016)[१७] इत्यादींचा समावेश करावा लागेल. नंदिग्राम सिंगूर जमीन अधिग्रहण प्रकरणामुळे तर पश्चिम बंगालचे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे तीस वर्षांचे सरकार त्यानंतरच्या सार्वजनिक निवडणुकीत पडले. नागरीकरण, रस्ते, महामार्ग, उपनगरे व औद्योगिकीकरणाकरीता आर्थिक उदारीकरणानंतर जी मोठी जमीन अधिग्रहणे घडून आली त्यास उत्तरप्रदेशमधील नोयडा, कर्नाटकातील म्हैसूर-बेंगलोर कॉरीडॉर, महाराष्ट्रातील अनेक विमानतळे, तामिळनाडूमधील मद्रास शहरातील आडियारचे विशेष आर्थिक क्षेत्र इत्यादींचा उल्लेख करता येवू शकतो. तुलनात्मक विचार केला तर आंध्रप्रदेश, हरियाणा, कर्नाटक, तामिळनाडू व गुजरात इत्यादी राज्यात जमीन अधिग्रहणास शेतकऱ्यांचा फारसा विरोध झाला नाही असे दिसून येते (Jenkin,

[13]*Dhanmanjiri Sathe (2016), Land Acquisition: Need for a Shift in Discourse, Economic and Political Weekly, December 17, 2016, Vol. LI, No. XXXXXI, pp. 52-58.*

[14]*Cao, Guangzhong, Changchun Feng, Ran Tao (2008), Local Land Finance in China's Urban Expansion: Challenges and Solutions, China and World Economy, 16(2), 19-30.*

[15]*FAO (2009), Land Grab and Development Opportunities? Agricultural Investments and International land Deals in Africa, FAO-IFAD Report.*

[16]*Ghatak, Maitreesh and Parikshit Ghosh (2011), The Land Acquisition Bill: A Critique and a Proposal, Economic and Political Weekly, October 8, 2011, Vol. XLVI, No. XXXXI.*

[17]*Dhanmanjiri Sathe (2016), Land Acquisition: Need for a Shift in Discourse, Economic and Political Weekly, December 17, 2016, Vol. LI, No. XXXXXI, pp. 52-58.*

Kennedy and Mukhopadhyay 2014)[१८]. परंतु ओरीसा, पश्चिम बंगाल इत्यादी राज्यांत मात्र जमीन अधिग्रहण ही निश्चितच सोपी बाब नाही असे परिस्थितीजन्यतेवरून सिद्ध झाले आहे. शेतकऱ्यांचा जमीन अधिग्रहणास विरोध आहे असे अगदी सर्वदूर सत्य मानने निश्चितच चुकीचे आहे. कारण शेतकरी जर त्यांच्या जमिनीचा योग्य मोबदला मिळणार असेल व त्यांचे योग्य पुनर्वसन होणार असेल तर प्रकल्पाकरीता निश्चितपणे जमीन देण्यास तयार असतात. अर्थात राष्ट्रीय नमुना पाहणी (NSSO 2005)[१९] २००५ च्या अहवालानुसार एकूण ४०.०० टक्के शेतकऱ्यांना शेती व्यवसाय नकोसा झालेला आहेच. या प्रमाणात नंतरच्या काळात वाढसुद्धा झाली असणार (Dhanmanjiri Sathe 2016)[२०]. याचे प्रमुख कारण कृषी क्षेत्रावरील संकटात सापडते. अशावेळी शेतकऱ्यांना जर जमिनीच्या मोबदल्यात योग्य रक्कम अथवा पर्यायी जमीन आणि रोजगाराच्या संधी निर्माण करून दिल्या तर ते निश्चितपणे आपली शेतजमीन देण्यास तयार होतात असेही दिसून आले आहे. अर्थात चीन व मेक्सिको सरकारांनी गेल्या दोन दशकात ज्याप्रमाणे सात कोटी शेतकऱ्यांना आपल्या जमिनींचा सक्तीने त्याग करणे भाग पाडले अशा प्रकारचे औद्योगिकीकरण व आर्थिक विकासाचे प्रमेय भारतात राबवणे शक्य नाही. आंध्र प्रदेशच्या तेलंगणा व आंध्र प्रदेश अशा विभाजनानंतर अमरावती या ठिकाणच्या जमिनी आंध्र प्रदेशची नवीन राजधानी निर्माण करण्यासाठी सरकारने अधिग्रहित केल्या. अधिग्रहित जमिनींच्या मोबदल्याव्यतिरिक्त ३० टक्के विकसित जमीन मूळ मालकांना परत देण्याचे धोरण अवलंबिले. तसेच प्रती एकर जमिनीकरीता दरवर्षी रूपये पन्नास हजार असे दहा वर्षाकरीता देवू केले की त्यामुळे अधिग्रहण मोबदल्याव्यतिरिक्त शेतकऱ्यांचे अधिग्रहित जमिनीतून मिळणारे उत्पन्नही सुरू राहू शकेल. कोणत्याही प्रकल्पाकरीता जमीन अधिग्रहणास शेतकऱ्यांचा जो विरोध असतो

[18] *Jenkins, R. L. Kennedy and Mukhopadhyay (Eds) (2014), Power, Policy and Protest: The Politics of India's Special Economic Zones, New Delhi, Oxford University Press.*

[19] Govt of India (2005), National Sample Survey Organization, New Delhi

[20] *Dhanmanjiri Sathe (2016), Land Acquisition: Need for a Shift in Discourse, Economic and Political Weekly, December 17, 2016, Vol. LI, No. XXXXXI, pp. 52-58.*

त्याचे प्रमुख कारण म्हणजे नवीन प्रकल्पातील एकूण भांडवली गुंतवणूकीत न्यूनतम जमिनीचे मूल्य (सन २००४ मध्ये केवळ १.८ टक्के एवढेच होते. सन २००८ मध्ये त्यात वाढ होवून २.९ टक्के इतके झाले) (Kakani R. K., T. L. Ranga Ran and Tigga and Nutan Singh 2008)[२१]. अशा प्रकारच्या न्यून मूल्य धोरणामुळे शेतकऱ्यांचा जमिन अधिग्रहणास विरोध असतो हे प्रामुख्याने समजून घेणे आवश्यक आहे. जमीन अधिग्रहणास शेतकऱ्यांचा विरोध असण्याचे आणखी महत्त्वाचे कारण म्हणजे संबंधित व त्या आजूबाजूच्या जमिनींचे प्रकल्पोपरांत होणारे मूल्य भांडवलीकरण होय (Value Capitalization). कारण जमीन अधिग्रहण करताना जरी संबंधित जमिनीची किंमत कमी असली तरी प्रकल्पपूर्तीनंतर त्या जमिनीच्या व आजूबाजूच्या जमिनींच्या किंमती अनेकपट वाढतात. आणि अशा जमीन मूल्य भांडवलीकरणाचा फायदा मूळ जमीन मालकास मात्र होत नाही.

### २.१: महामार्ग प्रकल्प कामी प्रसंगी अतिरिक्त जमीन अधिग्रहण:

अनेक रस्ते किंवा महामार्गांची लांबी शेकडो किलोमिटर व रूंदीही प्रचंड असते. पर्यायाने हजारो एकर जमिनीची आवश्यकता भासते. कारण असे महामार्ग अनेक जिल्हे अथवा प्रसंगी विविध राज्यांना जोडणारे तसेच अनेक पदरी वाहतुकीची क्षमता असणारे असतात. देशातील याची प्रमुख उदाहरणे म्हणजे कर्नाटकातील म्हैसूर-बेंगलोर कॉरीडॉर, महाराष्ट्रातील पुणे-मुंबई एक्सप्रेस महामार्ग, मुंबई-नागपूर समृद्धी महामार्ग इत्यादी आहेत. विशेष म्हणजे अशा महामार्ग प्रकल्पांकरीता अधिग्रहित करावयाच्या जमिनीत नवशहरे, उपनगरे व इतर सुविधांकरीताच्या जमीन अधिग्रहणाचाही समावेश केला जातो. उदाहरणार्थ मुंबई-नागपूरला जोडणारा समृद्धी महामार्ग एकूण ७०० किलोमिटर लांबीचा असून त्याकरीता लागणारी एकूण जमिनीची आवश्यकता ८४०० हेक्टर इतकी आहे (१२००० एकर). तर महामार्गालगत विकसित करावयाच्या सोयीसुविधा व पायाभूत

[21]*Kakani, R. K., T. L Ranga Ran and Tigga and Nutan Singh (2008), Insights into Land Acquisition Experiences of Private Business in India, Working Paper 08-11, Jamshedpur, XLRI School of Business and Human Resources.*

सुविधांकरीता अधिक १६०० हेक्टर (४००० एकर) इतकी जमीन अधिग्रहित केली जाणार आहे. म्हणजेच प्रस्तुत प्रकल्पाची एकूण जमीन आवश्यकता दहा हजार हेक्टर म्हणजे पंचवीस हजार एकर इतकी प्रचंड आहे. अशा प्रचंड आवश्यकतेमुळे प्रकल्पपूर्तीस विलंब होवून मूळचा प्रकल्पव्यय ४६,००० कोटी रूपये वरून ५६,००० कोटी रूपये इतका वाढला आहे. कर्नाटकातील म्हैसूर-बेंगलोर कॉरीडॉरसाठीही एकूण ६९९९ हेक्टर (१७४९७.५ एकर) इतक्या जमिनीची आवश्यकता होती. परंतु रस्ता बांधकामाव्यतिरिक्त इतर सुविधा निर्माण करण्याचेही नियोजन केले गेले व एकूण जमिनीची आवश्यकता वाढली (Janaki Nair 2015)[२२]. अशा प्रकारच्या अतिरिक्त अधिग्रहणास शेतकऱ्यांचा विरोध असतो. कारण या अतिरिक्त सोयीसुविधा व नवीन शहरीकरणाचा व्यापारी लाभ मात्र प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांना मिळत नाही. तसेच उपरोल्लेख केल्याप्रमाणे प्रकल्पोपरांत जमीन मूल्य भांडवलीकरणाच्या लाभापासूनही मूळ प्रकल्पबाधीत जमीन मालक वंचित राहतात. याकामी नव आंध्रप्रदेशचे अमरावती येथील राजधानी प्रमेय अधिक आवश्वासक व आदर्श ठरते.

## २.२: सरकारकरीता धडा:

स्वातंत्र्यपूर्व ब्रिटिशकालीन अथवा स्वातंत्र्योत्तर पहिल्या टप्प्यात झालेल्या जमीन अधिग्रहणाप्रमाणे अत्यल्प किंमतीस जमीन अधिग्रहण करून प्रकल्पपूर्ती करणे शक्य राहिले नाही. किंबहुना काही प्रमाणात सक्ती करून भूमी अधिग्रहण केले तर लोकशाही राज्यव्यवस्थेत पश्चिम बंगालप्रमाणे तीस वर्षे सत्तेवर असलेले सरकारही निवडणुकीत हार खावून सत्ताच्यूत होवू शकते. परिणामे संबंधित राज्य सरकार व राजकीय पक्ष जमीन दलाल ठरण्याची शक्यता असते. म्हणूनच लोकशाही शासन व्यवस्थेत कोणत्याच राजकीय पक्षाला असे सक्तीचे अधिग्रहण धोरण अवलंबिणे शक्य नाही. किंबहुना गुजरातप्रमाणे शेतकऱ्यांकडून अधिक किंमतीस जमिनी अधिग्रहित करून उद्योजकांना

[22] *Janaki Nair (2015), India Urbanization and the Terrain of the Law, Economic and Political Weekly, September 5, 2015, PP. 54-63.*

कमी किंमतीत देवू करणे व झालेला तोटा राजकोषीय तरतुदीतून भरून काढण्याचेही धोरण काहीवेळा अवलंबिले जाते. यामुळे सर्वच राजकीय पक्ष व राज्य अथवा केंद्र सरकारांना आपण शेतकऱ्यांच्या बाजूचे आहोत हे सिद्ध करण्याची आवश्यकता निर्माण झाली. यातूनच २०१३ चा नवीन जमीन अधिग्रहण, पुनर्वसन व पुनर्निवास कायद्याचा उदय झाला. या कायद्याला तेंव्हा विरोधी पक्षात असलेल्या सर्व पक्षांनीही पाठिंबा दिला होता. नंतर मात्र २०१४ मध्ये नवीन सरकारने कायदा बदलण्याचा प्रयत्न केला. परंतु ते शक्य झाले नाही. लोकसभेत पाठिंबा मिळू शकला नाही. पर्यायाने नोव्हेंबर २०१५ मध्ये बिहार विधानसभेची निवडणूक आल्याने केंद्र सरकारने ऑगस्ट २०१५ मध्ये आपला स्वत:चा अध्यादेश नैसर्गिकरित्या मृत होवून देण्याचे धोरण अंगिकारले.

एकंदरीत काय तर जमीन दलाल अशी भूमिका घेवून विकास धोरण राबविणे शक्य नाही. शेतकरी आपली जमीन प्रकल्पकामी देण्यास तयारही असतात. परंतु त्यांना योग्य तो मोबदला व रोजगाराच्या संधी देवून विकास प्रक्रियेत भागीदार करून घेणे आवश्यक आहे. आर्थिक सुधारणोपरांत तीन दशकांच्या काळात असे अनेक अनुभव आले. जमीन अधिग्रहण हा विकास प्रक्रियेतील एक महत्त्वाचा घटक समोर आला. यातूनच २०१३ च्या नवीन अधिग्रहण कायद्याचा उदय झाला.

## २.३: न्याय्य विस्थापन आणि पुनर्वसनाच्या दिशेने:

बहुउद्देशीय नदी प्रकल्प, विशेष आर्थिक क्षेत्रे, उपनगरे, रस्ते व महामार्ग, मेट्रो रेल्वे इतयादीकरीता मोठ्या प्रमाणात जमिनीची व पर्यायाने अधिग्रहणाची आवश्यकता भासते. त्यामुळे विस्थापन व पुनर्वसनाचे नियोजन ही एक मोठी समस्या बनली आहे. भूमी अधिग्रहणात फक्त शेतकऱ्यांच्या खाजगी मालकीच्या जमिनीचांच समावेश नसतो तर केंद्र व राज्य सरकारच्या विविध विभागांच्याही जमिनींचे कित्येकदा अधिग्रहण करावे लागते. त्याकरीता प्रत्येक विभागाची उद्दिष्टे व जबाबदाऱ्या भिन्न असल्यामुळे एक विभाग दुसऱ्या विभागास प्रकल्पपूर्तीकामी आवश्यक भूमी अधिग्रहणाकरीता सहकार्य करेलच असे नाही. वन विभागाचे उदाहरण याबाबतीत महत्त्वाचे ठरते. इतर सरकारी विभागांच्या

प्रकल्पपूर्तीकरीता जर वन विभागाची जमीन अधिग्रहित करावी लागणार असेल तर त्या बदल्यात इतर ठिकाणची म्हणजे प्रकल्प विभागाच्या अथवा राज्य सरकारच्या ताब्यातील वन जमिनीच वन विभागाला पर्याय म्हणून देवू कराव्या लागतात. स्वातंत्र्यापूर्वी ब्रिटिश व स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने जलसिंचन, औद्योगिकीकरण, शहरीकरण, संरक्षण विभाग, रेल्वे इत्यादीकरीता अनेकदा भूमी अधिग्रहण केले. परंतु मूळ मालक असलेल्या शेतकऱ्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न बहुतांश प्रकल्पांच्या बाबतीत अनुत्तरीतच राहिला. अशा पूर्व अनुभवांमुळे आणि कृषी क्षेत्रासमोरील इतर समस्यांमुळे भारतात विविध शेतकरी चळवळी उभ्या राहून त्यांनी सरकारसमोर आपले म्हणणे मांडण्यास व प्रसंगी आंदोलनाची तयारी करण्यास प्रारंभ केला. यातूनच नंतरच्या काळात आदर्श पुनर्वसन व अधिग्रहण आणि अधिग्रहित जमिनीच्या मोबदल्याची समस्या अधिक तीव्र स्वरूप धारण करू लागली. प्रकल्पबाधीतांच्या रोजगार समस्येची जाणीव पूर्वी सरकारला नव्हती असेच काहीसे झाले. किंबहुना त्याबाबत एकदंरीतच प्रशासकीय अनास्था दिसून आली. त्यामुळे नंतरच्या प्रकल्पबाधीतांनी रोजगार, मोबदला, पुनर्वसन व समस्येकडे अंगुलीनिर्देश करून सरकारला विचार करण्यास भाग पाडले. अनेकदा तर जलसिंचन प्रकल्प आणि औद्योगिकरणाकरीता भूमी अधिग्रहण केलेल्या प्रकल्पबाधीतांना मूलभूत रोजगाराच्या संधी अथवा पर्यायी जमिनी न मिळाल्याने प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांना स्थलांतर करून शहरी झोपडपट्टी व दारिद्र्याचे जीवन जगावे लागले. १९५७ साली पूर्ण केलेल्या कोयना धरणाच्या प्रकल्पबाधीतांचा अनुभव याबाबत अत्यंत विदारक आहे. कारण अद्यापही कोयना धरणग्रस्तांपैकी काहींचे पुनर्वसन बाकी आहे. पर्यायाने सरकारला न्याय्य विस्थापन व पुनर्वसन धोरणाचा मसुदा तयार करण्याची निकड भासली. साधारणपणे १९८० च्या दशकात भारत सरकारने सर्व प्रकल्पबाधीतांच्या न्याय्य पुनर्वसनाकरीता विचार करणे सुरू केले. या विषयावर अनेकवेळा मंत्रीमंडळ व सार्वजनिक पातळीवर चर्चा झाल्या (Ramaswami Iyer 2007)[२३]. तसेच याकरीता

[23] *Ramaswamy Iyer (2007), Towards A Just Displacement and Rehabilitation Policy, Economic and Political Weekly, July 28, 2007, pp. 3103.*

मंत्रीगटाची स्थापना करून विचारविनिमय घडवून आणला (Ramaswami Iyer 2007)[२४]. तब्बल दोन दशके चर्चा व मसुदा आणि पुनर्मसुदा तयार करण्यात गेली. परंतु योग्य मार्ग निघू शकला नाही. पर्यायाने मसुदा तयार होण्यात दिरंगाई झाली. शेवटी ऑक्टोबर २००६ मध्ये ''राष्ट्रीय पुनर्वसन धोरण २००६'' चा मसुदा चर्चेकरीता समोर आला. त्यानंतर आलेल्या सूचनांची दखल घेवून भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने शेवटी राष्ट्रीय पुनर्वसन कायद्याचा मसुदा तयार करण्याचे काम हाती घेतले. यातूनच नंतर ''नॅशनल रिहॅबिलिटेशन ॲन्ड रिसेटलमेंट पॉलिसी २००७'' चा अंतिम मसुदा तयार झाला (Walter Fernandez 2004)[२५]. तद्नंतर पुढे ७ सप्टेंबर २०११ रोजी नवीन भूमी अधिग्रहण, पुनर्वसन आणि पुनर्निवास कायद्याचा मसुदा लोकसभेत मांडला गेला. एकूण २३५ सदस्यांपैकी २१६ सदस्यांनी मसुद्याच्या बाजूने तर १९ सदस्यांनी विरोधात मतदान केल्याने मसुदा एकमताने मंजूर झाला. दिनांक २९ ऑगस्ट २०१३ रोजी मसुदा लोकसभेत तर दिनांक ४ सप्टेंबर २०१३ रोजी राज्यसभेत पारित झाल्याने दिनांक २७ सप्टेंबर २०१३ रोजी राष्ट्रपतींनी त्यावर सही केली आणि दिनांक १ जानेवारी २०१४ रोजी कायदा अस्तित्वात येवून त्याची अंमलबजावणी सुरू झाली. प्रस्तुत कायदा पारित होवून प्रत्यक्ष अंमलात येईपर्यंत देशात सार्वजनिक अथवा सरकारला सामाजिक व आर्थिक दृष्टीने लोककल्याणकारी वाटणाऱ्या खाजगी व सार्वजनिक अशा दोन्ही प्रकारच्या प्रकल्पांकरीता ब्रिटिश पारीत १८९४ च्या कायद्याअंतर्गतच जमिनीचे अधिग्रहण करण्याची तरतूद अंमलात आणली जात असे. परंतु १८९४ च्या कायद्या अंतर्गत प्रकल्पबाधीतांच्या पुनर्वसनाची कोणतीही जबाबदारी सरकारवर असत नव्हती. कारण १८९४ च्या ब्रिटिश कायद्यात भूमी अधिग्रहित प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन व पुनरस्थैर्याच्या बाबतीत जबाबदारीचे उत्तरदायीत्व सरकारवर नव्हते. किंबहुना सरकारने असे उत्तरदायीत्व टाळले होते. परंतु अशा उत्तरदायीत्वाची

---

[24] *Ramaswamy Iyer (2007), Towards A Just Displacement and Rehabilitation Policy, Economic and Political Weekly, July 28, 2007, pp. 3103.*

[25] *Walter Fernandez (2004), Rehabilitation Policy for the Displaced, Towards A Just Displacement and Rehabilitation Policy, Economic and Political Weekly, March 20, 2004, pp. 1191.*

जबाबदारी २०१३ च्या राष्ट्रीय पुनर्वसन धोरणामुळे व नवीन कायद्याने सरकारवर व पर्यायाने प्रकल्प विभागावर आली. इतकेच नव्हे तर या धोरणाअंतर्गत प्रकल्पबाधीतांना पुनर्वसनाबरोबरच योग्य मोबदला देण्याची जबाबदारी संबंधित राज्य अथवा केंद्र सरकारच्या प्रकल्प विभागावर देण्यात आली. तसेच या कायद्यामुळे भूमी अधिग्रहण आणि प्रकल्पबाधीत संसाधनांच्या मोबदल्याच्या बाबतीत पारदर्शकतेचा आग्रह धरण्यात आला हे विशेष.

प्रस्तुत कायद्यात विस्थापितांच्या पुनर्वसनाकरीता संबंधित प्रकल्प विभागाने मध्यस्थाची (Ambudsman) नेमणूक करणे बांधनकारक करण्यात आले. परंतु या कायद्याअंतर्गत प्रकल्पग्रस्तांना न्यायालयीन प्रक्रियेत जाण्याकरीता फारशी संधी उपलब्ध नसल्याने त्यांचे सरकारवरचे अवलंबित्व अधिक राहते. तथापि प्रस्तुत कायद्याच्या आधीन राहून महाराष्ट्र शासनाने भूमी अधिग्रहण व पुनर्वसनकामी सकारात्मक भूमिका घेवून प्रकल्प विस्थापितांना मोबदला व पुनर्वसन आणि पुनर्निवासाकरीता विशेष प्रयत्न करण्याचे आरंभिले नक्कीच. प्रकल्पग्रस्तांना मोबदला देताना जमिनीच्या वर्तमान बाजारमूल्याच्या चारपट किंमत व पुनर्निवासाकरीता भूखंड तसेच शक्य असेल तेथे प्रकल्पग्रस्तांच्या जमिनीच्या मोबदल्यात जमीन उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जातो हे विशेष.

उपरोल्लेख केल्याप्रमाणे लाभक्षेत्रात सर्वांगिण संक्रमण होवून अपेक्षित विकासाच्या संधी दीर्घकाळ पुढे ढकलल्या जातात किंवा कायमस्वरूपी गमवाव्या लागतात. प्रकल्प दिरंगाईच्या समस्या व्ययवृद्धी अथवा विकास दिरंगाई इतक्याच सीमित नसतात तर अशा दिरंगाईमुळे प्रकल्पबाधीतांच्याही जीवन विकासात अडथळे निर्माण होतात. कारण अधिग्रहणाची घोषणा झाल्यानंतर संबंधित प्रकल्पबाधीतांची गुंतवणूक व कृषी सुधारणा क्षमता आपोआप कुंठीत होऊन संपुष्टात येते. सरकारवरही व्ययवृद्धीचा ताण येतो. इतकेच नव्हे तर यामुळे इतर प्रकल्पाकरीताच्या गुंतवणूकीवरही त्याचा दूरगामी परिणाम होतच असतो. या व इतर बाबी लक्षात घेवून प्रस्तुत प्रलंबित प्रकल्पाचा सामाजिक परिणाम अभ्यास शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र विभागामार्फत पूर्ण केला असून

अहवालात भविष्यातील अशा सर्व घटकांचा साकल्याने विचार व अभ्यास करून प्रस्तुत प्रकल्प अहवाल तयार करण्याचा प्रयत्न आमच्यामार्फत केला आहे.

# प्रकरण: ३
# अभ्यास माहिती संकलन व अभ्यास कार्यपद्धती

**प्राथमिक व द्वितीय माहिती संकलन पार्श्वभूमी:**

प्रस्तुत सामाजिक निर्धारण अहवालाकरीता गुणवत्तापूर्ण सांख्यिकीय माहिती जमा करून तिचे पृथ:करण व विश्लेषण करून तथ्य समोर आणणे अत्यंत आवश्यक होते. याकामी प्रामुख्याने प्राथमिक व द्वितीय माहिती स्त्रोतांचा वापर करून अचूक व तुलनाक्षम आकडेवारी संकलित केली आहे. प्राथमिक माहिती संकलनाकरीता पूर्वनियोजित प्रश्नावलीच्या माध्यमातून आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्पबाधीत एकूण ७ गावांमधील प्रकल्पबाधीतांच्या कुटुंबांना प्रत्यक्ष भेटी देऊन माहिती संकलन केले आहे. ही सर्व गावे आजरा तालुक्यात येतात. याव्यतिरिक्त गडहिंग्लज तालुक्यातील प्रकल्प लाभधारक तथा प्रकल्पबाधीत शेतकरी की, ज्यांची शेतजमिन कमाल भूमिधारण कायद्यातील तरतुदीनुसार संपादित करून आजरा तालुक्यातील प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांना देऊ केली आहे. अशा कुटुंबाकरीता एक वेगळी प्रश्नावली तयार करून त्यांचे सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षणाचे कारण असे होते की, हे बहुतांश प्रकल्प लाभधारक तथा प्रकल्पबाधीत शेतकरी त्यांच्या जमिन अधिग्रहण विरोधात न्यायालयात गेले असल्याने आंबेओहोळ प्रकल्पाचे कृषी पुनर्वसन रखडले आहे. आंबेओहोळ प्रकल्पबाघीत व प्रकल्प लाभधारक तथा प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांकडून प्राथमिक माहिती संकलन करताना पूर्वनियोजित प्रश्नावली व्यतिरिक्त पूर्वनियोजित बिंदूनुसार विशेष समूह चर्चा दोन्ही प्रकल्पबाधीत कुटुंबांसोबत चर्चा व सखोल मुलाखतींचे तंत्र अवलंबिण्यात आले.

## ३.१ माहिती संकलनातील प्रमुख टप्पे :

### ३.१.१ माहिती संकलन साधनांची निर्मिती :

प्राथमिक माहिती संकलनात प्रामुख्याने प्रकल्पबाधीत कुटुंबे, प्रकल्प लाभधारक तथा बाधीत कुटुंबे प्रकल्पबाधीत गावांचे पायाभूत सर्वेक्षण व विशेष समूह चर्चा इ. बाबींचा समावेश आहे. याव्यतिरिक्त सिंचन विभागातील प्रशासकीय अधिकारी प्रकल्पबाधीत कुटुंबे तसेच बाधीत तथा लाभार्थी कुटुंबाबरोबर विशेष समूह चर्चा घडवून आणल्या. या प्रत्येक घटकाकरीता आम्ही पूर्वनियोजित प्रश्नावली व चर्चेकरीता पूर्वनियोजित बिंदूंचा आधार घेतला होता. कारण असे करणे संकलित आकडेवारीच्या गुणवत्तेकरीता व त्यातील दोष निर्मूलनाकरीता अत्यावश्यक होते. या सर्व बाबी पार पाडल्यानंतर उपरोल्लेखित सर्व प्रश्नावली व पूर्वनियोजित बिंदूंची प्रत्यक्ष गावांना भेटी देऊन पूर्वपाहणी केली व त्या पाहणीद्वारा या सर्व माहिती संकलन साधनात आवश्यक ते बदल व सुधारणा घडवून आणल्या. निम्नउल्लेखित तक्त्यावरून माहिती संकलन साधनांविषयी आकलन होऊ शकते.

**सारणी ३.१ : माहिती संकलन साधनांचे विवेचन**

| अ. क्र. | तपशील |
|---|---|
| १ | आंबेओहोळ प्रकल्पबाधीत कुटुंब सर्वेक्षण प्रश्नावली |
| २ | आंबेओहोळ प्रकल्प लाभधारक तथा प्रकल्पबाधीत कुटुंब सर्वेक्षण |
| ३ | प्रकल्पबाधीत गावांच्या सामाजिक परिणाम प्रश्नावली मूल्यांकन प्रश्नावली |
| ४ | प्रकल्पबाधीत विशेष समूह चर्चा प्रश्नावली |

### ३.१.२ कौटुंबिक मुलाखती :

आजरा तालुक्यातील आंबेओहोळ प्रकल्पबाधीत अनुक्रमे उत्तूर , होन्याळी, करपेवाडी, वडकशिवणे, महागोंड, हालेवाडी व आर्दाळ या सात गावातील प्रकल्पबाधीत शेतकरी तसेच गडहिंग्लज तालुक्यातील प्रकल्प लाभधारक तथा प्रकल्पबाधीत कुटुंबांना प्रत्यक्ष भेटी देऊन दोन वेगवेगळ्या पूर्वनियोजित प्रश्नावलींच्या सहाय्याने मुलाखती घेऊन प्राथमिक माहितीचे संकलन करण्यात आले.

### ३.१.३ सघन समूह चर्चा:

उपरोल्लेखित व्यतिरिक्त आंबेओहोळ प्रकल्पबाधीत व चित्री प्रकल्प लाभधारक तथा प्रकल्पबाधीत कुटुंबांबरोबर पूर्वनिर्धारित बिंदू तथा प्रश्नावलीच्या सहाय्याने विशेष समूह चर्चा आयोजित केल्या होत्या. अशा समूह चर्चामध्ये प्रकल्पबाधीत तसेच लाभधारक तथा बाधीत कुटुंबांव्यतिरिक्त आजरा व गडहिंग्लज तालुक्यामधील संबंधित गावातील सरपंच, ज्येष्ठ नागरिक, ज्ञानी व्यक्ती, ग्रामपंचायत सदस्य इ. चा समावेश या समूह चर्चांमध्ये जाणीवपूर्वकपणे करण्यात आला होता.

### ३.१.४ प्रतिगामी व अवगामी भागधारकांच्या सखोल मुलाखती :

प्राथमिक माहिती संकलनातील हा तिसरा महत्त्वाचा टप्पा आहे. यात प्रामुख्याने सिंचन विभागातील अधिकारी व कर्मचारी, प्रकल्पबाधीत कुटुंबे, प्रकल्प लाभधारक तथा बाधीत कुटुंबे, ग्रामपंचायत सदस्य तथा इतर अनुभवी व्यक्तींचा समावेश करण्यात आला होता.

या कामी केलेले नियोजन निम्नउर्ध्वृत तक्त्यावरून लक्षात येईल.

**सारणी ३.२ : आंबेओहोळ सामाजिक परिणाम निर्धारण प्राथमिक माहिती संकलन वेळापत्रक**

| अ. क्र. | तपशील | प्रकल्प लाभ तथा बाधीत क्षेत्र |
|---|---|---|
| **१** | सा.प.नि. अभ्यास समिती भेटी | २३ ते २५ जानेवारी २०१८<br>६ मार्च २०१९ |
| **२** | प्रकल्प समन्वयक व प्रकल्प सहाय्यक भेटी | २५ फेब्रुवारी २०१८<br>२६ ते ३१ मे २०१९<br>५ मार्च २०१९ |
| **३** | विशेष समूह चर्चेसाठी भेटी | २० ते २३ एप्रिल २०१९<br>५ जून २०१९<br>८ जून २०१९<br>१० जून २०१९<br>१२ जून २०१९<br>१३ जून २०१९ |

| | | |
|---|---|---|
| ४ | सखोल मुलाखतीसाठी भेटी | १६ जून २०१९<br>१८ जून २०१९<br>२० जून २०१९<br>२२ जून २०१९<br>२३ जून २०१९<br>२५ जून २०१९ |

### ३.१.५ द्वितीय माहिती संकलन

द्वितीय माहिती संकलनात प्रामुख्याने आंबेओहोळ सिंचन प्रकल्पासंबंधी कोल्हापूर सिंचन विभागाकडून प्राप्त सर्व माहितीचा आधार घेण्यात आला. यात प्रामुख्याने प्रकल्पबाधीत गावे व शेतकऱ्यांची नावे, प्रकल्प लाभधारक तथा बाधीत गावे व शेतकऱ्यांची नावे, खातेदार निहाय प्रकल्पबाधीत जमिनीचे क्षेत्रफळ, प्रकल्पाची सुरूवात, निविदा, व्यय, आर्थिक तरतूद, सुप्रमा, पुनर्वसनार्थ भूसंपादन, पुनर्वसनार्थ आर्थिक तरतूद, प्रकल्प व्ययवृद्धी, प्रकल्प नकाशे, प्रकल्प जलवाहिनी/पाट नकाशे, लाभक्षेत्र नकाशा, न्यायालयीन खटले व प्रलंबने इत्यादी...इत्यादी... बाबींविषयक अवलोकन करून घेण्याचा प्रयत्न केला.

प्रस्तुत अहवालाच्या प्रकरण एकमध्ये नमूद केल्याप्रमाणे आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प जुलै २००० पासून म्हणजे गेली दोन दशके प्रलंबित आहे. त्यामुळे मूळच्या प्रकल्प व्ययात वृद्धी होवून तो ३० कोटी वरून ११४.९३ कोटी व नंतर २३० कोटींपर्यंत वाढला आहे. प्रस्तुत प्रकल्प विलंबाचे महत्त्वाचे कारण म्हणजे भूमि अधिग्रहण व पुनर्वसन आणि पुनर्वसनासंबंधी निर्माण झालेली तेढ होय. याच प्रमुख सस्येचा अभ्यास करण्यासाठी प्रस्तुत प्रकल्पाचा सामाजिक परिणाम अभ्यास हाती घेतला असून प्रस्तुत अभ्यास मुख्यत्वे खाली नमूद केलेल्या उद्दिष्टपूर्तीवर निर्भर आहे.

## ३.२ अभ्यासाची उद्दिष्टे :

प्रस्तुत सामाजिक परिणाम निर्धारण अहवाल खाली नमूद केलेल्या प्रमुख उद्दिष्टांवर आधारित आहे.

- प्रकल्पाचा सामाजिक व आर्थिक परिणाम अभ्यास करणे.
- प्रकल्प बाधित व लाभ धारकांवरील संभाव्य आर्थिक व सामाजिक परिणामांची चिकित्सा करणे.
- प्रकल्प बाधित व लाभ धारकांवरील संभाव्य संधी, व्यय व त्याग या घटकांची चिकित्सा करणे.
- डिसेंबर २०१३ च्या भूमी अधिग्रहण, पुनर्वसन आणि पुनरनिवास कायद्यान्वये प्रकल्पबाधीतांच्या पुनर्वसन प्रगतीची चिकित्सा करणे.
- प्रकल्पबाधीतांच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक पुनर्वसनाची चिकित्सा करणे.
- भूमि अधिग्रहण, पुनर्वसन व पुनरनिवासविषयक प्रगतीचा आढावा घेणे.
- पर्यायी जमिनी व पर्यायी निवासी पुनर्वसनाची प्रगती आणि सद्यस्थिती तपासणे.

## ३.३ अभ्यास पद्धती :

वरील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी प्राथमिक व द्वितीय स्त्रोतांद्वारे माहितीचे संकलन, पृथक्करण व विश्लेषण करून अहवाल तयार करण्यात आला आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा तालुक्यातील आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्पात अनुक्रमे उत्तूर, अरदाळ, महागोंड, करपेवाडी, होन्याळी, वडकशिवने, हालेवाडी गावांमधील सर्व प्रकल्पबाधित कुटुंबे आणि प्रस्तावित अधिग्रहण जमिनींवर मालकी हक्क असलेल्या कुटुंबासाठी योग्य रचना केलेली मुलाखत अनुसूचीद्वारे अभ्यास केला. जनगणना पद्धतीद्वारे जमीन किंवा घरांची, खाजगी जमीन, सार्वजनिक जमीन आणि इतर हानी

झाल्यास अप्रत्यक्षपणे प्रकल्पबाधित झालेल्या कुटुंबांवर त्याचा परिणाम शोधण्यासाठी संबंधित कुटुंबाचे सर्वेक्षण करण्यात आले.

## ३.४ अभ्यासाची पूर्वपीठीका :

प्रस्तुत अभ्यासाकरीता उपरोल्लेखित सर्व सात गावांतील सर्व प्रकल्पबाधित कुटुंबांची जनगणना (Census) पद्धतीनुसार भूमी अभिलेख व क्षेत्रीय तपासणीवर आधारित अचूकपणे सत्याधारीत प्राथमिक माहिती संकलित केली. प्रकल्पबाधीत क्षेत्राचा सामाजिक-आर्थिक आणि सांस्कृतिक संदर्भ ओळखण्यासाठी अभ्यास गटाने प्रत्यक्ष क्षेत्रभेटीवर आधारीत ग्रामसभा सदृश्य वातावरणात समूहचर्चा घडवून आणल्या. क्षेत्र भेटीद्वारा संकलित माहितीवर आणि प्रकल्पग्रस्तांबरोबर अधिकाची सल्लामसलत करून प्रकल्पाच्या सकारात्मक व नकारात्मक सामाजिक व आर्थिक परिणामांची व्याप्ती आणि तीव्रतेचे मूल्यांकन केले. तसेच भूमि अधिग्रहण, पुनर्वसन व पुनरनिवासविषयक तथ्ये जाणून घेण्याचा प्रयत्न केला. पर्यायी जमिनी व पर्यायी रहिवासी जागेविषयक वास्तव आकलन व जाणकारी करून घेतली. तसेच सामाजिक प्रभाव व्यवस्थापन योजनेत समाविष्ठ करण्यासाठी उपाय सुचविण्याचा प्रयत्न केला आहे. प्रकल्पाचा सामाजिक व आर्थिक व्यय आणि लाभ तसेच जमिन गमावणाऱ्या आणि विस्थापित होणाऱ्या कुटुंबांच्या उत्पन्न घटीचा धोका आणि अशा प्रास्तावित विस्थापित तसेच प्रकल्पबाधित कुटुंबांचे आदर्श पुनर्वसन व पुनरस्थापनाविषयी उभयपक्षी स्वीकारार्ह योजना तयार करण्याचा प्रयत्न केला आहे. उत्तूर, अरदाळ, महागोंड, करपेवाडी, होन्याळी, वडकशिवने, हालेवाडी अशा एकूण सात गावांतील शेतकऱ्यांची जमिन अधिग्रहण करावे लागत आहे. उपरोल्लेखित सात गावच्या प्रकल्पबाधित वस्तींतील लोकांसोबत ग्राम पंचायत व ग्रामदेवालायात सार्वजनिक सुनवाई दिनांक २३ जानेवारी २०१८ पासून आयोजित केली होती. या बैठकीत प्रकल्पबाधित क्षेत्रातील सापनिचे (यानंतर सामाजिक परिणाम निर्धारण असे वाचावे) मुख्य निष्कर्ष तसेच अंतिम निष्कर्ष, अतिरिक्त माहिती आणि अंतिम सापनि अहवालात इत्यादी विषयांवर विचार करण्याबाबत विचारविमर्श

केला गेला. सार्वजनिक सुनावणी, समूह चर्चा, व्हिडिओ रेकॉर्डिंग आणि छायाचित्रे इत्यादी बाबी सदर अहवालात आवश्यक तेथे विश्लेषणासह सादर केले आहे.

## ३.५ सामाजिक परिणाम अहवाल साधने आणि पद्धती :

### ३.५.१ सामाजिक परिणाम निर्धारण प्रक्रिया

प्रस्तुत सामाजिक परिणाम अहवालात प्रलंबित आंबेओहोळ प्रकल्पाबाबत अपेक्षित असलेले सकारात्मक व नकारात्मक बदल तसेच प्रकल्पाचा सामाजिक व आर्थिक परिणाम समजणे, मोजणे आणि त्याकरिता संवाद साधने अत्यंत आवश्यक होते. सामाजिक व आर्थिक स्थित्यंतरांचे मोजमाप करण्यासाठी खालील पद्धतीचा वापर करण्यात आला. अपेक्षित, सुयोग्य, सत्याधारित व पृथक्करणक्षम माहिती संकलनाकरिता अभ्यास गटासमोर खाली नमूद केलेले प्रमुख संशोधन प्रश्न होते;

१०. कुणाकडून कोणत्या घटकांविषयी माहिती संकलित करावी?

११. अपेक्षित माहिती संकलन कसे साध्य करावे?

१२. नेमकी कोणत्या प्रकारची माहिती संकलन करणे आवश्यक आहे?

१३. संबंधित माहिती संकलन सुयोग्य व अचूकपणे कसे करता येईल?

१४. संकलित माहितीच्या सहाय्याने अचूक प्रकल्प परिणाम कसे निश्चित केले जावू शकतात?

१५. प्रलंबित प्रकलपाचे अचूक परिणाम दर्शविणारी माहिती म्हणजे नेमकी कोणती माहिती व आकडेवारी असू शकेल?

१६. संकलित माहितीचे पृथक्करण व विश्लेषण करण्याचा अचूक व सुयोग्य मार्ग अथवा पद्धती कोणत्या असू शकतात?

१७. प्रकल्पबाधीतांबरोबरील संवादातून नेमके काय साध्य होणार?

१८. संकलित माहिती व आकडेवारीतून निष्पन्न होणारे निष्कर्ष नेमके कोणत्या उद्दिष्टांची पूर्तता करू शकणारे असतील?.......इत्यादी

## ३.६ सापनि अभ्यास पद्धतीतील टप्पे :

अभ्यास गटाने, आंबेओहोळ मध्यम प्रकल्पासाठी सामाजिक परिणाम मूल्यांकनाची योजना आखत असताना सर्वेक्षण मुनष्यबळ निवड आणि प्रशिक्षणामध्ये गुणवत्ता वेळ खर्च केला आहे. सुरुवातीस सर्वेक्षणाचा हेतू, मूल्यांकन एकक, उपलब्ध वेळ, पुढील कामाचे नियोजन आणि इतर संबंधित समस्यांबद्दल जाणून घेणे आवश्यक होते. तद्नुषंगाने सापनि अभ्यासगटाने आंबेओहोळ मध्यम प्रकल्प ता. आजरा, जि. कोल्हापूर येथील सिंचन व महसूल अधिकारी यांच्या सोबत चर्चा केली. प्रस्तुत चर्चा केल्यानंतर असे लक्षात आले की संबंधित कायदे व नियमांनुसार सापनि प्रक्रियेत मूलभूतपणे तीन घटकांचा समावेश करणे अत्यावश्यक आहे. ते तीन घटक पुढीलप्रमाणे आहेत;

४. प्रकल्पबाधीतांवर नकारात्मक परिणाम होऊ शकतात अशा सामाजिक-आर्थिक परिस्थितीचे सविस्तर मूल्यांकन करण्याची आवश्यकता.

५. दुर्बल घटक जसे की; महिला, मुले व वयस्क यांचेवर होणारा परिणाम आणि प्रकल्पबाधीत व स्थावर विस्थापन जसे की; घरे, वृक्षसंपदा, पशु निवारा, जैवनैसर्गिक घटक, पशुपक्षी आणि वनसंपदेचे स्खलन व नाश इत्यादी परिणामांचा सविस्तर अभ्यास. आणि...

६. तदनुषंगिक किमान अनिष्ट परिणामांसाठी सुयोग्य आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक आणि उत्पादनक्षम पुनरवसन व पुनर्निवासनासंबंधी उपाययोजन व एक विस्तृत योजना सुचविणे.

## ३.७ प्रकल्पप्रभाव क्षेत्राची पार्श्वभूमी :

आंबेओहोळ सिंचन प्रकल्प हा महाराष्ट्र शासन पाठबंधारे खात्याचा मध्यम सिंचन प्रकल्प असून प्रलंबित धरणाचे अद्यापपावेतो ७०.०० टक्के काम पूर्ण झाले आहे. धरणाची एकूण साठवण क्षमता १.२४ द.ल.घ.मीटर इतकी आहे. यामुळे आजरा तालुक्यातील एकूण सात गावांच्या शेतजमिनी बुडीत क्षेत्रात येतात. परंतु लोकवस्ती मात्र अबाधित राहते. या सर्व गावांना प्रारंभिक क्षेत्रभेट आयोजित केली आणि क्षेत्र सर्वेक्षण अभ्यास गटाने क्षेत्रे, झाडे, सामाजिक व आर्थिक आणि सांस्कृतिक मूलभूत संरचना आणि लोकवस्तीच्या भौगोलिक मर्यादांची चांगल्या प्रकारे माहिती घेतली.

### ३.७.१ बहुविधस्त्रोत माहिती संकलन :

यानंतरच्या टप्प्यात सापनि अभ्यास गटाने कोल्हापूर जिल्हा सिंचन व महसूल विभागाकडून आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्पासाठी अधिग्रहित केलेल्या जमिनींची माहिती संकलीत केली. एकत्रित केलेल्या आकडेवारीची पडताळणी करून प्रकल्पाशी निगडीत आवश्यक त्या सर्व माहितीचा आढावा घेतला. प्रस्तुत सामाजिक परिणाम अहवाल तयार करण्यासाठी उपरोल्लेखीत सातही गावच्या लोकवस्तींची किती जमिन प्रकल्पबाधित होते व पुनर्वाटपासाठी प्रस्तावित लाभ क्षेत्रातील कमाल धारण मर्यादोत्तर किती जमिन उपलब्ध होऊ शकते याचा गडहिंग्लज तालुक्यातील प्रकल्प लाभक्षेत्र गावनिहाय सांख्यिकीय आढावा घेतला. तसेच दारिद्र्यरेषेखालील, अनुसूचित जाति, जनजाती आणि इतर मागासवर्गीय प्रकल्पबाधित घरांचे, जाती, धर्म, लिंग आणि अन्य माहिती संकलनकामी दुय्यम स्रोत माहितीचा वापर करण्यात आला. तसेच कृषी पुनर्वसनाकरीता गडहिंग्लज तालुक्यातील प्रस्तावित लाभधारक ठिकाणी क्षेत्रभेटी देवून आकलन करून घेतले.

### ३.७.२ प्रकल्पबाधित, प्रतिगामी–अवगामी भागधारक आणि नियंत्रण समूह संवाद :

सापनि अभ्यास गटाने उपरोल्लेखीत सर्व सात प्रकल्पबाधित, प्रतिगामी–अवगामी भागधारक आणि प्रकल्प लाभधारक जमिनमालक की ज्यांची जमिन पुनर्वसनार्थ अधिग्रहित करावयाची आहे इत्यादी घटकांकडून माहिती संकलित करण्यासाठी संरचित प्रश्नावली व मुक्तसंवाद, समूहसंवाद, सखोल चर्चा, मुलाखती, गटचर्चा इत्यादी तंत्रांचा अवलंब केला. प्रकल्प प्रभावीत सर्व घटकांच्या सहभागाचा एक भाग म्हणून केंद्रित समूह चर्चेच्या (एफजीडी) माध्यमातून उपरोल्लेखित घटकांचा समावेश करण्यात आला होता.

### ३.७.३ प्रश्नावली, प्राथमिक माहिती संकलन व नमुना निवड :

आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प गेली एकोणीस (१९) वर्षे प्रलंबित आहे. प्रलंबनाची मुख्य कारणे प्रकल्पबाधीतांकडून करावयाचे भूसंपादन, पुनर्वसन व प्रकल्पबाधीत लोकांचे उत्पादक स्थलांतर आणि संपादित जमिनींचा मोबदला व पर्यायी जमिनींची तरतूद.....इत्यादी असल्याची आमच्या लक्षात आले. त्यामुळे प्रस्तुत प्रलंबित सिंचन प्रकल्पाचा सापनि अहवाल तयार करताना प्रकल्पबाधीतांचे सर्वांगिण न्याय्य व उत्पादक पुनवर्सन व्यवस्था होण्याच्या दृष्टिने प्रश्नावली तयार करताना विचारपूर्वक प्रश्नांची योजना केली गेली. प्रकल्प गेली एकोणीस वर्षे रखडला असल्याने प्रकल्पबाधीत व संभाव्य प्रकल्प लाभधारक अशा दोन्हीही समूहाचे आर्थिक व सामाजिक नुकसान होत असल्यामुळे प्रकल्पबाधीतांच्या सर्वेक्षणासोबतच प्रलंबित प्रकल्प लाभधारकांचेही सर्वेक्षण करणे गरजेचे होते. याचे मुख्य कारण प्रस्तुत प्रकल्पाचे संभाव्य लाभ तपासणे असे होते. तसेच डिसेंबर २०१३ च्या अधिग्रहण, पुनरवसन व पुनरनिवास कायद्यान्वये प्रकल्प लाभधेत्रातील जमिनींचे कमाल जमिन धारणा कायद्याचा वापर व अधिग्रहण करून प्रकल्पबाधीतांना वितरीत करण्याची तरतूद असल्याने अशा प्रकारच्या जलसिंचन प्रकल्पबाधीतांना प्रकल्प लाभधारक होण्याची संधी आपोआपच उपलब्ध होते. त्यामुळे प्रकल्पलाभधारक समूह सर्वेक्षणाद्वारा प्रकल्प प्रलंबनामुळे प्रकल्पबाधीतांचे गेल्या

एकोणीस (१९) वर्षात झालेले नुकसान मापन्याचाही विचार होता. त्यामुळे प्रकल्पबाधीत व प्रकल्प लाभधारक समूहाची एकंदरीत पिक पद्धती, उत्पादकता, उत्पादन, उत्पन्न, रोजगार.....इत्यादीविषयक तुलनात्मक आकडेवारी क्षेत्र सर्वेक्षणातून प्राप्त होईल अशाच प्रश्नांची योजना करण्यात आली होती.

### ३.७.४ नमुना निवडः

संकलित करावयाची प्राथमिक माहिती अचूक, विश्वासार्ह, पृथक्करणक्षम व पर्याप्त असणे अत्यंत आवश्यक होते. तसेच प्राथमिक माहितीद्वारा प्रकल्पबाधीत व प्रकल्प लाभधारक समूहाचे एकूणच तुलनात्मक कृषी संबंधाचे (Agrarian Relations) आकलन होणेही आवश्यक होते. त्यामुळे नमुना निवड करताना समान सामाजिक, आर्थिक, भौगोलिक व कृषी वातावरणीय परिस्थिती असलेले व सिंचन प्रकल्पाचे लाभधारक असलेली शेतकरी कुटुंबे आवश्यक होती. त्यामुळे चित्री पाटबंधारे प्रकल्पाच्या गडहिंग्लज तालुक्यातील प्रकल्प लाभधारक कुटुंबांची निवड करून सर्वेक्षण करण्यात आले. परंतु प्रकल्पबाधीत सात गावातील सर्व कुटुंबांचे जनगणना पद्धतीने सर्वेक्षण करण्याची योजना आखली. तथापि प्रत्यक्ष क्षेत्रपाहणी करताना असे निदर्शनास आले की, एकूण प्रकल्पबाधीतांपैकी काही कुटुंबे उदरनिर्वाह अथवा नोकरीच्या निमित्ताने इतरत्र व मुख्यत्वेकरून मुंबईला स्थलांतरीत झाली होती. पर्यायाने सापनि अभ्यासगटाने कुटुंबांचे ‘‘उंबरा सर्वेक्षण’’ (House Survey) करण्याचे निश्चित केले. म्हणजे जी कुटुंबे स्थलांतरीत झाली नाहीत अथवा सर्वेक्षणादरम्यान गावात उपलब्ध असतील अशा सर्व प्रकल्पबाधीत शेतकरी कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले. असे करताना आम्हास उपरोल्लेखित रहिवासी गावांतील एकूण प्रकल्पबाधीतांपैकी ००० कुटुंबातील व्यक्ती अथवा कुटुंबप्रमुखांना प्रत्यक्ष भेटणे शक्य झाले. अशा प्रकारे प्रकल्पबाधीतांपैकी जास्तीत जास्त कुटुंबाचे सर्वेक्षण पूर्ण होवू शकल्याने आम्ही त्यास जनगणना सर्वेक्षण असे संबोधले आहे. अशा प्रकारे ४०१ प्रकल्पबाघीत व ४० प्रकल्प लाभधारक कुटुंबे मिळून प्रस्तुत अभ्यास अहवालाकरीता एकूण ४४१ कुटुंबांची नमुना निवड करून

प्रत्यक्षपणे घरोघरी जावून सर्वेक्षणाचे काम पूर्ण केले आहे. प्रस्तुत सर्वेक्षणातून प्राप्त प्राथमिक माहितीचे पृथक्करण व विश्लेषण करून अहवालात आवश्यक त्या ठिकाणी सविस्तरपणे निष्कर्ष मांडले आहेत. अशा प्रकारे प्राथमिक माहिती संकलन सर्वेक्षणात अधिकाधिक प्रकल्पबाधीत कुटुंबांचा समावेश करू शकल्याने प्रस्तुत अहवाल सत्यतेच्या महत्तम निकषांवर उतरणारा आहे असा युक्तिवाद सापनि अभ्यासगटामार्फत केला जावू शकतो.

याव्यतिरिक्त समूह संवाद इत्यादी तंत्रांचा अवलंब केला. प्रकल्प प्रभावीत सर्व घटकांच्या सहभागाचा एक भाग म्हणून केंद्रित समूह चर्चेच्या (FGDs) माध्यमातून उपरोल्लेखित घटकांचा समावेश करण्यात आला.

### ३.७.५ सघन समूह चर्चा (Focused Group Discussions):

प्रश्नावलीच्या माध्यमातून संकलित प्राथमिक माहितीव्यतिरिक्त दिनांक २२ एप्रिल ते १० ऑक्टोबर २०१८ दरम्यान सापनि अभ्यासगटाने प्रकल्पबाधीत गावांची तसेच प्रभावीत प्रकल्प लाभधारक गावांची प्रत्यक्ष भेट घेवून प्रकल्पबाधीतांबरोबर तसेच लाभधारकांबरोबर विशेष समूहचर्चा (FGDs) घडवून आणल्या. यामुळे सर्वेक्षणातून प्राप्त प्राथमिक माहितीचे अधिक आकलन होण्यास मदत झाली. अर्थात प्राथमिक माहिती अधोरेखीतही होवू शकली.

त्यामुळे सर्वेक्षणप्राप्त प्राथमिक माहितीचे पृथक्करण व विश्लेषण अधिक अचूक पद्धतीने होवू शकले. कारण या प्रत्यक्ष भेटींच्या काळात सापनि अभ्यासगटाने गडहिंग्लज तालुक्यातील कृषी पुनर्वसनाकरीता निश्चित केलेल्या जागांची व इतर ठिकाणच्या प्रकल्प लाभक्षेत्रातील पर्यायी शेतजमिनींचीही पाहणी पूर्ण केली.

कारण डिसेंबर २०१३ च्या ''अधिग्रहण, पुनर्वसन व पुनर्निवास'' कायद्यान्वये प्रकल्पबाधीतांना त्यांच्या प्रकल्पबाधीत शेतजमिनींच्या मोबदल्यात प्रकल्प लाभक्षेत्रात जमिनी अधिग्रहित रून उपलब्ध केल्या आहेत असे प्रशासनाचे म्हणणे तपासून पाहिले.

# प्रकरण: ४
# आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्पाची व्यवहार्यता

**प्रास्ताविक:**

आंबेओहोळ नाल्यावर मौजे आर्दाळ ता. आजरा, जि. कोल्हापूर येथे आंबेओहोळ मध्यम प्रकल्प आहे. प्रकल्पाचा एकूण पाणी साठा १.२४ अ.घ.फू. (३५.११ द.ल.घ.मी.) इतका आहे. प्रकल्पाची एकूण सिंचन क्षमता ६३५९ हेक्टर इतकी असून या प्रकल्पाव्दारे आजरा तालुक्यातील २१२२ हेक्टर, गडहिंग्लज तालुक्यातील ४२२० हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ देण्याचे नियोजित आहे. प्रकल्पाव्दारे ०.५० मे.वॅट. इतकी वीज निर्मिती होणार आहे. आंबेओहोळ मध्यम प्रकल्पास महामंडळ निर्णय क्र.(२९८)/(२०७/९८) म.प्र.-१ दिनांक १६ए/१०/१९९८ अन्वये रू.२९.३१ कोटी रकमेस मूळ प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. तद्नंतर या प्रकल्पास रू. ११४.९३ कोटी इतक्या किंमतीस शासन निर्णय क्र.सुप्रमा/२००९/८५५/(२६७/ २००९) मप्र दि. ०८/०१/२०१० अन्वये प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. प्रकल्पाचा प्रस्तावित व्दितीय सुप्रमा रू.२२७.५४ कोटी (दरसुची २०१६-१७) इतका असून सदर प्रकल्पाची राज्य तांत्रिक सल्लागार समिती-२ पुणे येथे छाननी पुर्ण होऊन दि. १२/०५/२०१७ रोजी झालेल्या बैठकीत अहवाल अंतिम करणेत आला आहे. प्रकल्पास द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतचा प्रकल्प अहवाल महामंडळाचे पत्र जा.क्र.मकृखोविमं-३/(८९६/२०१५)/प्रशा-३/२४७९, दि.१९/०६/२०१७ नुसार जलसंपदा विभागास सादर करणेत आलेला आहे. सदर सुप्रमा तपासणी अंती जलसंपदा विभागाकडून नियोजन विभागाकडे सादर झालेला आहे. प्रकल्पावर माहे ०३/२०१८ अखेर रू.१०९.३१ कोटी इतका खर्च झाला आहे.

धरणाची एकूण लांबी १९७५ मी. (सा.क्र.२१० ते २१८५मी.) असून जास्तीत जास्त उंची २७.७८ मीटर आहे. धरणाची माथा पातळी ६९०.२३० मी. आहे. सा.क्र. २१० मी. ते २०४० मी. या भागातील रोधीचर खोदाई व भरावाचे काम पुर्ण झाले आहे. सा.क्र. ७२०मी. ते सा.क्र. १२६० मी. मधील डाव्या तीरावरील सरासरी ६८५.०० मी. तलांकापर्यंत व उजव्या तीरावरील सा.क्र. १३२० मी. ते सा.क्र. २०४० मी. मधील सरासरी ६८७.०० मी. लांकापर्यंत मातीकाम झाले आहे. अशा प्रकारे माती धरणाचे एकूण सुमारे ७५ टक्के काम पूर्ण झाले आहे. सिंचन तथा विद्युत विमोचकाचे ९० टक्के काम पुर्ण झाले असून यांत्रिकी विभागाकडील भाग उपलब्ध असून उभारणीची कार्यवाही प्रगतीत आहे. सांडव्याचे एकंदरीत ८० टक्के काम पुर्ण झाले आहे.

सन २०१८-१९ या वर्षात घळभरणीसह पाणीसाठा करणेसाठी पुनर्वसनाचे काम प्राथम्याने पूर्ण होणे आवश्यक आहे. या हंगामामध्ये घळभरणी व्यतरीक्त दोन्ही तीरावरील मातीकाम तलांक ६८८.०० मी पर्यंत पुर्ण करणेचे नियोजन असून त्यापैकी उजव्या तीरावरील ६८७.०० मी. पर्यंतचे काम पुर्ण झाले आहे. प्रकल्पाची मंजूर सु.प्र.मा.किंमत (सन २००८-०९) रू.११४.९३ कोटी असून प्रकल्पाची अद्यावत किंमत (सन २०१६-१७) रू.२२७.५४ कोटी इतकी येत आहे. प्रकल्पावर माहे ०३/२०१८ अखेर रू. १०९.३१ कोटी खर्च झाला आहे. सन २०१८-१९ साठी रू.१.०० कोटी निधीची तरतूद झाली आहे. सदर प्रकल्पासाठी नाबार्ड २० अंतर्गत रू. ४९.०० कोटी कर्जसहाय्य मंजुर झाले आहे. प्रकल्पाकरिता रू.२२.३७ कोटीचे परतावे सादर केले आहेत.

**सारणी ४.१ आंबेओहोळ प्रकल्पाची पार्श्वभूमी**

| अ. क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| १ | प्रकल्पाची व्याप्ती | सदर माती धरणांतर्गत ३५.११ दलघमी इतका एकूण पाणीसाठा प्रस्तावित असून त्याद्वारे आजरा व गडहिंग्लज तालुक्यातील ३९२५ हे. सिंचन क्षेत्रास सिंचनाचा लाभ होणार आहे. |

| | | |
|---|---|---|
| २ | स्थान | हिरण्यकेशी नदीच्या डाव्या तीरावरील आंबेओहोळ नाल्यावर आरदाळ गावाच्या उर्ध्व बाजूस धरणाचे ठिकाण आहे. राज्य: महाराष्ट्र, जिल्हा: कोल्हापूर, प्रदेश: पश्चिम महाराष्ट्र, तालुका: आजरा, मानचित्र नकाशा क्रमांक: ४७-एल/४ ,४७ एल /८. अक्षांश: १६ ०-१२'- ५८ (उ), रेखांश: ७४ ०- १२' -२३ (द) |
| | १. राज्य | महाराष्ट्र |
| | २. जिल्हा | कोल्हापूर |
| | ३. प्रदेश | पश्चिम महाराष्ट्र |
| | ४. तालुका | आजरा |
| | ५. मानचित्र नकाशा क्रमांक | ४७-एल/४ ,४७ एल /८. |
| | ६.अक्षांश | १६ ०-१२'- ५८ (उ) |
| | ७. रेखांश | ७४ ०- १२' -२३ (द) |
| ३ | पाणलोट क्षेत्र | १३.२२ चौ. कि.मी. |
| ४ | वार्षिक सरासरी पर्जन्यमान | १२५० ते १८७५ मि. मि. |
| ५ | ७५ टक्के विश्वासार्ह जलसंपत्ती | ३३.०५ द.ल.घ.मी. |
| | एकूण वार्षिक वापर | ३२.४०८ द.ल.घ.मी. |
| ६ | धरण | |
| | १. एकूण पाणीसाठा २. मृत पाणीसाठा | ३५.११ द.ल.घ.मी. |
| | ३. उपयुक्त पाणीसाठा | २.४८ द.ल.घ.मी. |
| | ४. बाष्पीभवन व इतर व्यय | ३२.६३ द.ल.घ.मी. |
| | ५. धरणाचा प्रकार | ३.७४९ द.ल.घ.मी. |
| | ६. धरणाची जास्तीत जास्त उंची | माती धरण, द्वार रहीत डकबिल प्रकारचा सांडवा. |
| | ७. धरणाची लांबी | २७.७८ मी. |
| | ८. नियंत्रण पातळया | १९१५ मी. |
| | | ६९०.२३० मी. |
| | | ६८७.२३० मी. |
| | | ६८५.७३० मी. |
| | | ६६९.६६० मी. |
| ७ | एकूण बुडीत क्षेत्र | ३९५.५२ हे. |

| | | |
|---|---|---|
| ८ | बाधीत होणारी गावे | निरंक |
| | बाधीत कुटुंबे | निरंक |
| ९ | संकल्पित पूर विसर्ग | ५४८.३६३ घमी./ से. |
| १० | लाभक्षेत्र | |
| | एकूण लाभक्षेत्र | ५०१९ हे. |
| | लागवडी लायक क्षेत्र | ४२६६ हे. |
| | सिंचन क्षेत्र | ३९२५ हे. |
| | लाभ मिळणारे तालुके | आजरा १३१० हे.,गडहिंग्लज २६१५ हे. |
| ११ | लाभक्षेत्रातील सरासरी पर्जन्यमान | १०१६ मी.मी. ते १९०५ मी.मी. |
| १२ | जलविद्युत प्रकल्प | १ ु ०.५ मेवॅ (बांधा, वापरा व हस्तांतरित करा या तत्वावर विकसनासाठी प्रस्तावित |
| १३ | प्रकल्पाची प्र.मा.किंमत (दरसूची) | रू.२९.३१ कोटी (१९९६-९७) |
| १४ | प्रकल्पाची प्रथम सु. प्र.मा.किंमत (दरसूची) | रू.११४.९३ कोटी (२००८-०९) |
| १५ | प्रकल्पाची दितीय सु.प्र.मा. किंमत (दरसूची) प्रस्तावित | रू.२२७.५४ कोटी (२०१५-१६) |
| १६ | साठ्याची प्रती दलघमी किंमत | रू.६४८.१० लक्ष प्रति द.ल.घ.मी. |
| १७ | खर्च प्रति हेक्टर (सिंचन क्षेत्र) | रू.५.८७ लक्ष प्रति हेक्टर |
| १८ | लाभ:व्यय गुणोत्तर | १.४३ |

**संदर्भ:** कोल्हापूर पाटबंधारे विभाग, कार्यकारी अभियंता कार्यालय, कागदपत्रे

## ४.१ भूसंपादन व पुनर्वसनाची सद्यस्थिती:

२.१. बुडीत क्षेत्र व भूसंपादन: आंबेओहोळ प्रकल्पाचे १० गावात एकूण ३९५.५२ हे. क्षेत्र बुडीत आहे. या बुडीत क्षेत्रामध्ये सर्वाधिक म्हणजेच ९८.६७ हे. क्षेत्र करपेवाडी गावातील असून त्याखालोखाल आर्दाल ८९.२० हे., हेन्याळी ७०.७० हे. व हालेवाडी गावचे ६४.९७ हे. क्षेत्र आहे. एकूण बुडीत क्षेत्रापैकी ३९५.५२ हे. क्षेत्राच्या भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण झाली असून उत्तूर रस्ता व खाण गावातील एकूण १०.०७ हे. क्षेत्रापैकी ५.५० हे. क्षेत्र वगळणेची कार्यवाही चालू आहे. या प्रकल्पात एकूण ८२२ बाधित खातेदार आहेत. सर्वाधिक बाधित खातेदारांची संख्या आर्दाळ गावातील

(२४० खातेदार) असून महागौंड गावात (२६ खातेदार) सर्वात कमी बाधित खातेदार आहेत. आंबेओहोळ प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्राची निवाडा रक्कम रू. १५.७१ कोटी इतकी आहे.

**सारणी ४.२: प्रकल्पाचे बुडित क्षेत्र व भूसंपादन**

| अ. क्र. | गावाचे नाव | एस आर क्रमांक | क्षेत्र (हे) | भूसंपादन प्रस्तावाची सद्यस्थिती | बाधित खातेदारांची संख्या | निवाडा दिनांक | निवाडा रक्कम (रू. कोटी) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | उत्तूर | ६०७ | १८.२३ | अंतिम निवाडा मंजूर मोबदला वाटप पूर्ण | ४६ | २७/०२/२००६ | ०.७७ |
| २ | आर्दाळ | ६०८ | ८९.२० | अंतिम निवाडा मंजूर मोबदला वाटप पूर्ण | २४० | २५/०९/२००६ | ३.४४ |
| ३ | वडकशिवाले | ६३६ | १२.७७ | अंतिम निवाडा मंजूर मोबदला वाटप पूर्ण | ४५ | २८/०२/२००६ | ०.३८ |
| ४ | महागौंड | ६३७ | १०.४३ | अंतिम निवाडा मंजूर मोबदला वाटप पूर्ण | २६ | २४/०३/२०११ | ०.३१ |
| ५ | हालेवाडी | ६३८ | ६४.९७ | अंतिम निवाडा मंजूर मोबदला वाटप पूर्ण | १५९ | १८/०७/२००६ | २.२८ |
| ६ | करपेवाडी | ६३९ | ९८.६७ | अंतिम निवाडा मंजूर तथापि, मौजे करपेवाडी येथील प्रकल्पग्रस्त व स्वामी शंकराचार्य करवीर पीठ यांचेतील मा. उच्च न्यायालयीन प्रकरणामुळे मोबदला न्यायालयात जमा.दाव्याच्या निकाल प्रकल्पग्रस्तांचे बाजूने लागला असून मोबदला वाटप कार्यवाही त्वरीत होणे आवश्यक. | १५४ | २८/०९/२००६ | ३.८८ |
| ७ | होन्याळी | ६४० | ७०.७० | अंतिम निवाडा मंजूर मोबदला वाटप पूर्ण | १५२ | १४/०७/२००६ | २.६३ |
| ८ | उत्तूर रस्ता व खाण | ६७६ | १०.०७ | अंतिम निवाडा प्रसिध्द, संपादन मंडळाकडून ५.५० हे. क्षेत्र वगळणे | | ३१/०८/२००९ | ०.७० पैकी ०.३० वर्ग |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | बाबतचा प्रस्ताव मंजूरीस्तव मा.आयुक्त कार्यालयाकडे सुनावणीसाठी प्रलंबित | | | |
| ९ | वाढीव उत्तूर | ७३१ | ५.०६ | अंतिम निवाडा मंजूर मोबदला वाटप पूर्ण | | २४/०३/२०११ | ०.३० |
| १० | वाढीव आर्दाळ | ७३० | १५.४२ | अंतिम निवाडा मंजूर मोबदला वाटप पूर्ण | | २८/०२/२०११ | १.०२ |
| | एकूण | | ३९५.५२ | | ८२२ | | १५.७१ |

**संदर्भ:** कोल्हापूर पाटबंधारे विभाग, कार्यकारी अभियंता कार्यालय, कागदपत्रे

## ४.२ प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन:

आंबेओहोळ प्रकल्पामुळे कोणतेही गावठाण पुर्णत: अथवा अंशत: बाधित होत नाही. प्रकल्पातील बाधित खातेदारांची एकूण संख्या ८२२ आहे. त्यापैकी ३५५ खातेदारांनी स्वेच्छा पुनर्वसन स्वीकारलेले असून उर्वरित ४६७ खातेदारांनी ६५ टक्के रक्कम शासनास भरणा केली आहे. त्याकरिता त्यांना सुधारित प्रशासकीय मान्यतेनुसार ३२७.४३ हे. पर्यायी जमिन देय आहे. आंबेओहोळ प्रकल्पाच्या आजारा व गडहिंग्लज तालुक्याच्या लाभक्षेत्रातील १८ गावात एकूण १६६.७७ हे. निवाडा क्षेत्र असून त्यापैकी आजारा तालुक्यात १०४.३५ हे. व गडहिंग्लज तालुक्यात ६२.४२ हे. क्षेत्र आहे. तसेच आंबेओहोळ लाभक्षेत्रात ७२.८० हे. क्षेत्र उपलब्ध असून चित्री लाभक्षेत्रामधील ६०.४१ हे. क्षेत्र (३.२३ हे. स्लॅब प्रमाणे) नियोजित आहे. आंबेओहोळ व चित्री लाभक्षेत्रामध्ये सुमारे २९९.९८ हे. क्षेत्र प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी उपलब्ध व नियोजित आहे. आज अखेर १६० खातेदारांना ८६.०२ हे. जमीन वाटप करण्यात आली असून ३०७ खातेदारांना २४१.४१ हे. जमीन वाटप करणे बाकी आहे. आंबेओहोळ लाभक्षेत्रातील स्लॅबपात्र २९७.३८ हे. पैकी १६६.७७ हे. क्षेत्राचा भुसंपादन मोबदला वाटप पुर्ण असून उर्वरीत क्षेत्राचे निवाडे होणे आवश्यक आहे.

## सारणी ४.३: प्रकल्प लाभक्षेत्रातून उपलब्ध पर्यायी जमिन क्षेत्र (१.६१ हे. स्लॅब प्रमाणे)

| तालुका | गांव | स्लॅबपात्र क्षेत्र हे. | एस.आर.क्र. एस.आर.क्र. (निवाडा दिनांक) | निवाडा क्षेत्र हे. | भूसंपादन प्रस्तावाची सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| आंबेओहोळ प्रकल्पाचे लाभक्षेत्रातील गांवे | | | | | |
| १) आजरा (१० गावे) | १) उत्तूर | १०१.५४ | ५०७/०९ (३.०५.१३) | ७१.२९ | प्रस्तावित १०१.५४ हे. क्षेत्रापैकी ७१.२९ हे. क्षेत्राचा निवाडा जाहीर होऊन मोबदला वाटप पूर्ण. संपादीत ७१.२८ हे.क्षेत्रापैकी २०.०६ हे.क्षेत्रावर उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल झाली आहे. |
| | २) मुम्मेवाडी | ९.०६ | ४९९/०९ (३०.७.११) | ९.०६ | प्रस्तावित ९.०६ हे. क्षेत्राचा निवाडा जाहीर. संपादीत ९.०६ हे.पैकी ०.५१ हे. क्षेत्रावर उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल झाली आहे. |
| | ३) करपेवाडी | २.०० | ४९८/०९ (२७.७.११) | २.०० | प्रस्तावित २.०० हे. क्षेत्राचा निवाडा जाहीर. संपादीत २.०० हे.पैकी ०.४० हे. क्षेत्रावर उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल झाली आहे. |
| | ४) चव्हाणवाडी | १.४३ | ५०४/०९ (१४.२.११) | १.४३ | प्रस्तावित १.४३ हे. क्षेत्राचा निवाडा जाहीर. |
| | ५) होन्याळी | २.३३ | ५०१/०९ (३०.७.११) | २.३३ | प्रस्तावित २.३३ हे. क्षेत्राचा निवाडा जाहीर. |
| | ६) महागोंड | १.५२ | ५०२/०९ (३०.७.११) | १.५२ | प्रस्तावित १.५२ हे. क्षेत्राचा निवाडा जाहीर. |
| | ७) वडकशिवनें | १.४६ | ५०५/०९ (१४.२.११) | १.४६ | प्रस्तावित १.४६ हे. क्षेत्राचा निवाडा जाहीर. |
| | ८) पेंढारवाडी | १.८० | ५०६/०९ (२३.४.१२) | १.४० | प्रस्तावित १.८० हे. क्षेत्रापैकी १.४० हे. क्षेत्राचा निवाडा जाहिर. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | ९) आर्दाळ | १७.०८ | ५००/०९ (२१.१२.१२) | १३.८६ | प्रस्तावित १७.०८ हे. क्षेत्रापैकी १३.८६ हे. क्षेत्राचा निवाडा जाहिर व त्यापैकी ८.७६ हे. क्षेत्रावर उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल झाली आहे. |
| | १०) महागोंडवाडी | ४.८२ | ५०३/०९ | -- | नविन भूसंपादन कायदा २०१३ नुसार संपादन कार्यवाही भुदरगड प्रांत यांचे मार्फत कलम ११ प्रगतीपथावर. |
| | एकूण हे.आर | १४२.६४ | | १०४.३५ | |
| २)गड हिंग्लज(८ गावे ) | १) शिप्पूर | २.३५ | ५०९/०९ (२२.८.१२) | २.३५ | २.३५ हे.क्षेत्राचा निवाडा जाहिर. संपादीत २.३५ हे. क्षेत्रापैकी २.३५ हे. क्षेत्रावर उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल झाली आहे. |
| | २) कडगांव | ४५.८४ | ५१५/०९ (२१.१.१३) | ४०.५३ | प्रस्तावित ४५.८४ हे.क्षेत्रापैकी ४०.५३ हे. क्षेत्राचा निवाडा जाहीर होऊनमोबदला वाटप पूर्ण. संपादीत ४०.५३ हे.क्षेत्रापैकी १८.९५ हे.क्षेत्रावर तसेच उर्वरीत ५.३१ हे. असे एकूण २३.३१ हे. क्षेत्रावर उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल झाली आहे. |
| | ३) लिंगनुर | ८.३० | ५०८/०९ (२९.२.१२) | ७.१७ | ८.३० हे. क्षेत्रापैकी ७.१७ हे. क्षेत्राचा निवाडा जाहीर. संपादीत ७.१७ हे.क्षेत्रापैकी ७.१७ हे.क्षेत्रावर उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल झाली आहे. |
| | ४) गडहिंग्लज | ५५.५६ | ५१४/०९ | -- | नविन भुसंपादन कायदा सन २०१३ नुसार संपादन कार्यवाही गडहिंग्लज प्रांत यांचे मार्फत कलम ११ प्रगतीपथावर |
| | ५) करंबळी | १२.८८ | ५१०/०९ | -- | अंतिम निवाडा बाकी. |
| | ६) अत्याळ | १०.२७ | ५१२/०९ (६.१२.१२) | ९.८७ | १०.२७ हे. क्षेत्रापैकी ९.८७ हे. क्षेत्राचा निवाडा जाहीर. |
| | ७) गिजवणे | २.९० | ५११/०९ | २.५० | २.९० हे. क्षेत्रापैकी २.५० हे. क्षेत्राचा निवाडा जाहीर. संपादीत २.५० हे.क्षेत्रापैकी २.५० हे.क्षेत्रावर उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल झाली आहे. |
| | ८) बेकनाळ | १६.६४ | ५१३/०९ | -- | नविन भुसंपादन कायदा सन २०१३ नुसार संपादन कार्यवाही गडहिंग्लज प्रांत यांचे मार्फत कलम ११ प्रगतीपथावर |
| | एकूण हे.आर | १५४.७४ | | ६२.४२ | |
| | एकूण | २९७.३८ | | १६६.७७ | |

**संदर्भ:** कोल्हापूर पाटबंधारे विभाग, कार्यकारी अभियंता कार्यालय, कागदपत्रे

### ४.३. पुनर्वसनाचा प्राधान्यक्रम:

**प्रथम प्राधान्य टप्पा- १: धरण पाया, खाणक्षेत्र व सांडवा:**

आंबेओहोळ प्रकल्पाच्या पुनर्वसन प्राधान्यक्रमाच्या प्रथम टप्प्यात (धरण पाया, सांडवा व खाणक्षेत्र) उत्तूर, आर्दाळ, करपेवाडी, होन्याळी, हालेवाडी, महागौंड व वडकशिवाले या ७ गावांमधील एकूण १६१ प्रकल्पग्रस्तांना १२३.८६ हेक्टर क्षेत्र देय आहे. या देय क्षेत्राकरिता उत्तुर ,आर्दाळ, मुम्मेवाडी, चव्हाणवाडी, वडकशिवाले, करपेवाडी, होन्याळी व महागोंड या गावांतील क्षेत्र उपलब्ध आहे.

**द्वितीय प्राधान्य टप्पा- २: बुडित क्षेत्र:**

आंबेओहोळ प्रकल्पाच्या पुनर्वसन प्राधान्यक्रमाच्या द्वितीय टप्प्यात (बुडीत क्षेत्र) उत्तूर, आर्दाळ, करपेवाडी, होन्याळी, हालेवाडी, महागौंड व वडकशिवाले या गांवामधील बुडित क्षेत्रातील ३०७ बाधित खातेदारांना २०३.५७ हेक्टर क्षेत्र देय आहे. यासाठी आंबेओहोळ व चित्री प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील स्लॅबपात्र क्षेत्र उपलब्ध आहे.

## सारणी ४.४: प्रकल्पबाधित खातेदार व त्यांना देय क्षेत्राचा गोषवारा

| अ. क्र. | गावाचे नांव | एकूण बाधित | | | | | टप्पा क्र. १ | | | | टप्पा क्र.२ | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | खातेदार | बूडीत क्षेत्र हे. | कूटूंब सदस्य संख्या | पर्यायी देय क्षेत्र हे. | देय निवासी भूखंड | खातेदार | देय क्षेत्र हे. | कूटूंब सदस्य संख्या | देय निवासी भूखंड | खातेदार | देय क्षेत्र हे. | कूटूंब सदस्य संख्या | देय निवासी भूखंड |
| १ | उत्तूर | २२ | ३३.३६ | १३१ | १५.०९ | १४ | ८ | ४.९०.० | ५५ | ० | १४ | १०.१९ | ७६ | १४ |
| २ | आर्दाळ | १३६ | १०४.६२ | ८२२ | ९०.९६ | ४८ | ८८ | ६०.६६ | ५२० | ० | ४८ | ३०.३० | ३०२ | ४८ |
| ३ | करपेवाडी | ९५ | ९८.६७ | ५३३ | ७३.०० | ३१ | ६५ | ५८.३० | ४०९ | ० | ३१ | १४.७० | १३८ | ३१ |
| ४ | होन्याळी | ८५ | ७०.७० | ६२२ | ६३.४० | ८५ | ० | ०.०० | ० | ० | ८५ | ६३.४० | ६२२ | ८५ |
| ५ | हालेवाडी | ९३ | ६४.९७ | ६७३ | ६०.५५ | ९३ | ० | ०.०० | ० | ० | ९३ | ६०.५५ | ६७३ | ९३ |
| ६ | महागौंड | १९ | १०.४३ | १२४ | १२.२१ | १९ | ० | ०.०० | ० | ० | १९ | १२.२१ | १२४ | १९ |
| ७ | वडकशिवनें | १७ | १२.७७ | १०६ | १२.२२ | १७ | ० | ०.०० | ० | ० | १७ | १२.२२ | १०६ | १७ |
| | एकूण | ४६७ | ३९५.५२ | ३०११ | ३२७.४३ | ३०७ | १६१ | १२३.८६ | ९८४ | ० | ३०७ | २०३.५७ | २०४१ | ३०७ |

**संदर्भ:** कोल्हापूर पाटबंधारे विभाग, कार्यकारी अभियंता कार्यालय, कागदपत्रे

## ४.४: प्रकल्पबाधित खातेदारांना देय भूखंड व पुनर्वसित गावठाणांची सद्यस्थिती:

आंबेओहोळ प्रकल्पामुळे आजारा तालुक्यातील उत्तूर, आर्दाळ, करपेवाडी, होन्याळी, हालेवाडी, महागौंड व वडकशिवाले या गावांमधील बाधित खातेदारांच्या पुनर्वसनासाठी एकूण ३०७ हे. भूखंड मजूर आहे. यामध्ये गडहिंग्लज तालुक्यातील लिंगनूर, कडगाव व जखेवाडी गावामध्ये अनुक्रमे ६० हे. , ८१ हे. व १६६ हे. भूखंड आहेत. बाधित खातेदारांना या मंजूर भूखंडामध्ये नागरी सुविधा व सेवा पुरवल्या जातात. लिंगनूर, कडगाव मधील मजूर भूखंडामध्ये अंतर्गत रस्त्यांचे बाजूने आरसीसी गटर, पाणी पुरवठ्यासाठी जीएसआर, वितरण व्यवस्था, अंतर्गत रस्ते, शाळा, समाजमंदीर, स्वच्छतागृह, स्मशानशेड इ. कामे प्रगतीत आहेत. परंतु जखेवाडी गावातील गावठाणे प्रस्तावित असून जागा व आराखडा निश्चित झालेला नाही.

**सारणी ४.५: प्रकल्पबाधित खातेदारांना देय भूखंड व पुनर्वसित गावठाणांची सद्यस्थिती**

| **अ.क्र.** | **बाधित गावे** | **पुनर्वसन आराखड्या प्रमाणे गावठाणे** | **प्रस्तावित गावठाणे** | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | मंजूर भुखंड | जागा निश्चित आहे का? | आराखडा तयार आहे का? | नागरी सुविधा कामांची सद्यस्थिती |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | उत्तूर, आर्दाळ करपेवाडी, होन्याळी, हालेवाडी, महागौंड, वडकशिवनें | लिंगनूर, ता. गडहिंग्लज | ६० | होय | होय | अंतर्गत रस्त्यांचे बाजूने आरसीसी गटर, पाणी पुरवठ्यासाठी जीएसआर, वितरण व्यवस्था, आंतर्गत रस्ते, शाळा,समाजमंदीर,स्वच्छतागृह , स्मशानशेड इ. कामे प्रगतीत आहेत. |
| २ | | कडगाव, ता. गडहिंग्लज | ८१ | होय | होय | |
| ३ | | जखेवाडी ता. गडहिंग्लज | १६६ | नाही | नाही | सदर गावठाण निश्चिती करून क्षेत्र संपादन कार्यवाहीसाठी मा.जिल्हाधिकारी कोल्हापूर यांचेकडे पत्रव्यवहार केला आहे. |
| | एकूण | | ३०७ | | | |

**तळटीप: उर्वरित १६६ भुखंडासाठी गावठाणासाठी / वसाहतीसाठी जागा निश्चित होणे आवश्यक आहे.**

**संदर्भ:** कोल्हापूर पाटबंधारे विभाग, कार्यकारी अभियंता कार्यालय, कागदपत्रे

### ४.५: प्रकल्पबाधित खातेदारांना सुधारित पुनर्वसन आराखड्याप्रमाणे देय भूखंड:

आंबेओहोळ प्रकल्पातील बाधित खातेदारांची एकूण संख्या ८२२ असून त्यापैकी ३५५ खातेदारांनी स्वेच्छा पुनर्वसन स्वीकारलेले आहे. उर्वरित ४६७ खातेदारांनी ६५ टक्के रक्कम शासनास भरणा केली आहे. सुधारित पुनर्वसन आराखड्याप्रमाणे प्रकल्पातील बाधित खातेदारांना आवश्यक पर्यायी देय क्षेत्र (अंदाजे) ३२८ हे. आर. इतके आहे. त्याकरिता आंबेओहोळ प्रकल्प लाभक्षेत्रामध्ये २९७ हे. आर. व चित्री प्रकल्प लाभक्षेत्रामध्ये ३१ हे. आर पर्यायी देय क्षेत्र उपलब्ध आहे.

**सारणी ४.६: सुधारित पुनर्वसन आराखड्याप्रमाणे प्रकल्पबाधित खातेदारांना देय भूखंड**

| अ. क्र | तपशील | संख्या |
|---|---|---|
| १ | एकूण बाधीत खातेदार | ८२२ |
| २ | स्वेच्छा पुनर्वसन स्वीकारलेले खातेदार | ३५५ |
| ३ | शासनास ६५ टक्के रक्कम भरलेले खातेदार | ४६७ |
| ४ | सुधारित पुनर्वसन आराखड्याप्रमाणे आवश्यक पर्यायी देय क्षेत्र हे. आर. (अंदाजे) | ३२८.०० |
| | १. आंबेओहोळ प्रकल्पाचे लाभक्षेत्रामध्ये उपलब्ध पर्यायी देय क्षेत्र हे.आर. | २९७.०० |
| | २. चित्री प्रकल्पाचे लाभक्षेत्रामध्ये उपलब्ध क्षेत्रापैकी आवश्यक पर्यायी देय क्षेत्र हे.आर. | ३१.०० |

**संदर्भ:** कोल्हापूर पाटबंधारे विभाग, कार्यकारी अभियंता कार्यालय, कागदपत्रे

### ४.६ सानुग्रह अनुदान मागणी प्रस्ताव:

प्रकल्पग्रस्तांच्या मागणीनुसार आंबेओहोळ प्रकल्पाचे बुडित क्षेत्रातील संपादनातून राहीलेल्या घरे, झाडे, विहिरी, पाईपलाईन, मेसकाठी इ.चे नुकसान भरपाई मिळणेसाठी फेरसंयुक्त मोजणीची कार्यवाही पुर्ण होऊन दि. १३/०८/२०१४ रोजीचे नियामक मंडळाचे ८८ व्या बैठकीमध्ये सदर रू.२.१३ कोटी रकमेच्या सानुग्रह अनुदान प्रस्तावास मंजूरी प्राप्त झाली असून निधी महसूल विभागाकडे वर्ग करणेत आला आहे.

### ४.७ निधी:

प्रकल्पाची मंजूर सुधारीत प्रशासकीय मान्यता किंमत (सन २००८-०९) रू.११४.९३ कोटी असून प्रकल्पाची अद्यावत किंमत (सन २०१६-१७) रू.२२७.५४ कोटी इतकी येत आहे. प्रकल्पावर

माहे ०३/२०१८ अखेर रू.१०९.३१ कोटी खर्च झाला आहे. सन २०१८-१९ साठी रू.१.०० कोटी निधीची तरतूद झाली आहे. भूसंपादन व पुनर्वसनासाठी रू.४५.०० कोटीची तसेच धरण व अनुषंगिक कामासाठी रू.४१.०० कोटी निधीची आवश्यकता आहे.

### ४.८ पुनर्वसन विषयक अडचणी:

१. एकूण ४६७ खातेदारांना ३२७.४३ हे. पर्यायी जमीन देय असून सद्य:स्थितीत जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांच्याकडे १६६.७७ हे. जमीनीचे निवाडे झाले असून त्यापैकी ४१.२१ हे. क्षेत्रावर उच्च न्यायालयाची स्थगिती आहे. उर्वरीत १२५.५६ हे. पैकी आतापर्यंत १६० प्रकल्पग्रस्तांना ८६.०२ हे. पर्यायी जमीनीचे वाटप झाले आहे. ३९.५४ हे. क्षेत्राचे वाटप होणे आवश्यक आहे. एकुण उर्वरीत ३०७ खातेदारांना २४१.४१ हे. जमीन त्वरीत वाटप होणे आवश्यक आहे. संपादीत क्षेत्रापैकी उच्च न्यायालयात दाखल झालेले दावे प्राथम्याने निकाली होणे आवश्यक.

२. लाभक्षेत्रामधील उर्वरीत गडहिंग्लज, बेकनाळ व महागोंडवाडी मध्ये एकूण ७२.८० हे.जमीन उपलब्ध होऊ शकते. त्याचे निवाडे नवीन कायद्यानुसार महसुल विभागाकडून त्वरीत होणे आवश्यक आहे.

३. चित्री लाभक्षेत्रामध्ये ६०.४१ हे. क्षेत्र उपलब्ध होत असून नविन भुसंपादन व पुनर्वसन अधिनियम सन २०१३ नुसार कलम ११ ची अधिसुचना दि.२०/०३/२०१७ रोजी प्रसिद्ध झाली आहे. सध्या ताब्यात असलेल्या जमिनीचे वाटप मा.उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) कोल्हापूर यांचेकडून शीघ्र गतीने जमिन वाटप करून कब्जा देणे गरजेचे आहे.

४. ८२२ खातेदारांपैकी ४६७ खातेदारांनी ६५% रक्कम भरून जमीन मागणी केली असून ३५५ खातेदारांनी स्वेच्छा पुनर्वसन स्विकारले आहे. स्वेच्छा अनुदान वाटप कार्यवाही क्षेत्रिय ठिकाणी चालू आहे. मंजूर ५.७० कोटी स्वेच्छा अनुदानापैकी ३.५९ कोटी अनुदान वाटप झाले आहे. उर्वरित रक्कम रू.२.११ कोटी वाटप गतीने होणे गरजेचे आहे. बुडीतातील जमीन मागणी करणा-या १८ प्रकल्पग्रस्तांनी पर्यायी जमीनी ऐवजी स्वेच्छा पुनर्वसन मागणी केलेली होती, त्यापैकी छाननीअंती

११ प्रकल्पग्रस्तांचा प्रारूप स्वेच्छा अनुदान निवाडा उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्र.६ कोल्हापूर यांचेकडून मा.जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना मंजूरीकरीता सादर करणेत आला आहे.

५. पुनर्वसनांतर्गत एकूण ३०७ प्रकल्पग्रस्तांना ३०७ भूखंड आवश्यक असून मौजे लिंगनूर व कडगांव ता.गडहिंग्लज येथील १४१ भुखंडाचे रेखांकन मंजूर असून नागरी सुविधा पुरविणेची कामे प्रगतीत आहेत. उर्वरित १६६ भुखंडासाठी गावठाण / वसाहतीसाठी जागा निश्चित होणेपूर्वी लाभक्षेत्रातील जमीन उपलब्धतेनुसार गावठाण निश्चिती करावी लागणार आहे. त्याकरीता आंबेओहोळ व चित्री लाभक्षेत्रातील निवाडे नविन कायद्यानुसार महसुल विभागाकडून त्वरीत होणे आवश्यक आहे.

६. एकुण देय ३२७.४३ हे.क्षेत्रापैकी आंबेओहोळ व चित्री लाभक्षेत्रातून २९९.९८ हे. क्षेत्र उपलब्ध होत आहे. उर्वरीत २७.४५ हे. क्षेत्र उपलब्ध होणे आवश्यक.

### ४.९ आंबेओहोळ प्रकल्पाचे लाभ:खर्च गुणोत्तर:

**सारणी ४.७: आंबेओहोळ प्रकल्पाचे लाभ:खर्च गुणोत्तर**

| अ. क्र | तपशील | रक्कम (रू लाखात) | % हिस्सा |
|---|---|---|---|
| अ | प्रकल्पाचा खर्च | | |
| | र) प्रकल्पाचा प्राक्कलित खर्च | २२७५४.६५ | ९७.८६ |
| | ल) खाजगी एल.आय योजनेचा खर्च | ४९७.४० | २.१४ |
| | प्रकल्पाचा एकूण खर्च | २३२५२.०५ | १०० |
| ब | वार्षिक लाभ | | |
| ख | र) सिंचन उत्पादनाचे स्थूल मूल्य (विधान क्र १ नुसार) | ४०५७.९४ | ७८.८८ |
| | ल) २.६४ लाख/ द.ल.घ.मी दरानुसार ६.६८३ द.ल.घ.मी. पेयजल पुरवठ्यापासून फायदा उदा. २.६४ □६.६६८३ = १७.६४ | १७.६४ | ०.३४ |
| | ल) ३२० लाख/ द.ल.घ.मी. दरानुसार ३.३४१ द.ल.घ.मी उद्योगांना पाणी पुरवठ्याचा फायदा (कच्चे पाणी) साठी. उदा. ३२०÷ ३.३४१= १०६९ | १०६९.०० | २०.७८ |
| | एकूण वार्षिक लाभ | ५१४४. ५८ | १०० |

| | | | |
|---|---|---|---|
| **खख** | वजात | | |
| | श) विद्यमान उत्पादनांचे एकूण मूल्य (विधान क्र.२ नुसार) | ८५९.४३ | ९२.७५ |
| | ष) पाण्याखाली जाण्याच्या विद्यमान उत्पादनांचे ०.२१८ लाख/हेक्टर नुसार ३०८ हेक्टरचे एकूण मूल्य. उदा. ०.२१८ □३०८ = ६७.१४ | ६७.१४ | ७.२५ |
| | एकूण वजात | ९२६.५७ | १०० |
| | निव्वळ वार्षिक लाभ = ५१४४. ५८ – ९२६.५७ | ४२१८.०१ | |
| **क** | वार्षिक खर्च | | |
| | र) प्रकल्पाच्या रू. २३२५२.०५ लाख भांडवली खर्चावर १०% दराने व्याज खर्च | २३२५.२१ | ७९.०० |
| | ल) एकूण प्रकल्प खर्चाच्या १.६७% दराने एकूण घसारा | ३८८.३१ | १३.१९ |
| | ळ) पंपाचा रू.१४३४३.४२ लाख  खर्चावर ८.३३% दराने पंपिंग प्रणालीचा घसारा (विधान क्रमांक –३ नुसार) १४३.४३ द ८.३३ / १०० | ११.९५ | ०.४१ |
| | व) पाईप आणि व्हॉल्व्हच्या खर्चावर ३.३३% दराने वाढता मुख्य घसारा | ६.६३ | ०.२३ |
| | श) उचल सिंचनासाठी वीज शुल्क (विधान क्र–३ नुसार) | १९६.०१ | ६.६६ |
| | ष) रू. २३८/ हे. दराने आय.पी ६३५९ हे. साठी वार्षिक देखभाल शुल्क<br>(जी.आर. २७/०८/२०१३ नुसार) | १५.१३ | ०.५१ |
| | एकूण वार्षिक खर्च | २९४३.२३ | १०० |
| **ड** | लाभ:खर्च गुणोत्तर = ४२१८.०१ / २९४३.२३ | १.४३ | |

**संदर्भ:** कोल्हापूर पाटबंधारे विभाग, कार्यकारी अभियंता कार्यालय, कागदपत्रे

आंबेओहोळ प्रकल्पाचा एकूण खर्च रू. २३२५२.०५ लाख आहे. यामध्ये प्राक्कलित खर्च रू. २२७५४.६५ लाख (९७.८६%) व खाजगी एल.आय योजनेचा खर्च रू. ४९७.४० लाख (२.१४%) आहे. या प्रकल्पाचा एकूण वार्षिक लाभ रू. ५१४४. ५८ लाख असून त्यामध्ये सिंचन उत्पादन एकूण मूल्याचे प्रमाण ७८.८८% (रू.४०५७.९४ लाख), पेयजल पुरवठ्या लाभाचे प्रमाण ०.३४% (रू. १७.६४ लाख) व उद्योगांना पाणी पुरवठ्यापासून प्राप्त लाभाचे प्रमाण २०.७८ % (रू. १०६९.०० लाख) आहे. या वार्षिक लाभातून रू. ९२६.५७ लाख वजात मूल्य कमी केले असता प्रकल्पाचा निव्वळ वार्षिक लाभ रू. ९२६.५७ लाख प्राप्त होतो. तर प्रकल्पाचा वार्षिक

खर्च विचारात घेतल्यास, भांडवली खर्चावरील व्याज खर्च रू. २३२५.२१ लाख (७९.० %), एकूण घसारा रू. ३८८.३१ लाख (१३.१९ %), पंपिंग प्रणालीचा घसारा खर्च रू. ११.९५ लाख (०.४१ %), पाईप आणि व्हॉल्व्हच्या खर्चावरील घसारा खर्च रू. ६.६३ लाख (०.२३ %), उचल सिंचनाचा वीज खर्च रू. १९६.०१ लाख (६.६६ %) आणि वार्षिक देखभाल खर्च रू. १५.१३ लाख (०.५१ %) असा एकूण वार्षिक खर्च रू. २९४३.२३ लाख आहे. आंबेओहोळ प्रकल्पाच्या वार्षिक लाभ-खर्चाचे गुणोत्तर १.४३ आहे.

### ४.१० आंबेओहोळ प्रकल्पाचा एकूण नफा:

### अ. सिंचित स्थितीतील एकूण नफा:

आंबेओहोळ प्रकल्पातंर्गत सिंचित स्थितीचा पीक-निहाय विचार केल्यास, खरीप हंगामातील ऊीळश्रश्रशव मका पिकांखाली सर्वाधिक ९८१ हे. (१५.४२ %) क्षेत्र आहे. त्याखालोखाल रब्बी हंगामातील उच्च उत्पादन गहू (१२० दिवस) ७८५ हे. (१२.३४ %), खरीप हंगामातील उच्च उत्पादन भुईमूग (१२०दिवस) ७४६ हे. (११.७३ %) व रब्बी हंगामातील हरभरा (७० दिवस) (असिंचित) ५८९ हे. (९.२६ %) पिकांचे क्षेत्र आहे. प्रकल्पातंर्गत सिंचित स्थितीतील सर्व पिकांचे एकूण क्षेत्र ६३६० हे. आहे. प्रती हेक्टर पिकांखालील क्षेत्रापासून मिळणारा एकूण फायदा रू. ४०५६७९८४९.३ (रू. ४०५६.७९ लाख) आहे. यामध्ये सर्वाधिक प्रती हेक्टर फायदा खरीप व रब्बी हंगामातील भाजीपाला पिकांपासून (२१.१३ %) मिळतो. प्रकल्पातंर्गत सिंचित स्थितीतील सर्व पिकांपासून ०.६३ लाख प्रती हेक्टर इतका फायदा प्राप्त होतो.

**सारणी ४.८: आंबेओहोळ प्रकल्पाचा सिंचित स्थितीतील एकूण नफा (१००० हेक्टर)**

| अ. क्र | पिकाचे नाव | क्षेत्र (हे.) | % हिस्सा | नफा/हे. | एकूण नफा | % हिस्सा |
|---|---|---|---|---|---|---|
| अ) | बारमाही पिके | | | | | |
| १ | ऊस (१२ महीने) | ३९३ | ६.१८ | १००९५४ | ३९६७४९२२ | ९.७८ |
| २ | आच्छादित ऊस | ११८ | १.८६ | १००९५४ | ११९१२५७२ | २.९४ |
| ब) | दोन हंगामी | | | | | |
| ३ | मिरची (१८० दिवस) | ३९३ | ६.१८ | २६६१२ | १०४५८५१६ | २.५८ |
| क) | खरीप हंगाम | | | | | |
| ४ | मका (१३५ दिवस) | ९८१ | १५.४२ | ३३९२३.५ | ३३२७८९५३.५ | ८.२० |
| ५ | भाजीपाला (१०० दिवस) | १९६ | ३.०८ | ४३७३१८.३ | ८५७१४३८६.८ | २१.१३ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **ड)** | खरीप हंगाम (असिंचित) | | | | | |
| ६ | उच्च उत्पादन ज्वारी (१२० दिवस) | ५१० | ८.०२ | ३४१७६ | १७४२९७६० | ४.३० |
| ७ | उच्च उत्पादन भुईमूग (१२०दिवस) | ७४६ | ११.७३ | १२५५७ | ९३६७५२२ | २.३१ |
| ८ | खरीप कडधान्य (७० दिवस) | १९६ | ३.०८ | ३८८५८ | ७६१६१६८ | १.८८ |
| ९ | मका (१३५ दिवस) | ३९३ | ६.१८ | ६४५२ | २५३५६३६ | ०.६३ |
| **इ)** | रब्बी हंगाम (सिंचित) | | | | | |
| **१०** | उच्च उत्पादन गहू (१२० दिवस) | ७८५ | १२.३४ | ५१४५५ | ४०३९२१७५ | ९.९६ |
| **११** | भाजीपाला (१०० दिवस) | १९६ | ३.०८ | ४३७३१८ | ८५७१४३२८ | २१.१३ |
| **१२** | बटाटे(१०० दिवस) | १९६ | ३.०८ | ३०१३७ | ५९०६८५२ | १.४६ |
| **१३** | रब्बी ज्वारी (१२० दिवस) | २७५ | ४.३२ | ७०७७३ | १९४६२५७५ | ४.८० |
| **१४** | हरभरा (७० दिवस) (असिंचित) | ५८९ | ९.२६ | ४१३७८ | २४३७१६४२ | ६.०१ |
| **ई)** | उन्हाळी हंगाम | | | | | |
| **१५** | उच्च उत्पादन भुईमूग | ३९३ | ६.१८ | ३०१३७ | ११८४३८४१ | २.९२ |
| **एकूण** | | ६३६० | १०० | | ४०५६७९८४९.३ | १०० |
| **फायदा = ०.६३ लाख/हे.** | | | | | | |

**संदर्भ:** कोल्हापूर पाटबंधारे विभाग, कार्यकारी अभियंता कार्यालय, कागदपत्रे

आंबेओहोळ प्रकल्पातंर्गत असिंचित स्थितीचा पीक-निहाय विचार केल्यास, भात पिकांखालील क्षेत्र सर्वाधिक ७८५ हे. (२०%) असून त्याखालोखाल भुईमूग ७४५.७५ हे. (१९ %), गवत वर्गीय पिकाचे क्षेत्र ६६७.२५ हे. (१७ %) व ज्वारी ६२८ हे. (१६ %) असा क्रम लागतो. कापूस या नगदी पिकाखालील क्षेत्र ३९.२५ हे. (१%) सर्वात कमी आहे. असिंचित स्थितीत सर्व पिकांखाली एकूण ३९२५ हे. क्षेत्र आहे. असिंचित स्थितीत प्रती हेक्टर पिकांखालील क्षेत्रापासून मिळणारा एकूण फायदा रू. ८५९४३३३०.७५ (रू.८५९.४३ लाख) असून सर्वाधिक प्रती हेक्टर फायदा ऊस आणि तंबाखू या पिकापासून (२३.०५ %) मिळतो. असिंचित स्थितीतील सर्व पिकांपासून मिळणारा प्रती हेक्टर फायदा ०.२१ लाख इतका आहे.

### ४.११ पिकांचा आकृतीबंध:

आंबेओहोळ प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील पिकांचा आकृतीबंधानुसार, सर्व पिकांखाली एकूण ८७२ हेक्टर क्षेत्र आहे. त्यामध्ये सर्वाधिक क्षेत्र ऊस या पिकाखाली ७०० हे. (८०.२८%) असून खालोखाल भात ४० हे. (४.५९%), ज्वारी ४० हे. (४.५९%) व कापूस २० हे. (२.२९%) पिकांचे क्षेत्र आहे. पीक आकृतीबंधानुसार असे दिसून येते की, आंबेओहोळ प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात नगदी पिकांखाली क्षेत्र सर्वाधिक असून धान्य पिकांखालील क्षेत्र कमी आहे.

**सारणी ४.९: विद्यमान पिकांचा आकृतीबंध**

| अ. क्र | पिकाचे नाव | क्षेत्र (हे.) | % हिस्सा |
|---|---|---|---|
| १ | भात | ४० | ४.५९ |
| २ | ज्वारी | ४० | ४.५९ |
| ३ | इतर तृणधान्ये | २५ | २.८७ |
| ४ | कडधान्ये | ८ | ०.९२ |
| ५ | ऊस | ७०० | ८०.२८ |
| ६ | इतर धान्यपिके (नाचणी) | ७ | ०.८० |
| ७ | भुईमूग | १० | १.१५ |
| ८ | कापूस | २० | २.२९ |
| ९ | तंबाखू | ५ | ०.५७ |
| १० | गवत | १७ | १.९५ |
| **एकूण** | | ८७२ | १००.०० |

**संदर्भ:** कोल्हापूर पाटबंधारे विभाग, कार्यकारी अभियंता कार्यालय, कागदपत्रे

### ४.१२ प्रकल्पाच्या कमांड क्षेत्रातील पिकांसाठी पाणी महसूली दर व सुधार पट्टीची वसुली:

आंबेओहोळ प्रकल्पाच्या कमांड क्षेत्रातील पिकनिहाय पाण्याचा महसूली दराचा विचार केल्यास, सर्वाधिक दर ऊस पिकासाठी प्रति हेक्टर रू. ६२९० असून भाजीपाला व बटाटे पिकांसाठी प्रति हेक्टर रू. १२००, उच्च उत्पादन भुईमूगासाठी प्रति हेक्टर रू. १०५०, मिरचीसाठी प्रति हेक्टर रू. ७२०, टोमॅटो प्रति हेक्टर रू. ६०० व गहू पिकासाठी प्रति हेक्टर रू. २४० असा दर आहे. खरीप हंगामातील असिंचित पिकांसाठी पाण्याचा महसुली दर आकारला जात नाही. सर्व पिकांखाली एकूण ६३५८.४ हेक्टर क्षेत्र असून त्यापासून एकूण रू. ५४३३९५६ महसूलाची वसुली झाली आहे. या महसुली व सुधार पट्टीच्या वसुलीचा एकूण चालू खर्च रू. २२११८४ आहे.

**सारणी ४.१०: सिंचन क्षेत्र/ कमांड क्षेत्रासाठी पाणी महसूली दर व सुधार पट्टीची वसुली**

| अ. क्र | पिकाचे नाव | क्षेत्र (हे.) | पाण्याचा दर (प्रति हे.) | महसूल वसूल | चालू खर्च रु.५१.०० |
|---|---|---|---|---|---|
| अ) | बारमाही पीके | | | | |
| १ | ऊस (१२ महीने) | ३९२.५० | ६२९० | २४६८८२५ | २००१७ |
| २ | आच्छादित ऊस ३०.४०.१० | ११८.०० | ६२९० | ७४२२२० | ६०१८ |
| ब) | | दोन हंगामी | | | |
| ३ | मिरची (१८० दिवस) | ३९२.५० | ७२० | २८२६०० | २००१७ |
| क) | खरीप हंगाम | | | | |
| ४ | मका | ९८१.०० | २४० | २३५४४० | ५००३१ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | टोमॅटो | १९६.०० | ६०० | ११७६०० | ९९९६ |
| ड) | खरीप हंगाम (असिंचित) | | | | |
| ६ | ज्वारी | ५१०.३ | ० | ० | ० |
| ७ | भुईमूग | ७४५.८ | ० | ० | ० |
| ८ | कडधान्य | १९६.३ | ० | ० | ० |
| ९ | मका | ३९२.५ | ० | ० | ० |
| इ) | | पीकवार अनुसरण | | | |
| १० | गहू | ७८५.०० | ४७०.०० | ३६८९५० | ४००३५ |
| ११ | भाजीपाला | १९६.२५ | १२००.०० | २३५५०० | १०००५ |
| १२ | बटाटे | १९६.२५ | १२००.०० | २३५५०० | १००९ |
| १३ | रब्बी ज्वारी | २७४.७५ | ४७०.०० | १२९१३३ | १४०१२ |
| १४ | उच्च उत्पादन भुईमूग | ३९२.५० | १०५०.०० | ४१२१२५ | २००१८ |
| १५ | हरभरा | ५८८.७५ | ३५०.०० | २०६०६३ | ३००२६ |
| | एकूण | ६३५८.४ | | ५४३३९५६ | २२११८४ |

**संदर्भः** कोल्हापूर पाटबंधारे विभाग, कार्यकारी अभियंता कार्यालय, कागदपत्रे

### ४.१३ प्रकल्पाचा एकूण खर्चः

आंबेओहोळ प्रकल्पाच्या प्रत्यक्ष शुल्कचा (अ) एकूण खर्च रू. २२६१८.२४ लाख व अप्रत्यक्ष शुल्कचा (ब) एकूण खर्च रू. १३६.४१ लाख आहे. त्यामुळे प्रकल्प खर्च 'अ' आणि 'ब' यांचा एकत्रित खर्च रू. २२७५४.६५ लाख आहे. प्रत्यक्ष शुल्कचा (अ) एकूण खर्चात मुख्य कार्यावरील शुल्क रू. २१९०२.८७ लाख (९६.२६ %), मुख्य शुल्क खर्चावर अस्थापना शुल्क रू. ५२९.३७ लाख (२.३३%), रजा आणि निवृत्ती वेतनाचे शुल्क रू. १.३२ लाख (०.०१ %) आणि टी व पी शुल्क रू. १८४.६८ लाख (०.८१ %) खर्च आहे. तर अप्रत्यक्ष शुल्कचा (ब) एकूण खर्चामध्ये लेखापरीक्षण आणि खाते शुल्क रू. ५२.९४ लाख (०.२३ %), सचिवालय शूल्क रू. २.६५ लाख (०.०१ %) व जमीन महसूलाच्या संपत्तीचे भांडवल शुल्क रू. ८०.८२ लाख (०.३६ %) आहे. प्रकल्पाच्या एकूण खर्चात प्रकल्प खर्च 'अ' आणि 'ब' यांचा हिस्सा अनुक्रमे ९९.४० % व ०.६० % आहे.

## सारणी ४.११: प्रकल्पाचा एकूण खर्च

| अ. क्र | खर्च तपशील | | रक्कम (रू. लाखात) | % हिस्सा |
|---|---|---|---|---|
| अ) | प्रत्यक्ष शुल्क | | | |
| ख) | I– मुख्य कार्य शुल्क | | २१९०२.८७ | ९६.२६ |
| II) | i) I– मुख्य शुल्क खर्चावर अस्थापना शुल्क १० % दराने, ब–जमीन (समतोल कार्यावर) वगळता, ११४८४.३४ – ६१९०.६५ | ५२९३.६९ | ५२९.३७ | २.३३ |
| | ii) अस्थापना खर्चाच्या ०.२५% दराने ५२९.३७ लाख रक्कमेवरील रजा आणि निवृत्ती वेतनाचे शुल्क | | १.३२ | ०.०१ |
| | I– मुख्य कार्यावर ३.५० % दराने टी व पी शुल्क, ब–जमीन व क्यू टी व पी च्या खर्चाशिवाय ११४८४.३४ – ६२०७.६७ | ५२७६.६७ | १८४.६८ | ०.८१ |
| | एकूण 'अ' | | २२६१८.२४ | ९९.४० |
| III) | वजात: | | | |
| | वैयक्तिक वाहकांच्या खर्चाव्यतिरिक्त अविशिष्ट मूल्याचे ९५% नुसार पुनर्विक्रीची जमा आणि वसुली. | | | |
| | १) रू. ० लाखांवर २० %ने वैयक्तिक वाहक | ० | ०.०० | |
| | २) तात्पुरती इमारतींच्या खर्चाच्या १५% दराने तात्पुरती इमारतीचे तारण मूल्य कमी करा | ०.०० | ०.०० | |
| | प्रत्यक्ष शुल्कचा (अ) एकूण खर्च | | २२६१८.२४ | |
| अ) | अप्रत्यक्ष शुल्क | | | |
| १) | ब–जमीन खर्च वगळता ख– मुख्य कार्याच्या खर्चावर १% नुसार लेखापरीक्षण आणि खाते शुल्क | ५२९३.६९ | ५२.९४ | ०.२३ |
| २) | अस्थापना शुल्काच्या खर्चावर रू. ५२९.३७ लाखावर ०.५% नुसार सचिवालय शूल्क | ५२९.३७ | २.६५ | ०.०१ |
| ३) | ब–जमीन खर्चाचे ५% दराने जमीन महसूलाच्या संपत्तीचे भांडवल | १६१६.४४ | ८०.८२ | ०.३६ |
| | **अप्रत्यक्ष शुल्काचा (ब) एकूण खर्च** | | १३६.४१ | ०.६० |
| **अ आणि ब प्रकल्पाचा एकूण खर्च** | | | २२७५४.६५ | १००.०० |

**संदर्भ:** कोल्हापूर पाटबंधारे विभाग, कार्यकारी अभियंता कार्यालय, कागदपत्रे

# प्रकरण: ५
# आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्पाचे अवलोकन

## प्रास्ताविक

हिरण्यकेशी आंबेओहोळ मध्यम प्रकल्प ता. आजरा, जि. कोल्हापूर हा आर्दाळ या गावानजिक हिरण्यकेशी नदीखोऱ्यातील आंबेओहोळ या नाल्यावर बांधण्यात येत आहे. हा मध्यम प्रकल्प कृष्णा खोरे विकास महामंडळाअंतर्गत ''उर्वरित महाराष्ट्र'' या प्रदेशांतर्गत मोडतो. या प्रकल्पांतर्गत धरणाचे खालील बाजूस ७ को. प. बंधारे प्रस्तावित आहेत. या को. प. बंधाऱ्यामधून तसेच जलाशयामधून खाजगी उपसांद्वारे आजरा व गडहिंग्लज तालुक्यातील एकूण ३९२५ हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ प्रस्तावित आहे. याशिवाय पिण्यासाठी ०.२३६ द.घ.फू व औद्योगिक वापरासाठी ०.११८ द.घ.फू पाणीवापर प्रस्तावित आहे.

## ५.१ प्रशासकीय मान्यतेचा तपशील:

प्रकल्पाच्या मूळ प्रशासकीय मान्यता व आतापर्यंतच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | प्रमा/सुप्रमा प्रस्ताव | मान्यतेचा तपशील | दरसूचीचे वर्ष | रक्कम (रू. कोटी) | सिंचन क्षेत्र (हे.) (ICA) | धरणाचा एकूण पाणीसाठी (दलघमी) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मूळ प्रशासकीय मान्यता | महामंडळ निर्णय क्र. (२९८)(२०७/९८) म.प्र.१ दि. १६/१०/९८ | १९९६-९७ | २९.३१ | ३९२५ | ३५.११ |
| २ | प्रथम सुप्रमा | शासन निर्णय सु.प्र.मा. २००९/८५५/(२६७)/ २००९ मो.प्र. दि.०८/०१/२०१० | २००८-०९ | ११४.९३ | ३९२५ | ३५.११ |
| ३ | द्वितीय सुप्रमा | प्रस्तावित | २०१६-१७ | २२७.५४ | ३९२५ | ३५.११ |
| **१२/२०१६ अखेर प्रकल्पावर रू. १०४.१८ कोटी (अद्ययावत किंमतीच्या ४५.७९ टक्के) इतका खर्च झाला आहे.** | | | | | | |

**संदर्भ:** कोल्हापूर पाटबंधारे विभाग, कार्यकारी अभियंता कार्यालय, कागदपत्रे

## ५.२ प्रकल्पाचा सर्वसाधारण आराखडा:

हिरण्यकेशी आंबेओहोळ मध्यम प्रकल्प ता. आजरा, जि. कोल्हापूर अंतर्गत हिरण्यकेशी नदीखोऱ्यातील आंबेओहोळ या नाल्यावर आर्दाळ या गावानजिक मातीचे धरण बांधण्यात येत आहे.

धरणाची एकूण साठवण क्षमता ३५.११ द.ल.घ.मी. १.२४ दघफू इतकी आहे. प्रकल्पांतर्गत एकूण ८ को. प. बंधारे प्रस्ताविक आहेत. त्यामधून खाजगी उपसा सिंचनाद्वारे आजरा तालुक्यातील ४५० हे. व गडहिंग्लज तालुकयातील २६१५ हे. अशा प्रकारे एकूण ३०६५ हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे. तसेच जलाशयावरील खाजगी उपसांद्वारे आजरा तालुक्यातील ८६० हे. क्षेत्रास सिंचनलाभ देणे नियोजित आहे. अशा प्रकारे प्रकल्पाद्वारे एकूण ३९२५ हे. क्षेत्रास सिंचनलाभ प्रस्तावित आहे.

## ५.३ प्रकल्पाचे प्रमुख घटक:

प्रकल्पाचे प्रमुख घटक पुढीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | घटक | तपशील | | | |
|---|---|---|---|---|---|
| **१** | माती धरण | एकूण लांबी १९१५ मी., महत्त्म उंची २७.७८ मी. | | | |
| **२** | सांडवा | उकबील प्रकारचा सांडवा – एकूण लांबी – १६० मी., द्वारविरहित.<br>संकल्पित पूर विसर्ग – ५४८ घमी/सेकंद | | | |
| **३** | सिंचन तथा विद्युत विमोचक | १.३० मी. व्यास, १००.०० मी. लांबीचा पतनळ,<br>विसर्ग क्षमता – ३.४५६ घमी/सेकंद | | | |
| ४ | को. प. बंधारे (७) | **अ. क्र.** | **धरणापासून अंतर (मी)** | **साठवण क्षमता (दलघमी)** | **सिंचन क्षेत्र (हे.)** |
| | | १ | १२५० | ०.०२५२ | ३०० |
| | | २ | १६२० | ०.०१८४ | १४९ |
| | | ३ | २२२० | ०.०३२४ | १४९ |
| | | ४ | ४१५५ | ०.०४३५ | ३१७ |
| | | ५ | ७२३० | ०.१४४० | ४६६ |
| | | ६ | १०३३० | ०.१९३० | ७६४ |
| | | ७ | १३६०० | ०.२१२१ | ९२० |
| एकूण | | | | | **३०६५** |

**संदर्भ:** कोल्हापूर पाटबंधारे विभाग, कार्यकारी अभियंता कार्यालय, कागदपत्रे

## ५.४ पाणी वापर:

धरणाचा उपयुक्त पाणीसाठा १.१५२ अघफू इतका आहे. प्रकल्पाच्या पाणीवापर १.११४ दघफू असून त्याची फोड खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| **१** | **सिंचनासाठीचा पाणीवापर** | **०.६५८ दघफू** |
| २ | पिण्यासाठीचा पाणीवापर | ०.२३६ दघफू |
| ३ | औद्योगिक पाणीवापर | ०.११८ दघफू |
| ४ | बाष्पीभवन व्यय | ०.१३२ दघफू |
| | एकूण | **१.१४४ दघफू** |

**संदर्भ:** कोल्हापूर पाटबंधारे विभाग, कार्यकारी अभियंता कार्यालय, कागदपत्रे

## ५.५ सिंचन प्रकार:

प्रकल्पाचे सिंचनक्षेत्र ३९२५ हे. इतके असून त्याची फोड खालीलप्रमाणे आहे.

| प्रवाही सिंचन | उपसा सिंचन | | |
|---|---|---|---|
| | **को.पं.बंधाऱ्याद्वारे उपसा सिंचन (हे.)** | **जलाशयातून उपसा सिंचन (हे.)** | **एकूण (हे.)** |
| ० | ३०६५ | ८६० | ३९२५ |

**संदर्भ:** कोल्हापूर पाटबंधारे विभाग, कार्यकारी अभियंता कार्यालय, कागदपत्रे

## ५.६ कालवा निहाय/जिल्हा निहाय क्षेत्र:

| जिल्हा | तालुका | जलाशय/को.प. बंधारा | सिंचन क्षेत्र (हे.) |
|---|---|---|---|
| **कोल्हापूर** | आजरा | को. प. बंधारे | ४५० |
| | | जलाशयातून उपसा | ८६० |
| | गडहिंग्लज | को. प. बंधारे | २६१५ |
| | एकूण | | ३९२५ |

**संदर्भ:** कोल्हापूर पाटबंधारे विभाग, कार्यकारी अभियंता कार्यालय, कागदपत्रे

मंजूर प्रमाणानुसार नदीच्या दोन्ही तीरावरील १२० फूट उंचीपर्यंतच्या क्षेत्रास सिंचन लाभ देणे नियोजित आहे.

## ५.७ प्रकल्पाची ठळक वैशिष्ट्ये:

प्रकल्पाची मंजूर प्रथम सुप्रमा व प्रस्तावित द्वितीय सुप्रमानुसारची ठळक वैशिष्ट्ये कोल्हापूर पाटबंधारे विभागाच्या आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प टिप्पणीतील **परिशिष्ट क्र. १** वर जोडली आहेत तसेच प्रकल्पाचा दर्शक नकाशा **परिशिष्ट क्र. २** वर जोडला आहे.

## ५.८ प्रचलित नियमानुसार आवश्यक मान्यता व त्याबाबतची सद्य:स्थिती:

### ५.८.१ पाणी उपलब्धता:

- या प्रकल्पाची प्रशासकीय मान्यता ऑक्टोबर १९९८ मधील म्हणजेच मुख्य अभियंता, नियाजन व जलविज्ञान, नाशिक यांचेकडून पाणी उपलब्धता प्रमाणपत्र घेण्याच्या दि. २४/१२/२००३ रोजीच्या शासन निर्णयापूर्वीची असल्याने त्यावेळेस योजनेसाठी स्वतंत्र पाणी उपलब्धता प्रमाणपत्र घेतलेले नाही.

- प्रशासकीय मान्यता व मंजून प्रथम सु.प्र.मा. अहवालानुसार धरणस्थळी ७५% विश्वासार्हतेनुसारचा एकूण येवा १.१६७ अघफू इतका आहे. हा येवा काढण्यासठी सन १९६४-६१९६५ ते सन १९९३-९४ या कालावधीतील मौजे आजरा, मडिलगे व आर्दाळ येथील पर्जन्यमानाचा विचार करण्यात आल्याचे प्रकल्प अहवालात नमूद आहे.

- दि. २०/१०/२००१ रोजीच्या केंद्र शासनास लिहिलेल्या पत्रामधील कृष्णा खोऱ्यातील एकूण ५९९ अघफू पाणीवापराच्या तपशीलामध्ये हिरण्यकेशी आंबेओहोळ प्रकल्पासाठी १.१४४ अघफू पाण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

### ५.८.२ कृषी विभागाने मंजूर केलेली पीक रचना:

दि. १९/११/१९८१ रोजीच्या कृषी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्रानुसार मध्यम प्रकल्पाच्या पीकरचनेस मंजूरी देण्याचे अधिकार संबंधित विभागीय कृषी सहसंचालक (विस्तार) यांना आहेत.

मंजूर प्रमा अहवालात विचारात घेतलेली पीक रचना ही चिकोत्रा प्रकल्पासाठी मंजूर असलेल्या पीक रचनेनुसार विचारात घेतली असल्याचे प्रमा अहवालात नमूद आहे. तथापित, या पीकरचनेच्या मान्यतेचे पत्र प्रमा अहवालात उपलब्ध नाही. प्रमा अहवालातील पीकरचना मंजूर प्रथम तसेच प्रस्तावित द्वितीय सुप्रमा अहवालात विचारात घेतलेली असून प्रथम सुप्रमास शसनाने मान्यता दिली आहे. प्रमा अहवालात घेतलेल्या पीकरचनेप्रमाणेच प्रस्तावित द्वितीय सुप्रमा अहवालात पीकरचना विचारात घेतलली आहे. प्रस्तावित सुप्रमा अहवालानुसार अस्तित्वातील पीकरचना व प्रस्तावित पीकरचना खालीलप्रमाणे आहे.

**अ) अस्तित्वातील पीकरचना:**

| अ. क्र. | पिकाचे नाव | टक्केवारी |
|---|---|---|
| | | |
| १ | भात | २०.०० |
| २ | ज्वारी | १६.०० |
| ३ | इतर कडधान्ये | ०९.०० |
| ४ | डाळी | ०५.०० |
| ५ | ऊस | ०५.०० |
| ६ | इतर पिके | ०३.०० |
| ७ | भूईमूग | १९.०० |
| ८ | कापूस | ०१.०० |
| ९ | तंबाखू | ०५.०० |
| १० | गवत | १७.०० |
| | एकूण | **१००.००** |

**संदर्भ:** कोल्हापूर पाटबंधारे विभाग, कार्यकारी अभियंता कार्यालय, कागदपत्रे

**ब) प्रस्तावित पीकरचना:**

| अ. क्र. | पिकाचे नाव | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | बारमाही पिके | |
| | ऊस | १०.०० |
| | Sugarcane overlap | ०३.०० |
| २ | दु हंगामी | |
| | हळद | १०.०० |

| | | |
|---|---|---|
| ३ | खरीप हंगामी (सिंचित) | |
| | खरीप हंगामी | ४७.०० |
| ४ | रब्बी पिके | |
| | गहू | २०.०० |
| | भाजीपाला | ०५.०० |
| | बटाटा | ०५.०० |
| | रब्बी जवार | ०७.०० |
| | उन्हाळी भूईमूग | १०.०० |
| | हरभरा (सिंचित नसलेले) | १५.०० |
| | एकूण | **१६२.००** |

**संदर्भ:** कोल्हापूर पाटबंधारे विभाग, कार्यकारी अभियंता कार्यालय, कागदपत्रे

प्रस्तावित पीकरचनेनुसार सिंचनासाठीचा एकूण पाणीवापर ०.६५८ अघफू इतका असून त्याचा तपशील परिशिष्ट क्र. ५ मध्ये नमूद आहे. सिंचनासाठीचा पाणीवापर काढताना एकूण कार्यक्षमता (NIR/GIR) ७२% इतकी विचारात घेतलेली आहे. प्रस्तावित पीकरचनेनुसारच्या एकूण १६२% पैकी Unirrigated साठीची ६२% पीकरचना वगळता या पीकरचनेनुसारचा सिंचनासाठीचा पाणीवापर २११ हे./दलघमी इतका आहे.

### ५.८.३ महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण मान्यता, तसेच मान्यतेच्या अटीची असल्यास पूर्तता:

- सदर प्रकल्पास प्रशासकीय मान्यता सन १९९८ मध्ये म्हणजे महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५ अस्तित्वात येण्यापूर्वीची आहे.
- मंजूर प्रथम सुप्रमाच्या तुलनेत प्रस्तावित द्वितीय सुप्रमामध्ये प्रकल्पाच्या सिचनक्षेत्रामध्ये (I.C.A.) तसेच उपयुक्त पाणीसाठ्यामध्ये वाढ प्रस्तावित नाही% याचा विचार करता शासन निर्णय दि. १६/११/२०१६ मधील तरतुदीनुसार या प्रस्तावास महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या मान्यतेची आवश्यकता नाही.

### ५.८.४ पर्यावरण मान्यता:

या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता सन १९९८ या वर्षात मिळालेली आहे. त्यावेळी पर्यावरण विभागाची दि. २७/०१/१९९४ ची अधिसूचना (EIA Notification, 1994) लागू होती. या अधिसूचनेनुसार रू. ५० कोटी किंमतीपेक्षा जास्त किंमत असणाऱ्या मोठ्या प्रकल्पांना पर्यावरण मान्यतेची आवश्यकता होती. या योजनेचे लागवडीलायक क्षेत्र ४२६६ हे. असल्याने हा प्रकल्प मध्यम प्रकल्प या प्रकारात मोडतो. याचा विचार करता १९९४ च्या अधिसूचनेनुसार या प्रकल्पास पर्यावरण मान्यतेची आवश्यकता नव्हती.

सद्य:स्थितीत दिनांक २५/०६/२०१४ रोजीची अधिसूचना लागू आहे. या अधिसूचनेनुसार २००० हे. पेक्षा जास्त लागवडीलायक क्षेत्र असणाऱ्या **नवीन** प्रकल्पांना पर्यावरण मान्यतेची आवश्यकता आहे.

याचा विचार करता या प्रकल्पास पर्यावरण मान्यतेची आवश्यकता नाही.

### ५.८.५ वन विभागाची मान्यता:

प्रकल्पांतर्गत कामासाठी वन जमिनीची आवश्यकता नसल्याने वन विभागाच्या मान्यतेची आवश्यकता नाही, असे मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, पुणे यांनी अवगत केले आहे.

### ५.८.६ केंद्रीय जल आयोगाची मान्यता:

केंद्र शासनाच्या प्रचलित मार्गदर्शक सूचनांनुसार आंतरराज्यीय नद्यांवरील मोठ्या व मध्यम प्रकल्पांना केंद्रीय जल आयोगाच्या मान्यतेची आवश्यकता आहे. या योजनेस केंद्रीय जल आयोगाची मान्यता अद्याप घेण्यात आलेली नाही. त्याबाबत मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, पुणे यांनी खालीलप्रमाणे अवगत केले आहे.

‘‘प्रकल्प पूर्णत्वाच्या टप्प्यावर आहे. प्रकल्पास शासन अंशदान तसेच नाबार्ड-२० अंतर्गत परतावा स्वरूपात कर्जसहाय्य मंजूर असलेने केंद्रीय जल आयोगाची मान्यता घेण्यात आलेली नाही.’’



# प्रकरण: ६
# आंबेओहोळ प्रकल्प भूमि अधिग्रहण व पुनर्वसनविषयक अवलोकन

## ६.१ पुनर्वसन व भूसंपादन विषयक:

सदर प्रकल्पांतर्गत ७ गावांच्या जमिनी बाधीत होत आहेत. तथापि कोणतेही गावठाण पूर्णत: अथवा अंशत: बाधीत होत नाही. प्रकल्पबाधीत खातेदारांसाठी ३ पुनर्वसित गावठाणे विकसित करणे प्रस्तावित आहे. पुनर्वसनाबाबतची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे.

## ६.२ भूसंपादन सद्य:स्थिती:

या प्रकल्पासाठी फक्त खाजगी जमिन आवश्यक असून भूसंपादन सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | प्रकल्प घटक | मंजूर प्रथम सुप्रमानुसार आवश्यक क्षेत्र (हे.) | प्रस्तावित द्वितीय सुप्रमानुसार आवश्यक क्षेत्र (हे.) | संपादित क्षेत्र (हे.) | उर्वरित क्षेत्र (हे.) | उर्वरित संपादनाची सद्य:स्थिती | उर्वरित भूसंपादनासाठीची वस्तुनिष्ठ आर्थिक तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | धरण व बुडित क्षेत्र | ३९४.७० | ३९५.५२ | ३५२.५२ | ०.०० | संपादन पूर्ण | उर्वरित भूसंपादनसाठीची तरतूद सन २०१३ च्या नवीन कायद्यनुसार करण्यात आलेली आहे. उर्वरित भूसंपादनासाठी रू. ४६.४३ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित त्रितीय सुप्रमामध्ये करण्यात आलेली आहे. |
| २ | लाभक्षेत्रातील जमिन (पर्यायी जमिन) | ३५० | ३२८ | १६५ | १६३ | खालील टीप पहावी. | |
| एकूण | | **७४४.७०** | **७२३.५२** | **५६०.५२** | **१६३** | | |

**संदर्भ:** कोल्हापूर पाटबंधारे विभाग, कार्यकारी अभियंता कार्यालय, कागदपत्रे

- प्रकल्पबाधीतांना वाटप करण्यासाठीच्या पर्यायी जमिनीपैकी १६३ हे. इतक्या जमिनीचे अद्याप संपादन करणे बाकी आहे. यापैकी ७७ हे. इतकी जमिन निश्चित झालेली असून त्याच्या भूसंपादनाच्या प्रस्तावाची सद्य:स्थिती ''कलम-११'' वर

अशी आहे. उर्वरित ८६ हे. इतक्या पर्यायी जमिनीची निश्चिती होण्याची कार्यवाही महसूल विभागामार्फत प्रगतीपथावर आहे. याबाबतची निश्चिती झाल्यानंतर भूसंपादनाची कार्यवाही हाती घेणे प्रस्तावित आहे असे मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, पुणे यांनी अवगत केले आहे.

- प्रकल्पबाधीत व्यक्तींना पर्यायी जमिन देय होण्यासाठी त्यांनी त्यांच्या बाधीत क्षेत्रातून संपादन होणाऱ्या जमिनीच्या मोबदला रक्कमेपैकी ६५% रक्कम शासनाकडे ठेव म्हणून जमा करावी लागते. प्रकल्पबाधीत व्यक्तींना लाभक्षेत्रात पर्यायी जमीन देईपर्यंतच्या कालावधीसाठी या ठेव रक्कमेवर प्रतिवषी १२% याप्रमाणे व्याज शासन ठराव दि. २४/११/१९८६ अन्वये देय आहे. अशाप्रकारे ६५% ठेव रक्कमेवरील व्याजापोटी व निर्वाह भत्त्यापोटी या प्रकल्पाअंतर्गत आतापर्यंत रू. १७८.१२ लक्ष इतकी रक्कम प्रकल्पबाधीतांना अदा करण्यात आली असून उर्वरित कालावधीसाठी यापोटी रू. ४१.०० लक्षची तरतूद करण्यात आली आहे.

## ६.३ प्रकल्पग्रस्तांची सर्वसाधारण माहिती:

| अ. क्र. | गावे | क्षेत्र (हे. आर) | एकूण प्रकल्पग्रस्त | स्वेच्छा घेतलेले | ६५ टक्के रक्कम भरलेले/ पर्यायी जमिन मिळणेस पात्र | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | **प्रकल्पग्रस्त** | **देय क्षेत्र (हे)** |
| १ | उत्तूर | १८.२३ | ४६ | २४ | २२ | १५.०९ |
| **उत्तूर रस्ता व खाण** | | १०.०७ | | | | |
| | वाढीव उत्तूर | ५.०६ | | | | |
| २ | आर्दाळ | ८९.०२ | २४० | १०४ | १३६ | ९०.९६ |
| | वाढीव आर्दाळ | १५.४२ | | | | |
| ३ | वडकशिवाले | १२.७७ | ४५ | २८ | १७ | १२.२२ |
| ४ | महागोंड | १०.४३ | २६ | ७ | १९ | १२.२१ |
| ५ | हालेवाडी | ६४.९७ | १५९ | ६६ | ९३ | ६०.५५ |
| ६ | करपेवाडी | ९८.६७ | १५४ | ५९ | ९५ | ७३.०० |
| ७ | होन्याळी | ७०.७० | १५२ | ६७ | ८५ | ६३.४० |
| एकूण | | **३९५.५२** | **८२२** | **३५५** | **४६७** | **३२७.४३** |

**संदर्भ:** कोल्हापूर पाटबंधारे विभाग, कार्यकारी अभियंता कार्यालय, कागदपत्रे

### ६.४ पर्यायी जमिन वाटप:

एकूण ४६७ प्रकल्पग्रस्तांना ३२७.४३ हेक्टर क्षेत्र देय आहे. माहे जुलै २०१६ अखेर ८० पात्र प्रकल्पग्रस्तांना ६२.०० हे. आर क्षेत्राचे वाटप करण्यात आलेले आहे. शिल्लक ३८७ प्रकल्पग्रस्तांना २७० हे. आर क्षेत्र देय आहे.

### ६.५ स्वेच्छा पुनर्वसन:

एकूण ८२२ प्रकल्पग्रस्तांपैकी ३५५ प्रकल्पग्रस्तांनी स्वेच्छा पुनर्वसन स्विकारलेले आहे. स्वेच्छा निवाडेनुसार मंजूर झालेल्या ५.३८ कोटी रू. अनुदानापैकी ३.४८ कोटी रूपयांचे वाटप प्रकल्पग्रस्तांना केलेले आहे. प्रकल्पग्रस्तांकडून आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करून घेऊन करपेवाडी वगळता इतर गावातील शिल्लक अनुदान वाटपाची प्रक्रिया उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र. ६ कोल्हापूर यांचेमार्फत सुरू आहे.

बाधीत गाव करपेवाडी ९१.११ हे. आर अंतिम निवाडा व मोबदला वाटप पूर्ण असून जमिनीचे मूळ मालक श्री. जगतगुरू स्वामी यांनी कुळ खातेदारांना मोबदला वाटप चुकीचा झाले संदर्भात उच्च न्यायालयात दाखल केलेले रिट पिटीशन क्र. ७०९७/२०१२ अंतिम निर्णयावर प्रलंबित असलेमुळे करपेवाडीचे स्वेच्छा पुनर्वसन अनुदान रक्कम रू. १,१६,५४५/- अद्याप वाटप करणेचे शिल्लक आहे. अतिरिक्त १७ प्रकल्पग्रस्तांचा प्रारूप निवाडा अंतिम मान्यतेवर असून अनुदान प्राप्त झालेनंतर वाटपाची कार्यवाही करत आहे.

लाभक्षेत्रातील भूसंपादनाची सद्य:स्थिती पुढीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | तालुका | गाव | निवाडेप्रमाणे जाहीर (क्षेत्र/हे) | उच्च न्यायालयाची भूसंपादनास स्थगिती |
|---|---|---|---|---|
| १ | आजरा | उत्तूर | ७१.२८ | २९.०३ |
| २ | | मुमेवाडी | ९.०६ | ० |
| ३ | | करपेवाडी | १.६० | ० |
| ४ | | चव्हाणवाडी | १.४३ | ० |
| ५ | | होन्याळी | २.३३ | ० |
| ६ | | महागोंड | १.५२ | ० |
| ७ | | वडकशिवने | १.४६ | ० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | | पेंढारवाडी | १.८० | ०.८० |
| ९ | | आर्दाळ | १३.८६ | ६.७० |
| १० | | **एकूण** | **१०४.३४** | **३६.५३** |
| ११ | गडहिंग्लज | शिप्पूर | २.३५ | १.७५ |
| १२ | | कडगांव | ४०.५३ | २१.५८ |
| १३ | | लिंगनूर | ८.३० | २.४१ |
| १४ | | करंबळी | १२.८८ | ० |
| १५ | | अत्याळ | १०.२७ | ० |
| १६ | | गिजवणे | २.९० | ० |
| एकूण | | | **७७.५३** | **२०.९७** |
| एकूण एकंदर | | | **१८१.५७** | **५९.१३** |

**संदर्भ:** कोल्हापूर पाटबंधारे विभाग, कार्यकारी अभियंता कार्यालय, कागदपत्रे

## ६.६ शिल्लक पात्र प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिन वाटपाचे नियोजन:

| अ. क्र. | तपशील | क्षेत्र (हे) | शेरा |
|---|---|---|---|
| १ | चित्री लाभक्षेत्रातून नियोजित संपादन प्रस्ताव | ५७.०० | गडहिंग्लज तालुक्यातील मौजे भडगांव, बेळगुंदी, गडहिंग्लज, दुंडगे, हसूरचंपू, हेब्बाळ, क। नूल, जरळी, मुगळी असे १० गावांमधील भूसंपादन प्रस्ताव उ.वि.अ. गडहिंग्लज यांचेकडे नवीन भूसंपादन कायद्यानुसार एसआयए चे स्तरावर आहेत. |
| २ | आंबेओहोळ लाभक्षेत्रातील नियोजित भूसंपादन प्रस्ताव | ७२.८६ | आंबेओहोळ लाभक्षेत्रातील गडहिंग्लज तालुक्यातील गडहिंग्लज व बेकनाळ असे मिळून एकूण ६८.०४ क्षेत्राचे भूसंपादन प्रस्ताव उ.वि.अ. गडहिंग्लज यांचेकडे नवीन भूसंपादन कायद्यानुसार एसआयए चे स्तरावर आहेत. |
| ३ | आंबेओहोळ पहिल्या टप्प्यासाठी संपादित केलेले शिल्लक क्षेत्र | ६१.४० | पहिल्या टप्प्यामध्ये उत्तूर, करपेवाडी, आर्दाळ या गावांचा समावेश आहे. सदर गावातील प्रकल्पग्रस्त खातेदार यांचे पसंती अर्ज घेणेसाठी जाहीरनामा दि. २४/२/२०१६ इ. रोजी संबंधित गावचावडीवर प्रसिद्ध करणेत आलेले आहेत. |
| ४ | प्रारूप निवाडे स्तरावर उच्च न्यायालय स्थगिती असलेले क्षेत्र | २९.०३ | शिप्पूर, कडगांव, लिंगनूर, ता. गडहिंग्लज येथील आंबेओहोळ प्रकल्पातील लाभक्षेत्रातील गावचे प्रारूप निवाडे विशेष भूसंपादन अधि क्र. १३ यांचेकडून मंजूर झलेले आहेत. तथापित सदर प्रारूप निवाडेस मा. उच्च न्यायालय यांनी रिट पिटीशन क्रमांक ११९५८/२०१३ मध्ये स्थगिती दिलेली आहे. |
| ५ | उच्च न्यायालय स्थगिती असलेले क्षेत्र | ५९.१३ | अंतिम निवाडे झालेले प्रकरणात खातेदारांनी भू.सं.कायदा कलम ४८ (१) अन्वये मा. विभागीय आयुक्तसो, पुणे विभाग, पुणे यांनी दिलेल्या निर्णयास उच्च न्यायालयात २२ रिट याचिका दाखल करून स्थगिती मिळवली आहे. |
| एकूण | | | **२७९.४२** |

**संदर्भ:** कोल्हापूर पाटबंधारे विभाग, कार्यकारी अभियंता कार्यालय, कागदपत्रे

## ६.७ भूखंड वाटप:

| अ. क्र. | मंजूर गावठाणे | पाडलेले भूखंड | पैकी वाटप केलेले भूखंड | पैकी शिल्लक भूखंड | जागा निश्चित आहे का? | नागरी सुविधा सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | लिंगनूर, ता. गडहिंग्लज | ६० | ० | ६० | होय | एकूण १८ सुविधा मंजूर असून नागरी सुविधांची कामे प्रगतीपथावर आहेत. |
| २ | कडगांव, ता. गडहिंग्लज | ८१ | ० | ८१ | होय | |
| ३ | जखेवाडी, ता. गडहिंग्लज | १६६ | ० | ० | नाही | |
| | **एकूण भूखंड** | **३०७** | **०** | **१४१** | | |

| अ. क्र. | **बाब** | **सद्य:स्थिती** |
|---|---|---|
| १ | बाधीत गावठाणे | निरंक |
| २ | पुनर्वसित गावठाणे | ३<br>१. कडगांव, ता. गडहिंग्लज<br>२. लिंगनूर, ता. गडहिंग्लज<br>३. तिसरे गावठाण अद्याप निश्चित होणे बाकी आहे. |
| ३ | बाधीत खातेदार | ८२२ |
| ४ | ६५ टक्के रक्कम भरणा केलेले खातेदार | ४६७ |
| ५ | स्थलांतरीत खातेदार | निरंक |
| ६ | आवश्यक पर्यायी जमिन | ३२८ हे. |
| ७ | संपादित पर्यायी जमिन | १६५ हे. |

**संदर्भ:** कोल्हापूर पाटबंधारे विभाग, कार्यकारी अभियंता कार्यालय, कागदपत्रे

आंबेओहोळ प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातून पुनर्वसनासाठी आवश्यक संपूर्ण ३२८ हे. इतकी जमिन उपलब्ध होऊ शकत नसल्याने उर्वरित जादाचे आवश्यक क्षेत्र इतर प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातून उपलब्ध करून देण्याबाबतची कार्यवाही महसूल खात्याकडून प्रगतीपथावर आहे. ही कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर त्याआधारे तिसऱ्या पुनर्वसित गावठणाची जागा निश्चित करणे शक्य होणार आहे. पुनर्वसन प्रक्रिया पूर्ण झालेखेरीज घळभरणीच्या कामास प्रकल्पग्रस्तांचा तीव्र विरोध असल्याचे मुख्य अभियंता (ज.सं.) पुणे यांनी अवगत केले आहे.

## ६.८ नागरी सुविधांच्या कामांची सद्य:स्थिती:

प्रकल्पांतर्गत तीन पुनर्वसित गावठाणे विकसित करणे प्रस्तावित असून उपरोक्त मुद्दा क्र. ७.१ मध्ये नमूद केल्यानुसार सद्य:स्थितीत मौजे लिंगनूर व कडगांव येथील पुनर्वसित गावठाणांची निश्चिती

झाली असून उर्वरित तिसऱ्या गावठाणाची जागा निश्चित होणे बाकी आहे. लिंगनूर व कडगांव या पुनर्वसित गावठाणातील नागरी सुविधांची बहुतांशी कामे ९०% पूर्ण झालेली असून याबाबतची नागरी सुविधानिहाय कामाची सद्य:स्थिती **परिशिष्ट क्र. ७** मध्ये नमूद करण्यात आली आहे.

### ६.९ प्रकल्प घटकांची बांधकाम सद्य:स्थिती:

प्रकल्प घटकांची बांधकाम सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | घटक | बांधकाम सद्य:स्थिती |
|---|---|---|
| १ | माती धरण | ७५% काम पूर्ण, घळभरणी बाकी |
| २ | सांडवा व पुच्छ कालवा | ८०% काम पूर्ण |
| ३ | सिंचन तथा विद्युत विमोचक | ९५% काम पूर्ण |
| ४ | को. प. बंधारे ७ | कामास अद्याप सुरूवात नाही. |
| ५ | धरण पोहोच रस्ता व धरणमाथा रस्ता | कामास अद्याप सुरूवात नाही. |

**संदर्भ:** कोल्हापूर पाटबंधारे विभाग, कार्यकारी अभियंता कार्यालय, कागदपत्रे

### ६.१० निर्मित पाणीसाठा, सिंचन क्षमता व तिचा प्रत्यक्ष वापर :

प्रकल्पाची घळभरणी अद्याप झालेली नसल्याने प्रकल्पांतर्गत पाणीसाठा तसेच सिंचनक्षमता निर्माण झालेली नाही.

| तपशील | एकूण पाणीसाठा (दलघमी) | सिंचन क्षेत्र (ICA) (हे) |
|---|---|---|
| **प्रकल्पीय** | ३५.११ | ३९२५ |
| **प्रत्यक्षात निर्मित** | ०.०० | ० |

**संदर्भ:** कोल्हापूर पाटबंधारे विभाग, कार्यकारी अभियंता कार्यालय, कागदपत्रे

### ६.११ उर्वरित कामाचा घटकनिहाय भौतिक व आर्थिक तपशील:

प्रकल्पावर माहे १२/२०१६ अखेर रू. १०४.१८ कोटी इतका खर्च झालेला असून उर्वरित कामाची किंमत रू. १२३.३६ कोटी इतकी आहे. उर्वरित कामांचा भौतिक व आर्थिक तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | बाब | भौतिक तपशील | आर्थिक तपशील (रू/कोटी) | |
|---|---|---|---|---|
| | | | | **एकूण** |
| **१** | भूसंपादन | i) बुडित क्षेत्र संपादनापोटी मंजूर निवाड्यानुसार देय रक्कम | ०.७० | **५२.२०** |
| | | ii) पर्यायी जमिन संपादनापोटी मंजूर निवड्यानुसार देय रक्कम | ४.८६ | |
| | | iii) उर्वरित पर्यायी जमिन संपादन १६३ हे. | ४६.४३ | |
| | | iv) भूसंपादनाची मंजूर न्यायालयीन प्रकरणे | ०.२१ | |
| **२** | पुनर्वसन | ६५% ठेव रक्कमेवरील देय व्याज व निर्वाह भत्ता | ०.४१ | **९.७०** |
| | | **अ) प्रगतीपथावरील निविदांमधील उर्वरित कामे** | | |
| | | i) लिंगनूर गावठाणातील उर्वरित नागरी सुविधा कामे | १.७१ | |
| | | ii) कडगाव गावठाणातील उर्वरित नागरी सुविधा कामे | २.४२ | |
| | | **ब) अद्याप निविदा निश्चित न झालेली कामे** | | |
| | | i) लिंगनूर गावठाणातील उर्वरित नागरी सुविधा कामे | ०.१८ | |
| | | ii) कडगाव गावठाणातील उर्वरित नागरी सुविधा कामे | ०.१९ | |
| | | iii) प्रस्तावित तिसऱ्या गावठाणातील उर्वरित सुविधा कामे | ४.६० | |
| | | iv) विद्युत वाहिनी स्थलांतरणाचे काम | ०.१९ | |
| **३** | माती धरण | **अ) प्रगतीपथावरील निविदामधील उर्वरित कामे** | | **३५.४४** |
| | | i) खोदकाम २८.८३ सघमी | ०.२९ | |
| | | ii) गाभा व कवच भराव ३८५.८५ सघमी | ११.४७ | |
| | | iii) वाळू गाळणी ४६.०३ सघमी | ३.४१ | |
| | | iv) रॉक टो १९.१५ सघमी | १.३९ | |
| | | v) अश्म पटल १५३.६७ सचौमी | २.५९ | |
| | | vi) भाववाढ | १२.७४ | |
| | | vii) इतर बाबी | ३.५५ | |
| **४** | सांडवा | **अ) प्रगतीपथावरील निविदांमधील उर्वरित कामे** | | **६.३४** |
| | | i) उर्वरित खोदकाम ७३.७९ सघमी | १.६६ | |
| | | ii) संधानक ४.३३ सघमी | २.५५ | |
| | | iii) लोहसळी व पोहोच पूल ७७.८७ मे. टन | ०.३६ | |
| | | iv) भाववाढ | १.०२ | |
| | | v) इतर बाबी | ०.७५ | |
| **५** | सिंचन तथा विद्युत विमोचके | i) उर्वरित पेनस्टॉक व यांत्रिकी कामे | १.५४ | |
| | | ii) खोदकाम १.६१ सघमी | ०.०२ | |
| | | iii) संधानक ०.०९ सघमी | ०.०२ | |
| | | iv) लोहसळी व पोहोच पूल ५२.२० मे. टन | ०.१५ | |
| | | v) भाववाढ | ०.१७ | |
| | | vi) इतर बाबी | ०.०१ | |
| **६** | को. प. बंधारा | अ) **अद्याप निविदा निश्चित न झालेली कामे** | | **६.६४** |
| | | १) को. प. बंधारा क्र. १ | १.२४ | |
| | | २) को. प. बंधारा क्र. २ | ०.८५ | |
| | | ३) को. प. बंधारा क्र. ३ | ०.८७ | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | ४) को. प. बंधारा क्र. ४ | ०.८४ | |
| | | ५) को. प. बंधारा क्र. ५ | ०.८२ | |
| | | ६) को. प. बंधारा क्र. ६ | ०.८५ | |
| | | ७) को. प. बंधारा क्र. ७ | ०.७५ | |
| | | ८) पाणी वापर संस्था स्थापन करणे | ०.४२ | |
| ७ | इतर उपशिर्षातील उर्वरित तरतूदी | १) ए – प्राथमिक | ०.०६ | |
| | | २) पी – देखभाल | ०.५२ | |
| | | ३) आर – रस्ते | | |
| | | a) धरण पोहोच रस्ता व धरण माथा रस्ता खडीकरण धरण पोहोच रस्ता लांबी – २.५ किमी, धरण माथा रस्ता लांबी – २.० किमी | ०.७० | |
| | | b) धरण पोहोच रस्ता व धरण माथा रस्ता डांबरीकरण | ०.८३ | |
| | | ४) के – इमारती | ०.०९ | |
| | | ५) ओ – संकीर्ण | ०.१९ | |
| | | ६) क्यू – हत्यारे व अवजारे | ०.१७ | |
| | | ७) एम – वृक्षारोपण | ०.०५ | |
| | | **एकूण कामे (१ ते ७)** | | **११४.८४** |
| ८ | अनुषंगिक खर्च | आस्थापना व इतर | ८.५२ | **८.५२** |
| एकूण उर्वरित किंमत (१ ते ८) | | | | **१२३.३६** |

**संदर्भः** कोल्हापूर पाटबंधारे विभाग, कार्यकारी अभियंता कार्यालय, कागदपत्रे

## ६.१२ उर्वरीत कामांची अंदाजपत्रके:

प्रकल्पाची उर्वरित किंमत रू. १२३.३६ कोटी असून त्यापैकी अद्याप निविदा निश्चित न झालेल्या कामाची किंमत रू. १३.४३ कोटी आहे. उर्वरित कामाच्या तरतुदीच्या अनुषंगाने खालील मुद्दे निदर्शनास येतात.

१. प्रस्तावित तीन पुनर्वसन गावठाणापैकी अद्याप एका गावठाणाची जागा महसूल खात्याकडून निश्चित झालेली नसल्याने त्या गावठाणामध्ये देय असलेल्या नागरी सुविधांची तरतूद ही कडगांव वसाहतीच्या नागरी सुविधांच्या अंदाजपत्रकावर आधारित असून असे करताना कडगांव वसाहतीच्या नागरी सुविधांच्या एकूण किंमतीवर २५% इतकी वाढ गृहित धरली आहे.

२. धरण परिसरातील विद्युत वाहिनी स्थलांतरणासाठी ढोबळमानाने १९.०० लक्ष (मंजूर प्रथम सुप्रमामधील तरतुदीवर ८% प्रतिवर्षी अशी वाढ गृहित धरून) इतकी तरतूद करण्यात आलेली आहे.

३. एकूण सात को. प. बंधाऱ्यांपैकी एका को. प. बंधाऱ्यावरील रस्त्याची रूंदी ४.२५ मी. तर उर्वरित सहा को. प. बंधाऱ्यावरील रस्त्याची रूंदी २.५० मी. इतकी आहे. यासाठीची अंदाजपत्रके मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांनी को. प. बंधाऱ्यासाठी तयार केलेल्या नमुना रेखाचित्रावर आधारित आहेत.

को. प. बंधाऱ्यासाठीच्या अंदाजपत्रकामध्ये लोहसळीसाठी कळंबोलीपासून कार्यक्षेत्रापर्यंत ४५६ कि.मी. इतके वहन अंतर विचारात घेतलेले आहे. या वहन अंतर प्रस्तावास अधीक्षक अभियंता, कोल्हापूर पाटबंधारे मंडळ, कोल्हापूर यांनी दि. २३/१२/२०१६ रोजीच्या पत्रान्वये मान्यता दिलेली असून त्यामध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे. ''प्रमाणित करण्यात येते की, प्रस्तावात उपरोक्त नमूद लोह हे बांधकाम साहित्य जलसंपदा विभागाची दरसूची सन २०१६-१७ मध्ये नमूद केलेल्यानुसार मुंबई (कळंबोली) येथून घेण्यात आले आहे.'' तथापित अशी तरतूद जलसंपदा विभागाची दरसूची सन २०१६-१७ मध्ये निदर्शनास येत नाही.

४. को. प. बंधाऱ्यावर तसेच उपसा सिंचन क्षेत्रावर पाणी वापर संस्था स्थापन करण्यासाठी रू. ४१.९५ लक्षची तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये प्रामुख्याने लाभक्षेत्र सर्वेक्षण करणे, लाभधारकांची यादी तयार करणे, प्रशिक्षण देणे इ. प्रमुख बाबी अंतर्भूत आहेत. या बाबींसाठीचे दर जलसंपदा विभाग, नागपूर व अमरावती प्रादेशिक दरसूची सन २०११-१२ नुसार घेण्यात आले आहे.





# प्रकरण: ७

# आंबेओहोळ सिंचन प्रकल्पबाधित गावांची पार्श्वभूमी

**प्रास्ताविक:**

प्रस्तुत प्रकरणात आम्ही आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्पबाधित शेतकऱ्यांच्या गावांच्या सर्वेक्षणावर आधरित विवेचनाचा समावेश करत आहोत. अर्थात प्रकल्पबाधित शेतकऱ्यांची शेतजमिन प्रस्तुत सिंचन प्रकल्पामुळे बाधित होत असताना प्रकल्पबाधितांची गावे मात्र सिंचन प्रकलपाच्या पाण्याखाली जात नाहीत. प्रस्तुत प्रकल्पात उत्तूर , होन्याळी, करपेवाडी, वडकशिवणे, महागोंड, हालेवाडी व आर्दाळ अशी एकूण सात गावांची शेतजमिन कमी अधिक प्रमाणात बुडणार आहे. पर्यायाने या सात गावांतील एकूण ८६८ शेतकरी प्रकल्पबाधित होतात. उपरोल्लेख केल्याप्रमाणे या प्रकल्पबाधितांची शेतजमिन प्रकल्पात जाते परंतु त्यांची गावे अबाधित राहत असल्याने निवासी पुनर्वसनाचा प्रश्न निर्माण होत नाही. परंतु असे असले तरी या सर्व सात गावांतील कमी अधिक प्रमाणात शेतकऱ्यांची शेतजमिन प्रकल्पबाधित होत असल्यामुळे त्यांच्या आर्थिक व उदरनिर्वाहविषयक पुनर्वसनाचा प्रश्न गंभीर असल्यामुळेच प्रस्तुत प्रकल्पाचे काम गेली अनेक वर्षे रखडलेले आहे. पर्यायाने प्रकल्पव्ययात प्रचंड वृद्धी होवून प्रकल्पबाधितांच्या आर्थिक व उदरनिर्वाह पुनर्वसनाचा प्रश्न गंभीर बनला आहे. प्रस्तुत प्रकल्पाच्या कृषि प्रकल्पबाधितांना गडहिंग्लज तालुक्यात पुनर्वसनार्थ शेतजमिनी देवू करण्याची तयारी कोल्हापूर पाटबंधारे व महसूल विभागाने आरंभिली असली तरी संबंधित शेतकऱ्यांची प्रकल्पबाधितांना जमिन देण्याची तयारी नसल्यामुळे न्यायालयात दावे दाखल केले आहेत. त्यामुळे पुनर्वसनाचा जवळजवळ संपूर्ण मुद्दाच न्यायप्रविष्ट झाला असल्याकारणाने आंबेओहोळ प्रकल्पबाधितांचा प्रश्न जटिल बनला आहे. आंबेओहोळ प्रकल्पबाधित प्रत्येक गावाच्या वेगवेगळ्या समस्या आहेत. उदाहरणार्थ मौजे करपेवाउी येथील शेतकऱ्यांची जमिन अनेक पिढ्या त्यांच्याकडे आहे. संबंधित शेतकरी ती जमिन कसतात. संबंधित शेतजमिन कागदोपत्री त्यांच्या नावे आहे. त्यांच्या

नावे ७/१२ व ८-अ उताराही निघतो. परंतु संबंधित शेतजमिनी इनामी जमिनी असल्यामुळे इतर हक्कात देवस्थान ट्रस्टचे नाव लागलेले आहे. या प्रकरणी देवस्थान ट्रस्टची अशी भूमिका आहे की करपेवाडीच्या सर्व शेतजमिनी देवस्थान ट्रस्टच्या इनामी व पर्यायाने मालकीच्या असल्यामुळे संबंधित प्रकल्पबाधित शेतकऱ्यांचा त्या जमिनींवर काहीही अधिकार संभवत नाही. अर्थात हे योग्य नाही. देवस्थान ट्रस्टचे असे म्हणणे आहे की; प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना त्यांच्या प्रकल्पबाधन जमिनीच्या बदल्यात पुनर्वसन धोरणांतर्गत जमिन न देता प्रती एकर रोख रक्कम आदा करण्याचे धोरण स्विकारावे. परंतु संबंधित रोख रक्कम प्रत्यक्ष प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना देता कामा नये. कारण करपेवाडीच्या प्रस्तुत प्रकल्पबाधित शेतजमिनी प्रत्यक्षात देवस्थान ट्रस्टच्या मालकीच्या असल्याने त्यापोटी देय असलेली रक्कम शेतकरी प्रकल्पबाधितांऐवजी देवस्थान ट्रस्टला आदा करण्यात यावी असा देवस्थान ट्रस्टचा दावा आहे. अशा प्रकारे आंबेओहोळ सिंचन प्रकल्प पुनर्वसनाचा प्रश्न व पर्यायाने प्रकल्पपूर्ततेची समस्या गंभीर स्वरूप धारण करते असे आमच्या लक्षात आले.

आंबेओहोळ प्रकल्पात एकूण सात गावचे शेतकरी बाधित होत असल्यामुळे संबंधित गावांचे एक बृहत सर्वेक्षण करण्यात आले. संबंधित गावांची एकंदरीत सामाजिक, आर्थिक, जनगनाविषयक, पायाभूत सुविधाविषयक, आरोग्य, ....... इत्यादीविषयक स्थिती कशी आहे हे समजून घेणे प्रस्तुत सर्वेक्षणाचा मूळ उद्देश होता. निम्नउर्ध्वृत सारणींमध्ये आम्ही सर्वेक्षणप्राप्त आकडेवारीचे पृथक्करण देवून त्याचे विश्लेषण केले आहे.

**सारणी ७.१:** आंबेओहोळ प्रकल्पबाधितांच्या गावांची जनगणनाविषयक आकडेवारी

| | उत्तूर | होन्याळी | करपेवाडी | वडकशिवणे | महागोंड | हालेवाडी | आर्दाळ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पुरुष | ३८०८ | ७२६ | २९७ | ४१५ | ४६५ | ५६४ | ७०० |
| स्त्री | ४०२० | ९२७ | २४८ | ५१३ | ५७१ | ६२७ | ७९१ |
| एकूण | ७७२८ | १६५५ | ६४५ | ९२८ | १०३६ | ११९१ | १४९१ |
| लिंग प्रमाण | १०५५.६७ | १२७६.८५ | ११७१.७१ | १२३६.१४ | १२२७.९५ | ११११.७० | ११३०.०० |
| कुटुंबाची संख्या | १९३४ | ५५० | १७७ | २६९ | १९१ | ३३५ | ४०६ |
| कुटुंबाचे सरासरी आकारमान | ४ | ३ | ४ | ३ | ४ | ४ | ४ |
| दारिद्र्य रेषेखालील कुटुंब | २७२ | ८० | ३५ | २८ | १४६ | NA | ८६ |
| दारिद्र्य रेषेखालील कुटुंब % | १४.०६ | १४.५५ | १९.७७ | १०.४१ | ५०.१७ | NA | २१.१८ |
| भूमिहीन शेतमजूर | ५०३ | ६७ | ०८ | १४ | १७ | ०३ | ३३ |
| भूमिहीन शेतमजूर % | ६.५१ | ४.०५ | १.२४ | १.५१ | १.६४ | ०.२५ | २.२१ |
| कास्तकार | १६४४ | ६४७ | २४३ | ३३६ | ५४४ | २४७ | ७६७ |
| कास्तकार % | ८५.०१ | ११७.६४ | १३७.२९ | १२४.९१ | १८६.९१ | ७३.७३ | १८८.९२ |

**संदर्भ:** गावनिहाय ग्रामपंचायत सर्वेक्षण

उपरोल्लेखित सारणी क्रमांक एक मध्ये आपणास आंबेओहोळ प्रकल्पबाधित शेतकऱ्यांच्या सर्व सातही गावांची लोकसंख्या, दारिद्र्य, भूमिहीन शेतमजून व लागवडदारविषयक माहिती उपलब्ध होताना दिसून येते. आकडेवारीवरून प्रकल्पबाधित सर्व गावांसंबंधी सामान्यपणे एक बाब समोर येते व ती म्हणजे सर्व गांवातील लिंग प्रमाण आश्चर्यकारकपणे सुधारणावादी असल्याचे दिसून येते. संबंधित लिंग प्रमाण अनुक्रमे (उत्तूर) १०५५.६७, (होन्याळी) १२७६.८५, (करपेवाडी) ११७१.७१, (वडकशिवण) १२३६.१४, (महागोंड) १२२७.९५, (हालेवाडी) ११११.७० आणि (आर्दाळ) ११३०.०० असे दिसून आले. सर्व गावांतील दारिद्र्यरेषेच्या खालील कुटुंबांच्या प्रमाणाचा विचार केला तर हे प्रमाण अनुक्रमे १४.०६, १४.५५, १९.७७, १०.४१, ५०.१७ (हालेवाडीची आकडेवारी उपलब्ध होवू शकली नाही) आणि २१.१८ टक्के असे दिसून आले. या गावांमधील भूमिहीन शेतमजूरांचे प्रमाण ०६.५१, ०४.०५,

०१.२४, ०१.५१, ०१.६४, ००.२५ आणि ०२.२५ टक्के असे दिसून येते. भूमिहीन शेतमजूरांचे प्रमाण कमी असले तरी संबंधित गावांमधील असे शेतमजूर भरपूर पर्जन्यमानामुळे शेतमजुरीबरोबरच स्वत:चा दुधाचा व्यवसाय करतात. कारण जनावरांना देण्यासाठी भरपूर चारा या भागात सहज व मोफत उपलब्ध होत असल्याने त्यांना असे करणे शक्य आहे. विशेष म्हणजे आर्दाळ (५१.४४ टक्के) आणि महागोंड (५२.५० टक्के) वगळता इतर गावांमधील कास्तकारांचे प्रमाणही महाराष्ट्रातील इतर गावांच्या तुलनेत कमीच असल्याचे निदर्शनास येते. कुटुंब आकारमानाचा विचार केला तर ते सरासरी तीन किंवा चार सदस्य असल्याची नोंद मिळते. एकदंरीत व सर्वसमावेशकपणे या सर्व प्रकल्पबाधित गावांचा विचार केला तर आकडेवारीवरून आपणास असाच निष्कर्ष मिळतो की संबंधित गावांची सामाजिक परिस्थिती महाराष्ट्रातील इतर सामान्य गावांपेक्षा फारशी वेगळी नाही. पर्यायाने प्रकल्पबाधितांच्या आर्थिक पुनर्वसनासंदर्भात जलसंधारण खात्याने सर्वसमावेशक विचार करून त्यांच्या जमिनीच्या-बदल्यात-जमिन देवून योग्य पुनर्वसन करणे अत्यावश्यक आहे.

## सारणी ७.२: आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्पबाधितांच्या गावांची मूलभूत पायाभूत सुविधांविषयक स्थिती

| अ. क्र. | तपशील | उत्तूर | | होन्याळी | | करपेवाडी | | वडकशिवणे | | महागोंड | | हालेवाडी | | आर्दाळ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Y | N | Y | N | Y | N | Y | N | Y | N | Y | N | Y | N |
| १ | गावातील अंतर्गत रस्ते डांबरी आहेत का? | १ | २ | १ | २ | १ | २ | १ | २ | १ | २ | १ | २ | १ | २ |
| २ | जवळच्या शहराला जोडणारा रस्ता आहे का? | १ | २ | १ | २ | १ | २ | १ | २ | १ | २ | १ | २ | १ | २ |
| ३ | गावात पोस्ट ऑफीस आहे का? | १ | २ | १ | २ | १ | २ | १ | २ | १ | २ | १ | २ | १ | २ |
| ४ | गावात वीज आहे का? | १ | २ | १ | २ | १ | २ | १ | २ | १ | २ | १ | २ | १ | २ |
| ५ | गावात भारनियमन आहे का? | २ | १ | २ | १ | २ | १ | २ | १ | २ | १ | २ | १ | २ | १ |
| ६ | गावात दवाखाना आहे का? | १ | २ | १ | २ | २ | १ | १ | २ | १ | २ | २ | १ | १ | २ |
| ७ | पाण्याच्या विहिरी | १ | २ | २ | १ | २ | १ | १ | २ | २ | १ | २ | १ | १ | २ |
| ८ | पिण्याच्या पाण्याचे बोअर्स/हातपंप | १ | २ | १ | २ | १ | २ | १ | २ | १ | २ | १ | २ | १ | २ |
| ९ | गावात नळपाणी पुरवठा योजना आहे का? | १ | २ | १ | २ | १ | २ | १ | २ | १ | २ | १ | २ | १ | २ |
| १० | गावात टँकरद्वारे पाणी पुरवठा होतो काय? | २ | १ | २ | १ | २ | १ | २ | १ | २ | १ | २ | १ | २ | १ |
| ११ | गावात टेलिफोन लाईन आहे का? | १ | २ | १ | २ | १ | २ | २ | १ | २ | १ | २ | १ | १ | २ |
| १२ | गावात मैला वाहणारी गटारे आहेत का? | २ | १ | २ | १ | २ | १ | २ | १ | २ | १ | २ | १ | १ | २ |
| १३ | गावात सांडपाण्याची गटारे आहेत का? | १ | २ | १ | २ | १ | २ | २ | १ | २ | १ | २ | १ | १ | २ |
| १४ | गावात कचरा गोळा करण्यासाठी व्यवस्था आहे का? | २ | १ | २ | १ | २ | १ | २ | १ | २ | १ | २ | १ | १ | २ |
| १५ | गावात वाचनालय आहे का? | १ | २ | १ | २ | १ | २ | २ | १ | २ | १ | २ | १ | १ | २ |
| १६ | पाणी कट्टा, पारावरच्या गप्पा असे उपक्रम चालतात का? | २ | १ | २ | १ | २ | १ | २ | १ | २ | १ | २ | १ | १ | २ |

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १७ | बँक | १ | २ | २ | १ | १ | २ | २ | १ | २ | १ | १ | २ | २ | १ |
| १८ | बस स्टँड | १ | २ | १ | २ | १ | २ | २ | १ | २ | १ | २ | १ | १ | २ |
| १९ | किराणा मालाचे दुकान | १ | २ | १ | २ | १ | २ | २ | १ | २ | १ | २ | १ | १ | २ |
| २० | वि. का. स. से. सोसायटी | १ | २ | २ | १ | २ | १ | २ | १ | १ | २ | १ | २ | २ | १ |
| २१ | महिला मंडळ | १ | २ | १ | २ | १ | २ | १ | २ | १ | २ | १ | २ | २ | १ |
| २२ | तरूण मंडळ | १ | २ | २ | १ | २ | १ | २ | १ | २ | १ | २ | १ | २ | १ |
| २३ | स्वयंसेवी संस्था | १ | २ | २ | १ | २ | १ | २ | १ | २ | १ | २ | १ | २ | १ |
| २४ | औषध दुकान | १ | २ | १ | २ | १ | २ | २ | १ | २ | १ | २ | १ | १ | २ |
| २५ | दूध सोसायटी | १ | २ | १ | २ | १ | २ | २ | १ | २ | १ | २ | १ | १ | २ |
| २६ | पतसंस्था | १ | २ | १ | २ | १ | २ | २ | १ | २ | १ | २ | १ | १ | २ |
| २७ | बचत गट | १ | २ | १ | २ | १ | २ | २ | १ | २ | १ | २ | १ | १ | २ |
| २८ | भजनी मंडळ | १ | २ | १ | २ | १ | २ | २ | १ | २ | १ | २ | १ | १ | २ |
| २९ | ट्रक | १ | २ | १ | २ | १ | २ | २ | १ | २ | १ | २ | १ | १ | २ |
| ३० | रिक्षा | १ | २ | १ | २ | १ | २ | २ | १ | २ | १ | २ | १ | १ | २ |
| ३१ | अन्य चारचाकी वाहने | १ | २ | १ | २ | १ | २ | २ | १ | २ | १ | २ | १ | १ | २ |

टीप : १ = होय    २ = नाही

संदर्भ: गावनिहाय ग्रामपंचायत सर्वेक्षण

सर्व प्रकल्पबाधित सात गावांच्या भौतिक व सेवाविषयक अशा एकूण एकतीस (३१) पायाभूत सुविधांचे सर्वेक्षण करण्यात आले. प्रस्तुत सुविधा संबंधित प्रकल्पबाधित गावांकरीता उपलब्ध आहेत किंवा नाही याविषयीचे विवेचन उपरोल्लेखित सारणी क्रमांक ७.२ मध्ये दर्शविले आहे. संबंधित सुविधा जर त्या गावात उपलब्ध असेल तर १ आणि उपलब्ध नसेल तर २ असा भारांक दिला आहे. अर्थात उपलब्ध नसेल तर Y = 1 आणि उपलब्ध असेल तर Y = 2 असे व उपलब्ध नाहीच्या ठिकाणी उपलब्ध आहे असल्याने N = 2 आणि उपलब्ध नसेल तर N = 1 असा भारांक आदा केला आहे. म्हणून उपरोल्लेखित सारणी वाचताना भारांकाची सूचना लक्षात घेवून वाचन करणे आवश्यक आहे.

**सारणी ७.३:** आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्पबाधितांच्या गावातील शिक्षणविषयक सुविधांविषयीची स्थिती

| अ. क्र. | तपशील | उत्तूर | | | होन्याळी | | | करपेवाडी | | | वडकशिवणे | | | महागोंड | | | हालेवाडी | | | आर्दाळ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **शाळेचा प्रकार** | Y | N | C | Y | N | C | Y | N | C | Y | N | C | Y | N | C | Y | N | C | Y | N | C |
| १ | अंगणवाडी | १ | २ | ९ | १ | २ | ३ | १ | २ | १ | १ | २ | २ | १ | २ | ३ | १ | २ | २ | १ | २ | ३ |
| २ | प्राथमिक शाळा | १ | २ | १ | १ | २ | १ | १ | २ | १ | १ | २ | १ | १ | २ | २ | १ | २ | १ | १ | २ | १ |
| ३ | माध्यमिक शाळा | १ | २ | ३ | १ | २ | १ | २ | १ | ० | २ | १ | ० | १ | २ | १ | २ | १ | ० | १ | २ | १ |
| ४ | ज्युनिअर कॉलेज | १ | २ | १ | २ | १ | ० | २ | १ | ० | २ | १ | ० | २ | १ | ० | २ | १ | ० | २ | १ | ० |
| ५ | सिनिअर कॉलेज | १ | २ | १ | २ | १ | ० | २ | १ | ० | २ | १ | ० | २ | १ | ० | २ | १ | ० | २ | १ | २ |
| ६ | अन्य शैक्षणिक संस्था | १ | २ | १ | २ | १ | ० | २ | १ | ० | २ | १ | ० | २ | १ | ० | २ | १ | ० | २ | १ | ० |

टीप : १ = होय   २ = नाही

**संदर्भ:** गावनिहाय ग्रामपंचायत सर्वेक्षण

आंबेओहोळ प्रकल्पबाधित सर्व सातही गावांचे शैक्षणिक सुविधांनुसार वर्गीकरण केले तर प्राथमिक शिक्षणापर्यंतची सुविधा सर्व प्रकल्पबाधित गावांमध्ये उपलब्ध आहे असे दिसून येते. अर्थात वडकशिवणे वगळता इतर सर्व गावांमध्ये माध्यमिक शिक्षणाची सुविधा उपलब्ध आहे. परंतु या सात गावांपैकी उत्तूरचा अपवाद वगळता इतर सर्व गावांमध्ये उच्च माध्यमिक शिक्षणाची सुविधा नसल्याचेच दिसून येते. अर्थात उच्च शिक्षणाच्या बाबतीतही असाच अनुभव येतो. एकंदरीत काय तर उत्तूरचा अपवाद सोडता इतर सर्व प्रकल्पबाधित गावे लहान व किमान सुविधायुक्त असल्याने प्रकल्पबाधनामुळे त्यांच्या जीवनमानावर गंभीर आर्थिक व सामाजिक परिणाम संभवतात. मूलत: देशातील बहुतांश सिंचन प्रकल्पांच्या प्रकल्पबाधित क्षेत्रांचा अथवा गावांचा विचार केला तर असाच अनुभव आहे की सिंचन प्रकल्पबाधित गावे व क्षेत्र ही आदिवासी, दूर ग्रामीण अशा स्वरूपाची असतात. पर्यायाने बहुतांशी सर्व सिंचन प्रकल्पांच्या पुनर्वसनाचा इतिहास समाधानाचा नाहीच अशाच नोंदी सापडतात. उदाहरणार्थ कोयना धरण १९५७ सालचे आहे. परंतु अद्याप काही शेतकऱ्यांचे आर्थिक पुनर्वसन झालेले नाही असे दिसून येते. याचे महत्त्वाचे कारण हेच संभवते की सिंचन प्रकल्पाचे प्रकल्पबाधित हे ग्रामीण दूरदरास भागातील किंवा आदिवासी शेतकरी असल्यामुळे त्यांच्या पुनर्वसनाकडे सहजपणे दुर्लक्ष करणे शक्य आहे असाच काहीसा प्रशासकीय व राजकियच नव्हे तर सिंचन प्रकल्प लाभधारक शेतकऱ्यांचाही समज झाल्याचे दिसून येते. याचे दुसरे महत्त्वाचे उदाहरण म्हणजे अहमदनगर जिल्ह्यातील १९७० सालचा मुळा पाटबंधारे प्रकल्प. प्रस्तुत प्रकल्पात प्रकल्पबाधित झालेले बहुतेक लोक अनुसूचित जमाती (ST) किंवा तत्सम आदिवासी समाजातील होते. त्यांचे योग्य पुनर्वसन न झाल्यामुळे बहुतांशी प्रकल्पबाधितांनी प्रकल्प लाभक्षेत्रात स्थलांतर करून प्रकल्पामुळे निर्माण झालेल्या नवबागायती क्षेत्रात कृषि रोजंदारीचे काम पत्करले. विशेष म्हणजे आजही जवळजवळ पन्नास वर्षानंतर हे प्रकल्पबाधित शेतकरी अहमदनगरच्या राहुरी व नेवासा तालुक्यातील बागायती शेतीवर रोजंदारीची कामे करून आपली उपजीविका चालवतात. आणि विशेष महत्त्वाची बाब म्हणजे या सर्व अनुसूचित जमातीच्या (ST) किंवा तत्सम आदिवासी

लोकांचे वास्तव्य अद्यापही गवत किंवा ऊसाच्या पाचाटाने शाकारणी केलेल्या घरांत किंवा खोपट्यातच असल्याचे दिसून येते. त्यामुळे सिंचन प्रकल्पबाधितांची सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व शैक्षणिक पार्श्वभूमी लक्षात घेवून प्रशासनाने त्यांच्या आर्थिक व निवासविषयक पुनर्वसनाची योग्य काळजी घेणे आवश्यक आहे नव्हे तसे सक्तीचे मानावे लागेल.

**सारणी ७.४:** आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्पबाधितांच्या गावातील आरोग्य सुविधांविषयीची स्थिती

| अ. क्र. | तपशील | उत्तूर | | | होन्याळी | | | करपेवाडी | | | वडकशिवणे | | | महागोंड | | | हालेवाडी | | | आर्दाळ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Y | N | D | Y | N | D | Y | N | D | Y | N | D | Y | N | D | Y | N | D | Y | N | D |
| १ | उप प्राथमिक आरोग्य केंद्र | १ | २ | ६ | १ | २ | ० | २ | २ | ३ | १ | २ | ० | २ | १ | १ | २ | १ | ७ | १ | २ | ० |
| २ | प्राथमिक आरोग्य केंद्र | १ | २ | ० | ० | १ | ४ | ० | १ | ३ | ० | १ | ७ | ० | १ | ४ | २ | १ | ७ | १ | २ | ३ |
| ३ | ग्रामीण रूग्णालय | १ | २ | १२ | २ | १ | १७ | २ | १ | ३ | २ | १ | ११ | २ | १ | ८ | २ | १ | २२ | २ | १ | १८ |
| ४ | मॅटर्निटी हॉस्पीटल | १ | २ | १२ | २ | १ | १८ | २ | १ | ३ | २ | १ | ११ | २ | १ | ४ | २ | १ | १० | २ | १ | १८ |
| ५ | दवाखाना | १ | २ | ० | १ | ० | ० | १ | २ | ३ | १ | २ | ० | ० | १ | ४ | २ | १ | ७ | २ | १ | ३ |
| ६ | दाई सेवा | १ | २ | ० | १ | २ | ० | २ | १ | ३ | १ | २ | ० | १ | ० | २ | १ | २ | ० | १ | ० | ० |
| ७ | आयुर्वेर्दिक दवाखाना | १ | २ | १२ | २ | १ | १७ | २ | १ | ३ | २ | १ | ११ | २ | १ | ४ | २ | १ | २२ | २ | १ | ३ |
| ८ | जिल्हा रूग्णालय | १ | २ | १२ | २ | १ | ७० | २ | १ | ३ | २ | १ | ८० | २ | १ | १५ | २ | १ | ७० | २ | १ | ८० |
| ९ | अन्य (स्पष्ट करा) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |

टीप : १ = होय   २ = नाही

**संदर्भ:** गावनिहाय ग्रामपंचायत सर्वेक्षण

आंबेओहोळ प्रकल्पबाधितांच्या गावांतील आरोग्य सुविधांचा विचार केला तर असेच दिसून येते की बहुतांश गावांत उपप्राथमिक आरोग्य केंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रूग्णालय किंवा दायी सेवाही उपलब्ध नाहीत. विशेष म्हणजे ही सर्व गावे कोल्हापूर जिल्ह्यातील कोकणसदृश्य वातावरण, मुबलक वनक्षेत्र व अधिक पर्जन्यमानाची असल्यामुळे साप किंवा विंचू दशांच्या शक्यता असतात. त्यामुळे अशावेळी बाधित लोकांना दवाखान्यापर्यंत नेण्यासाठीचा वेळ जीवघेणा ठरू शकतो. अशा प्रकारची एकंदरीत पार्श्वभूमी असलेल्या गावांवर जर प्रकल्पबाधनाची वेळ आली तर त्यांचे नेतृत्व करण्यासाठीही शक्यतो कोणी नसल्यामुळे व सरकारी अधिकाऱ्यांची एकंदरीतच अनास्था असल्याने अशा प्रकल्पबाधितांना न्याय्य  पुनर्वसनाची संधी मिळणे दुरापास्त ठरते. त्यामुळे यापूर्वीच्या सारणीचे (६.३) विश्लेषण करताना नमूद केल्याप्रमाणे सिंचन प्रकल्पबाधित लोकांचे प्रकल्पोपरांत आयुष्य अधिकच खडतर झाल्याचे दिसून येते. आणि त्याचे कारण म्हणजे त्यांची सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व शैक्षणिकदृष्ट्या अतिसामान्य पार्श्वभूमी मानावे लागेल हे निश्चित.

विशेषकरून महाराष्ट्रातील सिंचन प्रकल्पांच्या प्रशासकीय आणि राजकोषीय दिरंगाईमुळे जवळजवळ ४२८ प्रकल्प गेली अनेक वर्षे प्रलंबित आहेत. पर्यायाने त्यांचा प्रकल्पव्यय अनेकपटींनी वाढला देखील आहे. परंतु असे असतानाही प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसन व्ययात किंवा त्यांना द्यावयाच्या लाभात प्रकल्पव्ययाच्या तुलनेत वाढ करून त्यांचे भविष्य काही प्रमाणात सुसह्य होवू शकेल असा प्रयत्न कोणत्याही सिंचन प्रकल्पाबाबत संबंधित प्रशासनाकडून झाल्याचे दिसून येत नाही असे महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेश इत्यादी राज्यांचे अनुभवाधिष्ठित वास्तव आहे. पुनर्वसनाच्या बाबतीत अगदी अलिकडच्या काळातील जगभर नााचक्की झालेल्या सरदार सरोवर प्रकल्पाचे उदाहरण ठळक मानावे लागेल. याउलट २०१३-१४ च्या भूमि अधिग्रहण,  पुनर्वसन व पुनरनिवास कायद्यात आपला सिंचन प्रकल्प कसा येत नाही व त्यामुळे प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनाची जबाबदारी आपली कशी नाही असाच युक्तीवाद करताना

बहुतांशी सिंचन प्रकल्प अधिकारी व जिल्हा प्रशासनाचे अधिकारी दिसून येतात हे प्रशासकीय दुर्दैव आहे.

**सारणी ७.५:** आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्पबाधित शेतकऱ्यांच्या गावांची भूसर्वेक्षणविषयक स्थिती

| | उत्तूर | होन्याळी | करपेवाडी | वडकशिवणे | महागोंड | हालेवाडी | आर्दाळ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **गावाचे भौगोलिक क्षेत्र** | १४८६.७६ | NA | NA | ४२६.९६ | ५५४.१५ | ३०० | NA |
| **कसण्यालायक क्षेत्र** | १३३४.३ | NA | NA | ३६६.८५ | ५१३.१८ | ३०० | NA |
| **बागायत क्षेत्र** | १०८.२९ | NA | NA | १५ | NA | १०० | NA |
| **वनक्षेत्र** | NA | NA | NA | NA | ११.१७ | २ | NA |
| **गायरान** | ६४.७७ | NA | NA | १८ | १५.५५ | ३ | NA |
| **अन्य** | १२२६.०१ | NA | NA | NA | NA | ४ | NA |

**संदर्भ:** गावनिहाय ग्रामपंचायत सर्वेक्षण

सारणी क्रमांक ६.५ मधील आकडेवारी आपणास आंबेओहोळ प्रकल्पबाधित सर्व सात गावांतील भौगोलिक क्षेत्र, वनक्षेत्र, लागवडीयोग्य जमिन, पड जमिन व गायरान जमिन विषयक आकडेवारी पुरविते. सारणीतील आकडेवारीवर दृष्टिक्षेप टाकता आपणास या गावांच्या भूभागविषयक उपरोल्लेखित लक्षणांची सहज कल्पना येवू शकते. एक बाब मात्र निश्चित आहे की उत्तूर हे बाजारपेठेचे किंवा पंचक्रोशीचे मोठे गाव वगळता इतर सर्व प्रकल्पबाधित गावे एकसमान असल्याचे अनुमान मिळते.

**सारणी ७.६:** आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्पबाधित शेतकऱ्यांच्या गावांची एकंदरीत पिकपद्धती

| | भात | भूईमूग | सोयाबीन | मिरची | ऊस |
|---|---|---|---|---|---|
| **उत्तूर** | Y | Y | Y | Y | Y |
| **होन्याळी** | Y | Y | Y | Y | Y |
| **करपेवाडी** | Y | Y | Y | Y | Y |
| **वडकशिवणे** | Y | Y | Y | Y | Y |
| **महागोंड** | Y | Y | Y | Y | Y |
| **हालेवाडी** | Y | Y | Y | Y | Y |
| **आर्दाळ** | Y | Y | Y | Y | Y |

टीप : Y = होय N = नाही

**संदर्भ:** गावनिहाय ग्रामपंचायत सर्वेक्षण

उपरोल्लेखित सारणी क्रमांक ६.६ मधील सर्वेक्षणप्राप्त आकडेवारी आंबेओहोळ प्रकल्पबाधित गावांमधील शेतकऱ्यांची पिकपद्धती दर्शविते. एकंदरीत या सर्व गावांमधील शेतकऱ्यांची पिकपद्धती समान असून त्यात भात, भूईमूग, सोयाबीन, मिरची, ऊस व इतर भाजीपाल्यांच्या पिकांचा समावेश असल्याचे आमच्या निदर्शनास आले. या सर्व गावांची पिकपद्धती एकसमान व शक्यतो मुबलक पाण्याची निकड (भात, ऊस इत्यादी) असलेल्या पिकांचा समावेश असल्याचे कारण म्हणजे कोल्हापूर जिल्ह्याचा हा पश्चिम भाग असून कोकणाशी जोडलेला व कोकणसदृश्यच आहे. येथील वार्षिक सरासरी पर्जन्यमान साधारणपणे १३०० ते १५०० मिमी इतके प्रचंड असल्याने या भागातील नदया व ओढे शक्यतो वर्षभर प्रवाही असतात. त्यामुळे या भागातील पिकपद्धतीत भात व ऊसाचा समावेश असल्याचे दिसून येते.

या बाबीची विशेष नोंद करण्याचे कारण असे की असे पर्जन्यमान व त्यामुळे शक्य असलेल्या पिकपद्धतीखालील जमिनी आंबेओहोळ प्रकलपाच्या बुडित क्षेत्रात येत असल्यामुळे संबंधित प्रकल्पबाधितांचे उत्पादक व आर्थिक  पुनर्वसन करताना विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. अन्यथा या प्रकल्पबाधितांवर अन्याय संभवतो. किंवा ज्या प्रकरणांबाबत प्रकल्पबाधित जमिनींच्या मोबदल्यात जमिनीऐवजी रोख रक्कम देण्याचे धोरण अवलंबले जाईल अशा प्रकरणांत संबंधित बाधित जमिनी जिरायत गृहित न धरता बागायती आहेत असेच गृहित धरावे लागेल आणि तद्नंतर कोल्हापूर जिल्ह्याच्या इतर भागातील बागायत जमिनींच्या बाजार किंमतीच्या चारपट मोबदला देण्याचे धोरण स्विकारले तरच न्याय्य मोबदला मानता येवू शकेल अन्यथा नाहीच नाही.

## प्रकरण: ८

# आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्पबाधित शेतकरी कुटुंबांचे सर्वेक्षण

**प्रास्ताविक:**

अहवालाचे प्रस्तुत प्रकरण आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्पबाधित एकूण सात गावातील शेतकऱ्यांच्या पाहणीवर बेतले असून एकूण प्रकल्पबाधित ८६८ कुटुंबापैकी ४०१ कुटुंबांची नमुना निवड करून प्रत्यक्ष प्राथमिक क्षेत्र सर्वेक्षण केले आहे. प्रस्तुत क्षेत्र सर्वेक्षण करण्याकरीता जी प्रश्नावली तयार करण्यात आली त्यात प्रकल्पबाधितांच्या कुटुंबांची संपूर्ण सामाजिक व आर्थिक परिस्थितीशी निगडीत विविध प्रश्नांचा समावेश करण्यात आला होता. याकरीता वापरलेली प्रश्नावली प्रस्तुत अहवालाच्या परिशिष्टात जोडली आहे. प्रश्नावली व्यतिरिक्त प्रत्यक्ष क्षेत्र निरीक्षण, विशेष समूह चर्चा, गटचर्चा इत्यादी मार्फत सापनि अभ्यास गटाने संपूर्ण परिस्थितीचे आकलन करून घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे प्रकल्पबाधन क्षेत्रातील संपूर्ण परिस्थिती सापनि अभ्यासगटाच्या लक्षात आल्याने त्याचा क्षेत्र सर्वेक्षण प्राप्त आकडेवारीचे पृथक्करण व विश्लेषण करताना लाभ झाला. प्रत्येक गावच्या ग्रामपंचायत किंवा ग्रामदेवालयात प्रकल्पबाधितांच्या सभा घेवून सापनि अभ्यासगटाने प्रकल्पबाधित सर्व सात गावांच्या परिस्थितीचे आकलन करून घेण्याचा प्रयत्न केला. याकामी प्रत्येक गावच्या प्रकल्पबाधित शेतकऱ्यांनी सापनि अभ्यासगटास सहकार्याचे धोरण स्विकारल्याचे नमूद करणे आवश्यक आहे. क्षेत्र सर्वेक्षणातून प्राप्त संपूर्ण प्राथमिक माहितीवर आधारित प्रस्तुत प्रकरण बेतले असल्याने आपणास प्रकल्पबाधित क्षेत्राच्या वास्तव परिस्थितीचे आकलन होण्यास मदत होईल यात शंका नसावी.

## प्राथमिक आकडेवारीचे विश्लेषण:

**सारणी ८.१:** आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्पबाधित शेतकरी कुटुंबे, सर्वेक्षणकामी नमुना प्रमाण आणि गावनिहाय प्रकल्पबाधित शेतजमिनीचे विवरण

| गाव | प्रभावित कुटुंबे | गावनिहाय कुटुंबे | नमुना निवड | नमुना प्रमाण | प्रभावित जमीन (हे.आर/टक्के) | गावाचा हिस्सा (टक्के) |
|---|---|---|---|---|---|---|
| **आर्दाळ** | २५२ | २९.०३ | १०१ | ४०.०८ | ८८.८२ | २३.७४ |
| **करपेवाडी** | १५३ | १७.६३ | १०३ | ६७.३२ | ९९.३९ | २६.५७ |
| **उत्तूर** | ५१ | ५.८८ | १५ | २९.४१ | २८.८४ | ७.७१ |
| **हालेवाडी** | १७२ | १९.८२ | ६७ | ३८.९५ | ६३.८३ | १७.०६ |
| **होन्याळी** | १६५ | १९.०१ | ८४ | ५०.९१ | ७०.६९ | १८.९० |
| **महागोंड** | ३० | ३.४६ | २३ | ७६.६७ | १०.४३ | २.७९ |
| **वडकशिवने** | ४५ | ५.१८ | ८ | १७.७८ | १२.०८ | ३.२३ |
| **एकूण** | ८६८ | १०० | ४०१ | सरासरी ४५.८७ | ३७४.०८ | १००.०० |

संदर्भ : क्षेत्र सर्वेक्षण




आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्पात अनुक्रमे आर्दाळ, करपेवाडी, उत्तूर, हालेवाडी, होन्याळी, महागोंड आणि वडकशिवाले अशा एकूण सात गावातील शेतकऱ्यांची जमीन प्रकल्पबाधित होते. परंतु या सातपैकी एकही गाव मात्र पाण्याखाली जात नाही. संपूर्ण सात गावातील एकूण ८६८ शेतकरी कुटुंबांची कमीअधिक प्रमाणात अशी एकूण

३७४.०८ हेक्टर इतकी जमीन प्रकल्पबाधित होत असल्याने या सर्व प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना त्यांच्या बाधित जमिनीच्या मोबदल्यात जमीन किंवा प्रचलित बाजारभावाच्या चारपट वित्तीय स्वरूपात मोबदला आदा करणे आवश्यक आहे. अर्थात याकामी पाटबंधारे विभागाने गडहिंग्लज तालुक्यातील चित्री प्रकल्पलाभ क्षेत्रातील शेतजमिन संपादित करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु संबंधित शेतकरी न्यायालयात गेले असल्याने प्रकरण न्यायप्रविष्ट होवून ''जमिनीच्या बदल्यात जमीन'' हे प्रकल्पपुनर्वसनाचे तत्त्व सध्यातरी बाधित झाले असल्याचे मान्य करावे लागेल. उपरोल्लेखित आकडेवारीवर दृष्टिक्षेप टाकला तर प्रकल्पबाधित गावनिहाय प्रकल्पबाधित शेतकरी व गावनिहाय प्रकल्पबाधित जमिनीच्या आकारमानाची कल्पना येवू शकते. एकूण ८६८ प्रकल्पबाधितांची गावनिहाय विभागणी अनुक्रमे २५२ (आर्दाळ), १५३ (करपेवाडी), ५१ (उत्तूर), १७२ (हालेवाडी), १६५ (होन्याळी), ३० (महागोंड) आणि ४५ (वडकशिवने)अशी असून याच क्रमाने गावनिहाय प्रकल्पबाधित/नियोजित बुडित जमिनीचे अनुक्रमे आकारमान ८८.८२, ९९.३९, २८.८४, ६३.८३, ७०.६९, १०.४३ आणि १२.०८ हेक्टर आर असे असून एकूण प्रकल्पबाधित जमीन ३७४.०८ हेक्टर आर इतकी आहे. क्षेत्र सर्वेक्षणकामी सापनि अभ्यासगटाने एकूण ४०१ प्रकल्पबाधित शेतकऱ्यांची नमुना निवड केली असून त्याची प्रकल्पबाधित गावनिहाय संख्या अनुक्रमे १०१, १०३, १५, ६७, ८४, २३ आणि ०८ इतकी असून यात एकूण प्रकल्पबाधित शेतकऱ्यांपैकी सरासरी ४५.८७ टक्के प्रकल्पबाधितांचा समावेश केला आहे. अर्थात याचे गावनिहाय सरासरी प्रमाण ४०.०८, ६७.३२, २९.४१, ३८.९५, ५०.९१, ७६.६७ आणि १७.७८ टक्के असे येते. शास्त्रोक्त नमुना निवड प्रमाणबद्धतेचा विचार केला तर प्रकल्पबाधित गावनिहाय सरासरी आणि एकूण प्रकल्पबाधित संख्येच्या प्रमाणात सापनि अभ्यासगटाने निवडलेले प्रमाण किमान आवश्यक पर्याप्ततेपेक्षा नक्कीच अधिक असून प्रस्तुत सापनि अभ्यास अहवाल प्रामुख्याने क्षेत्रपाहणी व सर्वेक्षित प्राथमिक माहितीवर बेतला असल्याने गुणवत्तेच्या मापदंडावर उतरतो यात शंका नाही.

**सारणी ८.२:** आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित कुटुंबांचे जनगणना विवेचन

| | टक्के | |
|---|---|---|
| **पुरुष** | ५३.१० | १००.०० |
| **महिला** | ४६.६७ | |
| **१८ वर्षापेक्षा कमी** | १४.३९ | १००.०० |
| **१८-३५** | २८.१३ | |
| **३६-५५** | २७.६० | |
| **५५ पेक्षा जास्त** | २९.८९ | |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण

प्रकल्पबाधित कुटुंबांच्या जनगणना लक्षणांवर दृष्टिक्षेप टाकला तर एकूणपैकी ५३.१० टक्के पुरुष आणि ४६.६७ टक्के महिला असून त्यांचे वयोमानान्वये विवरण; १४.३९ टक्के (वय वर्षे १८ पेक्षा कमी), २८.१३ टक्के (वय वर्षे १८ ते ३५), २७.६० टक्के (वय वर्षे ३६ ते ५५) आणि २९.८९ टक्के (वय वर्षे ५५ पेक्षा जास्त) असे दिसून येते. म्हणजेच प्रकल्पबाधनामुळे एकूण ४४.२८ टक्के अवलंबित लोकांचा भार उर्वरित ५५.७३ टक्के कुटुंब सदस्यांवर पडणार आहे. अर्थात प्रकल्पामुळे त्यांचे महत्वाचे मिळकत व रोजंदारीचे साधन म्हणून वापरात असलेली शेतजमिन बाधित होत असल्यामुळे उदरनिर्वाहाची समस्या बिकट होणार असल्याने उत्पादक पुनर्वसनाचा प्रश्न गंभीर बनतो.

**सारणी ८.३:** आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित कुटुंब सदस्यांचा सार्वजनिक जीवनातील सहभाग

| | टक्के |
|---|---|
| **ग्रामपंचायत** | १६.४३ |
| **पंचायत समिती** | ०.७१ |
| **विविध कार्यकारी सोसायटी** | २०.७१ |
| **ग्रामविकास मंडळ** | ०.०० |
| **जंगल कामगार संस्था** | ०.०० |
| **सहकारी बँक** | १.४३ |
| **बचत गट** | ३२.१४ |
| **दुध संस्था** | १४.२९ |
| **बाजार समिती** | ०.०० |

| | |
|---|---|
| **भजनी मंडळ** | ५.७१ |
| **जात पंचायत** | ०.७१ |
| **तरूण मंडळ** | ५.०० |
| **महिला मंडळ** | १.४३ |
| **एकूण** | १००.०० |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण

प्रकल्पबाधित ग्रामीण शेतकरी कुटुंबे विविध सार्वजनिक किंवा ग्राम पातळीवरील सहकारी, सेवा संस्था किंवा स्थानिक स्वराज संस्थांचे प्रतिनिधित्व करताना दिसून येतात. त्यापैकी सर्वाधिक प्रतिनिधित्व सदस्यत्व बचतगटाचे ३२.१४ टक्के, दूध संस्था १४.२९ टक्के व भजनी व तरूण मंडळ ५.७१ टक्के व ५.०० टक्के असा क्रम लागतो. याचाच अर्थ असा की या सर्व प्रकल्पबाधितांना त्यांच्या गावापेक्षा अधिक असे नेतृत्व लाभले नसल्याने त्यांचे पुनर्वसनविषयक प्रश्न सरकार दरबारी मांडण्याकरीता त्यांना इतरांवरच अवलंबून रहावे लागणार आहे.

**सारणी ८.४:** आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित कुटुंबाचे शिधापत्रिका उपलब्धतेनुसार विवेचन

| | **टक्के** |
|---|---|
| **आहे** | ९३.७९ |
| **नाही** | ३.९५ |
| **प्रतिसाद नाही** | २.२६ |
| **आधार** | १००.०० |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण

**सारणी ८.५:** आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित कुटुंबाकडील शिधापत्रिकेनुसार विवेचन

| | **टक्के** |
|---|---|
| **उत्तर नाही** | २.५४ |
| **पांढरी** | १३.८४ |
| **पिवळी** | ३८.४२ |
| **भगवी** | ४५.२० |
| **आधार** | ३५४ |

संदर्भ : क्षेत्र सर्वेक्षण

बहुतांशी प्रकल्पबाधितांकडे ९३.७९ टक्के कौटुंबिक शिधापत्रिका आहेत तर ३.९५ टक्के प्रकल्पबाधित शेतकऱ्यांनी शिधापत्रिका नसल्याचे नमूद केले आहे. एकूण शिधापत्रिकांचे पांढरी (१३.८४ टक्के), पिवळी (३८.४२ टक्के) आणि भगवी (४५.२० टक्के) असे विवरण पहावयास मिळते. भगवी शिधापत्रिका असणाऱ्यांचे अधिक प्रमाण आपणास प्रकल्पबाधितांच्या बेताच्या आर्थिक परिस्थितीची कल्पना करून देते.

**सारणी ८.६:** आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित कुटुंबाचे घर मालकीनुसार विवेचन

| | टक्के |
|---|---|
| **होय** | ९५.२० |
| **नाही** | ४.२४ |
| **प्रतिसाद नाही** | ०.५६ |
| **आधार** | १००.०० |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण

**सारणी ८.७:** आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित कुटुंबाचे घराच्या छतानुसार विवेचन

| | टक्के |
|---|---|
| **घराचा प्रकार** | प्रमाण |
| **पक्के** | १४.६९ |
| **गवताचे छत** | ७४.५८ |
| **स्लॅब** | १०.४५ |
| **प्रतिसाद नाही** | ०.२८ |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण

**सारणी ८.८:** आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित कुटुंबाच्या घराच्या आकारमानानुसार विवेचन

| खोल्यांची संख्या | कुटुंब प्रमाण (टक्के) |
|---|---|
| १ | ४.८२ |
| २ | २२.६६ |
| ३ | ४३.९१ |
| ४ | २१.८१ |
| ५ | २.८३ |
| ६ | २.५५ |

| | |
|---|---|
| ८ | ०.५७ |
| **घर नाही** | ०.८५ |
| **आधार** | १००.०० |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण

बहुतांशी सर्वेक्षित प्रकल्पबाधितांनी (९५.२० टक्के) त्यांच्या मालकीचे घर आहे असे नमूद केले असले तरीही त्यापैकी ७४.५८ टक्के प्रकल्पबाधितांची घरे गवताच्या छपराची असून फक्त पक्क्या (१४.६९ टक्के) व स्लॅबच्या (१०.४५ टक्के) घरांचे प्रमाण अत्यल्प आहे. म्हणजेच निवाऱ्याचा प्रश्न गंभीर स्वरूपाचाच आहे. यापैकी दोन, तीन आणि चार खोल्या असलेल्यांचे प्रमाण अनुक्रमे २२.६६, ४३.९१ आणि २१.८१ टक्के असून त्यापैकी अधिक घरखोल्या असणाऱ्यांचे प्रमाण अत्यल्प असल्याने आपणास एकंदरीतच राहण्याच्या घरांची स्थिती अपर्याप्ततेकडे अंगुलीनिर्देश करते.

**सारणी ८.९:** आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित कुटुंबातील नोकरीविषयक विवेचन

| | **टक्के** |
|---|---|
| **होय** | ४२.०९ |
| **नाही** | ५३.९५ |
| **प्रतिसाद नाही** | ३.९५ |
| **एकूण** | १००.०० |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण

**सारणी ८.१०:** आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित कुटुंब सदस्यांच्या नोकरीचे स्वरूप

| | **टक्के** |
|---|---|
| **खाजगी** | ३६.२६ |
| **सरकारी** | ८.७८ |
| **प्रतिसाद नाही** | ५४.९६ |
| **एकूण** | १००.०० |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण

**सारणी ८.११:** आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित कुटुंबातील सदस्यांचे नोकरी-व्यवसाय निमित्ताने स्थलांतर

| | टक्के |
|---|---|
| **आजरा** | ०.७९ |
| **चंदगड** | ०.७९ |
| **इचलकरंजी** | ३.१७ |
| **गडहिंग्लज** | ३.९७ |
| **गवसे** | ०.७९ |
| **जम्मू** | ०.७९ |
| **कोल्हापूर** | १०.३२ |
| **मुंबई** | ६०.३२ |
| **पाटण** | ०.७९ |
| **पुणे** | १३.४९ |
| **रायबाग** | ०.७९ |
| **सावंतवाडी** | ०.७९ |
| **ठाणे** | १.५९ |
| **उत्तूर** | १.५९ |
| **एकूण** | १००.०० |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण




एकूण सर्वेक्षित प्रकल्पबाधितांपैकी ४२.०९ टक्के कुटुंबातील सदस्य शेतीव्यतिरिक्त काही नोकरी करताना दिसून येतात. यापैकी बहुतांश प्रकल्पबाधित कुटुंब सदस्य (३६.२६ टक्के) खाजगी असंघटित क्षेत्रात नोकरी करतात तर ०८.७८ टक्के नोकरी करणारे सदस्य

सरकारी नोकरीत आहेत. नोकरीच्या ठिकाणाचा विचार केला तर सर्वाधिक लोक (६०.३२ टक्के) मुंबईत असून बहुतांशी प्रमाणात असंघटित क्षेत्रात नोकरी करतात. बहुतांशी कुटुंबांनी (५४.९६ टक्के) नोकरीचे स्वरूप प्रकट केले नाही याचे प्रमुख कारण म्हणजे मुंबईत स्थलांतरीत झालेले बहुतेक सदस्य असंघटित क्षेत्रात कार्यरत असल्याने तसे सांगणे त्यांना अप्रस्तुत वाटते. अर्थात याचा उल्लेख त्यांनी सापनि अभ्यासगटाबरोबरच्या खाजगी चर्चेद्वारा केला. उर्वरित स्थलांतरीतांच्या रोजगार व स्थलांतर ठिकाण आदीवर सारणी ११ मध्ये उल्लेख केला आहे. त्यावर दृष्टिक्षेप टाकता आपणास त्याची कल्पना येते. अर्थात स्थलांतरीताकरीता मुंबईनंतर पुण्याचा (१३.४९ टक्के) क्रमांक लागतो. सारांशात असेच नमूद करावे लागेल की घरची आर्थिक स्थिती बेताचीच असल्यामुळे नोकरीनिमित्ताने बाहेर पडलेले बहुतांश प्रकल्पबाधित कुटुंब सदस्य असंघटित क्षेत्रातच कामे करतात. अर्थात काम करण्याची क्षमता संपल्यानंतर पुन्हा गावी/घरी येवून गरीबीचे जीवन जगणे भाग पडते. याचे एकमेव कारण त्यांची हालाखीची कृषि आर्थिक परिस्थिती. त्यामुळे अशी पार्श्वभूमी असलेल्या प्रकल्पबाधितांच्या उत्पादक पुनर्वसनाचा प्रश्न सरकारी अनास्थेमुळे अधिक गंभीर स्वरूप धारण करतो कारण त्यांचे प्रतिनिधित्व सशक्त नसते.

**सारणी ८.१२:** आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित कुटुंबाच्या राहत्या घराच्या जमीन तुकड्याचे आकारमान

| घराच्या जागेचे आकारमान (आर) | बाधित कुटुंबे | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|
| ०.०५ | १ | ०.२८ |
| ०.२५ | २ | ०.५६ |
| ०.३ | २ | ०.५६ |
| ०.४ | ५ | १.४१ |
| ०.५ | ५६ | १५.८२ |
| ०.७५ | १ | ०.२८ |
| १ | १३४ | ३७.८५ |
| १.२ | ३ | ०.८५ |
| १.२५ | १ | ०.२८ |
| १.३ | ३ | ०.८५ |

| | | |
|---|---|---|
| १.५ | २४ | ६.७८ |
| २ | ६१ | १७.२३ |
| २.५ | १ | ०.२८ |
| ३ | १५ | ४.२४ |
| ४ | ४ | १.१३ |
| ५ | १ | ०.२८ |
| ७ | १ | ०.२८ |
| ८ | १ | ०.२८ |
| १० | १ | ०.२८ |
| २५ | १ | ०.२८ |
| १०० | १ | ०.२८ |
| ०..५ | १ | ०.२८ |
| ०..६ | १ | ०.२८ |
| **प्रतिसाद नाही** | ३३ | ९.३२ |
| **एकूण** | ३५४ | १००.०० |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण

बहुतांशी प्रकल्पबाधित शेतकरी कुटुंबांची (३७.८५ टक्के) राहण्याची घराची जागा फक्त एक आर (१००० चौरस फूट) इतकी छोटीशी आहे तर त्या पाठोपाठ १५.८२ टक्के प्रकल्पबाधित कुटुंबे ५०० चौरस फूट जागेवरच आपल्या राहण्याच्या जागेची गुजराण करताना दिसून येतात. अर्थात या सर्व प्रकल्पबाधित कुटुंबांच्या एकंदरीतच सर्व सामाजिक व आर्थिक लक्षणांवर दृष्टिक्षेप टाकता असेच लक्षात येइल की बहुतांशी प्रकल्पबाधित अत्यंत सामान्य स्वरूपाचे जीवनमान जगतात आणि शेती व्यवसायाव्यतिरिक्त इतर उत्पादनाची साधने त्यांच्याकडे नाहीत.

**सारणी ८.१३:** आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित कुटुंबाकडील टिकावू उपभोग्य वस्तूमालकी विवरण

| प्रतिसाद | दूरदर्शन | फ्रीज | वॉशिंग मशिन | पंखे | रेडिओ | गॅस जोडणी | सायकल | मोटार सायकल | चारचाकी | मोबाईल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | टक्के | | | | | | | | | |
| होय | ७९.७२ | १६.०६ | १.६९ | ६३.८४ | १३.५२ | ८०.५६ | १४.३७ | ३०.१४ | ५.६३ | ७२.९६ |
| नाही | ०.८५ | ०.०० | ०.०० | ६.७८ | ०.५६ | ०.८५ | १.१३ | १.१३ | ०.५६ | १७.१८ |
| प्रतिसाद नाही | १९.४४ | ८३.९४ | ९८.३१ | २९.३८ | ८५.९२ | १८.५९ | ८४.५१ | ६८.७३ | ९३.८० | ९.८६ |
| एकूण | १००.०० | १००.०० | १००.०० | १००.०० | १००.०० | १००.०० | १००.०० | १००.०० | १००.०० | १००.०० |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण

**सारणी ८.१४:** आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित कुटुंबाकडील कृषि औजारे मालकी विवरण

| प्रतिसाद | पेरणी औजार | बैलगाडी | कुदळ | नांगर | लोखंडी नागर | कडबा कुट्टी | फवारणी पंप | डिझेल इंजिन | वीजपंप | कोळपे | लाकडी नांगर | मळणी यंत्र | टिलर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | टक्के | | | | | | | | | | | | |
| **होय** | ३५.२६ | १०.१ | ५६.७ | १४.३ | ९.३ | ५.९ | १०.४ | ५.६ | ६.५ | ३९.० | १२.९ | २.३ | ०.३ |
| **नाही** | १५.६१ | १९.४ | ६.५ | १७.८ | २१.३ | २१.१ | १७.४ | २०.० | २१.३ | १६.७ | १७.० | २०.० | १९.७ |
| **प्रतिसाद नाही** | ४९.१३ | ७०.५ | ३६.८ | ६७.४ | ७०.२ | ७२.२ | ७२.२ | ७४.४ | ७१.९ | ४३.८ | ६९.७ | ७७.५ | ७९.५ |
| **एकूण** | १००.०० | १००.०० | १००.०० | १००.०० | १००.०० | १००.०० | १००.०० | १००.०० | १००.०० | १००.०० | १००.०० | १००.०० | १००.०० |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण

वापरातील टिकावू उपभोग्य वस्तू व कृषि औजारांच्या मालकीवरून शेतकरी कुटुंबांच्या आर्थिक कुवतीची कल्पना येते. दूरदर्शन (७९.७२ टक्के), पंखे (६३.८४ टक्के), गॅसजोडणी (८०.५६ टक्के), मोबाईल (७२.९५ टक्के) आणि मोटारसायकल (३०.१४ टक्के) इत्यादी टिकावू उपभोग्य वस्तूंची मालकी व वापर वगळता इतर टिकावू उपभोग्य वस्तू कमीत कमी प्रमाणात असल्याचे दिसून येते. अर्थात अशाच प्रकारची स्थिती कृषि औजारांच्या मालकीतही लक्षात येते. बैलगाडीसारखे महत्त्वाचे कृषि वाहतूकीचे साधन (१०.१० टक्के) अत्यल्प प्रकल्पबाधितांकडे आहे. अशीच आकडेवारी नांगर (१४.०३ टक्के), कडबा कुट्टी (०५.९० टक्के), फवारणी पंप (१०.४० टक्के), डिझेल इंजिन (०५.६० टक्के), वीज पंप (०६.५० टक्के), मळणी यंत्र (०२.३० टक्के) आणि पॉवरटिलर (००.३०) टक्के इत्यादींबाबत निदर्शनास येते. बहुतांशी प्रकल्पबाधितांकडे या सर्व औजारांची उपलब्धता नाही असेच दिसून आले. अर्थात याचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांची अल्पभूधारक स्वरूपाची धारणक्षमता आणि बेताची आर्थिक स्थिती. बहुतांशी सर्वेक्षित प्रकल्पबाधितांनी औजारे मालकीसंबंधीच्या प्रश्नाचे उत्तर दिले नाही. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांच्याकडे ही औजारे नाहीत. तसे ते खाजगीत कबूल करतात. परंतु संबंधित प्रश्नाचे उत्तर टाळतात.

**सारणी ८.१५:** आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित कुटुंबाची जमीन मालकी विवरण

| | टक्के |
|---|---|
| होय | ८६.१६ |
| नाही | ८.७६ |
| प्रतिसाद नाही | ५.०८ |
| एकूण | १००.०० |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण

**सारणी ८.१६:** आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित क्षेत्रातील विविध प्रकारच्या जमिनींची प्रचलित सरासरी बाजार किंमत

| | सरासरी किंमत (एकर/रूपये) |
|---|---|
| मुरमाड | ८००००० |
| मध्यम | १६००००० |
| उत्तम | २०००००० |
| बागाईत | २३००००० |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण




एकूण प्रकल्पबाधितांपैकी ८६.१६ टक्के प्रकल्पबाधित आपल्याकडे मालकीची जमीन नाही असे नमूद करतात तर ०८.७६ टक्के जमीन नाही असे सांगतात. अर्थात असे उत्तर अनाकलनीय वाटते. किंमतीच्याबाबत मात्र बहुतांशी प्रकल्पबाधितांनी प्रचलित बाजार किंमत सांगितली. अर्थात भरपूर पर्जन्यमान, छोटी धारणक्षेत्रे व विक्रीकरीता कमी जमीन उपलब्ध असल्याचे निदर्शनास येते. अर्थात आकडेवारीत नमूद केलेली किंमत सरासरी किंमत आहे. अर्थात जमिनीच्या प्रतवारीनुसार या किंमती असल्याने प्रकल्पबाधितानां

बाधित जमिनीच्या मोबदल्यात रक्कम देताना अशीच प्रतवारी करून प्रचलित सरासरी बाजारभावाच्या चारपट रक्कम आदा करणे अपेक्षित आहे. परंतु तसे होतानाचा अनुभव मात्र येत नाही. मध्यंतरी कोल्हापूरच्या वर्तमानपत्रात आंबेओहोळ सिंचन प्रकल्पबाधितांना एकरी सत्तावीस (२७) लक्ष रूपये प्रमाणे एकतर्फी किंमतीची घोषणा केल्याचे वाचनात आले. परंतु अशी किंमत प्रकल्प विभागाने कशी निश्चित केली याचा तपशील समजू शकला नाही. अर्थात अशी अंदाजे किंमत निश्चिती २०१३ च्या ''भूमी अधिग्रहण, पुनर्वसन आणि पुनरनिवास'' कायद्यातही अपेक्षित नाही. शेतकऱ्यांचा प्रखर विरोध झाल्यामुळे मुंबई-नागपूर सृमृद्धी महामार्ग प्रकल्पबाधितांना जर एक कोटी रूपये प्रती एकर व अशीच तयारी नाणार प्रकल्पबाधितांबाबत महाराष्ट्र राज्य सरकारने दर्शविली होती तर तशाच प्रकारचे धोरण राज्यातील सिंचन प्रकल्पांसहित इतर योजनांच्या बाबतीत लागू केले तर पुनर्वसन धोरणातील भेदभाव नष्ट होवू शकेल.

**सारणी ८.१७:** आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित कुटुंबाची पीकपद्धती व पीकवार लागवड प्रमाण

| **रब्बी** | | **खरीप** | |
|---|---|---|---|
| **पिक** | लागवड प्रमाण | पिक | लागवड प्रमाण/ टक्के |
| **भात** | ६६.७६ | भात | १.४१ |
| **सोयाबीन** | २.२५ | सोयाबीन | १०.१४ |
| **ऊस** | ०.८५ | ऊस | १.४१ |
| **नाचणी** | ०.८५ | नाचणी | ०.८५ |
| **जवार** | ०.५६ | जवार | ०.८५ |
| **भुईमूग** | ४.५१ | भुईमूग | ३३.२४ |
| **मूग** | ०.२८ | मूग | १.१३ |
| **प्रतिसाद नाही** | २३.९४ | प्रतिसाद नाही | ५०.९९ |
| **एकूण** | १००.०० | एकूण | १००.०० |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण




आंबेओहोळ प्रकल्पबाधन क्षेत्र/बुडित क्षेत्र कोल्हापूर जिल्ह्याच्या दक्षिण–पश्चिम भागात येत असल्याने हा सर्व परिसर कोकणसदृश्य भूभाग व जास्त पर्जन्यमानाचा असल्याने पिकपद्धतीत भातपिकाचे (६६.७६ टक्के) वर्चस्व जाणवते. अर्थात त्याचे प्रमाण मात्र कमी प्रमाणात दिसून येते. कारण भात पिकाची लागवड प्रामुख्याने कुटुंब उपभोगापुरतीच केली जाते असे दिसून आले. अलिकडच्या काळात काही शेतकऱ्यांनी सोयाबीनसारख्या (०२.२५ टक्के) व्यापारी पिकाची लागवड सुरू केली आहे व एकंदरीत पिकरचनेत सोयाबीनचे प्रमाणही (१०.१४ टक्के) प्रभावी असल्याचे दिसून येते.

**सारणी ८.१८:** आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित शेतकऱ्यांच्या फळबाग लागवडीसंबंधी विवेचन

| | **टक्के** |
|---|---|
| **होय** | २.८५ |
| **नाही** | ६३.८२ |
| **प्रतिसाद नाही** | ३३.३३ |
| **एकूण** | १००.०० |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण




**सारणी ८.१९:** आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित शेतकऱ्यांच्या फळबाग व वनवृक्ष मालकीचे विवरण

| | टक्के |
|---|---|
| **आंबा** | १९.६१ |
| **मिरगळ** | २.५४ |
| **सागवान** | ०.३८ |
| **जांभूळ** | ४.२८ |
| **बीब्बा** | ०.११ |
| **करंज** | १.१० |
| **इतर** | ७१.९८ |
| **एकूण** | १००.०० |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण

वर्षभर पाणीपुरवठ्याची सुविधा नसल्यामुळे अत्यल्प प्रकल्पबाधितांकडे (२.८५ टक्के) आपली स्वत:ची फळबाग लागवड असल्याचे निदर्शनास येते. यात प्रामुख्याने आंबा (१९.६१ टक्के) लागवडीचा समावेश दिसून येतो. अर्थात अगोदरच उल्लेख केल्याप्रमाणे अधिक पर्जन्यमानाचा परिसर असल्यामुळे वृक्ष लागवडीपेक्षा बहुतांश फळझाडे व वनझाडे आपोआप आलेली आहेत असे सापनि अभ्यासगटास प्रत्यक्ष सर्वेक्षणावेळी अनुभवास आले.

**सारणी ८.२०:** आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित शेतकऱ्यांकडील पाणीपुरवठा सुविधांविषयीचे विवेचन

| ठिबक सिंचन/ टक्के | |
|---|---|
| पावसाचे पाणी | ८७.६१ |
| होय | ०.५६ |
| नाही | ११.८३ |
| एकूण | १००.०० |
| बोअरवेल | |
| पावसाचे पाणी | ८३.३८ |
| होय | ५.३५ |
| नाही | ११.२७ |
| एकूण | १००.०० |
| विहीर | |
| पावसाचे पाणी | ८३.९४ |
| होय | ३.६६ |
| नाही | १२.३९ |
| एकूण | १००.०० |
| पाटपाणी | |
| पावसाचे पाणी | ८७.०४ |
| होय | १.१३ |
| नाही | ११.८३ |
| एकूण | १००.०० |
| नदीचा पाट | |
| होय | ८७.८५ |
| नाही | १२.१५ |
| एकूण | १००.०० |
| शेततळे | |
| पावसाचे पाणी | ८७.८९ |
| होय | ०.२८ |
| नाही | ११.५५ |
| एकूण | ०.२८ |
| | १००.०० |

| पाझर तलाव | |
|---|---|
| पावसाचे पाणी | ८८.१७ |
| होय | ११.५५ |
| नाही | ०.२८ |
| एकूण | १००.०० |
| **कोल्हापूर बंधारा** | |
| पावसाचे पाणी | ८८.१४ |
| होय | ११.५५ |
| नाही | ०.२८ |
| एकूण | ९९.९७ |
| **तुषार सिंचन** | |
| पावसाचे पाणी | ८८.१७ |
| होय | ११.५५ |
| नाही | ०.२८ |
| एकूण | १००.०० |
| **पावसाचे पाणी** | |
| पावसाचे पाणी | ३२.११ |
| होय | ६६.४८ |
| नाही | १.४१ |
| एकूण | १००.०० |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण

**सारणी ८.२१:** आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित क्षेत्रातील सरासरी भूजलपातळी

| | फूट |
|---|---|
| विहीर | ८४.०५ |
| बोअरवेल | २२०.७७ |

संदर्भ : क्षेत्र सर्वेक्षण

**सारणी ८.२२:** आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित शेतकऱ्यांकडील पाईपलाईन उपलब्धतेविषयीचे विवेचन

| | टक्के |
|---|---|
| **होय** | ८.५५ |
| **नाही** | ६२.११ |
| **प्रतिसाद नाही** | २९.३४ |
| **एकूण** | १००.०० |

संदर्भ : क्षेत्र सर्वेक्षण

प्रकल्पबाधितांच्या वार्षिक कृषि पाणीपुरवठ्याच्या सुविधांचा आढावा घेता बहुतांशी शेतकरी पावसाच्या पाण्यावर निर्भर अशा स्वरूपाची (८७.६१ टक्के) शेती कसत असल्याचे दिसून येते. विहीर (३.६६ टक्के) किंवा बोअरवेल (५.३५ टक्के) अत्यंत कमी प्रमाणात आहेत. कारण अल्पभूधारक धारणक्षेत्र व बेताची आर्थिक परिस्थिती असल्यामुळे प्रंकल्पबाधितांना पाणीपुरवठ्याच्या सुविधा निर्माण करणे परवडणारे नाही. अर्थात विहीरीकरीता या भागातील सरासरी भूजलपातळी ८४.०५ फूट तर बोअरवेलकरीता २२०.७७ फूट इतकी खोल असल्यामुळे त्याकामी लागणारा खर्च प्रचंड असल्यामुळे तो प्रकल्पबाधितांच्या आवाक्याबाहेर असल्याचे मत मांडतात. प्रकल्पबाधितांकडे पावसाच्या पाण्याव्यतिरिक्त पाणीपुरवठ्याचे इतर मार्ग उपलब्ध नसल्यामुळे पाईपलाईनसारख्या पायाभूत सुविधाही असणे शक्य नाही. त्यामुळे अत्यल्प प्रमाणात (०९.५५ टक्के) प्रकल्पबाधितांकडे काही प्रमाणात पाईपलाईनची सुविधा असल्याचे दिसून येते.

**सारणी ८.२३:** आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित शेतकऱ्यांकडील पाळीव प्राणी मालकीविषयक विवेचन

| प्राणी | संख्या | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|
| **गाय** | ४९ | ८.८८ |
| **म्हैस** | २७२ | ४९.२८ |
| **बैल** | ५५ | ९.९६ |
| **रेडा** | १० | १.८१ |
| **कोंबड्या** | ११८ | २१.३८ |

| | | |
|---|---|---|
| **शेळी** | ३४ | ६.१६ |
| **मेंढी** | ७ | १.२७ |
| **इतर** | ७ | १.२७ |
| **एकूण** | ५५२ | १००.०० |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण

प्रकल्पबाधितांच्या घरगुती बिगर कृषि उत्पन्नाच्या मार्गांचा विचार करता त्यांच्याकडील दुभती जनावरे व इतर प्राणीसंपदेचा विचार करणे अनिवार्य ठरते. बहुतेक प्रकल्पबाधितांचा छोटासा दुग्धव्यवसाय असल्याने त्यांनी म्हैसपालन (४९.२८ टक्के) केल्याचे दिसून आले. तर काही कुटुंबांनी कोंबड्या (२१.३८ टक्के) पाळून आठवडे बाजारात अंडी विकून आपल्या तुटपुंजी उत्पन्नाला हातभार लावण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. शेळी (६.१६ टक्के), मेंढी (१.२७ टक्के) पालनही प्रकल्पबाधितांनी केल्याचे दिसून आले. एकंदरीत काय तर एकूण आर्थिक परिस्थिती बेताची असल्यामुळे स्थलांतरीत असंघटित रोजगाराच्या उत्पनावर अधिक प्रमाणात निर्भर असल्याचे दिसून येते.

**सारणी ८.२४:** आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित शेतकरी कुटुंबांचे बिगर कृषि जोड उत्पन्नाचे मार्ग

| बिगर कृषि उत्पन्न मार्ग | संख्या | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|
| **नोकरी** | ८० | ५७.५५ |
| **व्यवसाय** | २३ | १६.५५ |
| **पेन्शन** | २१ | १५.११ |
| **मुलांनी पाठविलेले** | १२ | ८.६३ |
| **जागा भाडे** | २ | १.४४ |
| **ट्रॅक्टर भाडे** | १ | ०.७२ |
| **खंड** | ० | ०.०० |
| **अन्य** | ० | ०.०० |
| **एकूण** | १३९ | १००.०० |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण




आंबेओहोळ प्रकल्पबाधित शेतकऱ्यांच्या घरातील एकूण ८० लोक विविध नोकरी व्यवसाय करून कुटुंबास हातभार लावत असल्याचे दिसून येते. अर्थात यातील बहुतांश नोकरी करणारे असंघटित क्षेत्रात नोकरी करतात हे यापूर्वीच्या विश्लेषणात (सारणी १०/११) नमूद केले आहेच. काही शेतकरी कुटुंबे (१६.५५ टक्के) कुटिर स्वरूपाचा व्यवसाय करून मिळकतीत भर घालण्याचा प्रयत्न करताना दिसून आले. परंतु एकंदरीत आर्थिक परिस्थितीवर विचार केला तर अनुभवाअंती सापनि अभ्यासगटास असेच निदर्शनास आले की या सर्व प्रकल्पबाधितांची आर्थिक परिस्थिती सामान्य असल्याने त्यांच्याकडील कृषि जमिनी कुटुंब उदरनिर्वाहासाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत.

**सारणी ८.२५:** आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित शेतकरी कुटुंबाचे बिगर कृषि उत्पन्न व्यवसाय

| सायकल दुकान | | प्रमाण (टक्के) |
|---|---|---|
| **प्रतिसाद नाही** | २८२ | ७९.४३ |
| **होय** | १ | ००.२८ |
| **नाही** | ७२ | २०.२८ |
| **एकूण** | ३५५ | १००.०० |

| | | |
|---|---|---|
| **खाणावळ** | | |
| **प्रतिसाद नाही** | २८३ | ७९.७१ |
| **होय** | १ | ००.२८ |
| **नाही** | ७१ | २०.०० |
| **एकूण** | ३५५ | १००.०० |
| **शिलाई मशीन** | | |
| **प्रतिसाद नाही** | २८३ | ७९.७१ |
| **होय** | १ | ००.२८ |
| **नाही** | ७१ | २०.०० |
| **एकूण** | ३५५ | १००.०० |
| **इतर** | | |
| **प्रतिसाद नाही** | ३३५ | ९४.३६ |
| **होय** | १ | ००.२८ |
| **नाही** | १९ | ०५.३५ |
| **एकूण** | ३५५ | १००.०० |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण

उपरोल्लेखित (सारणी २४) आकडेवारीकडे दृष्टिक्षेप टाकला तर बहुतांश प्रकल्पबाधित शेतकरी कुटुंबाकडे शेतीव्यतिरिक्त इतर उत्पन्नाचे मार्ग शक्यतो नाहीतच असेच दिसून येते. बिगर कृषि व्यवसाय आकडेवारीचे निरीक्षण करता अनेक प्रतिसादकांनी या प्रश्नाचे उत्तर टाळले आहे. कारण त्यांच्याकडे तसा काही व्यवसाय नसल्याने संबंधित प्रश्नाचे उत्तर त्यांनी टाळले असल्याचे दिसून आले.

**सारणी ८.२६:** आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित कुटुंबाचे वित्तीय सेवा वापराविषयीचे विवेचन

| वित्तीय सेवा | उपलब्धता | उपलब्धता प्रमाण (टक्के) |
|---|---|---|
| **बँक खाते** | | |
| प्रतिसाद नाही | ४ | १.१३ |
| होय | ३४० | ९६.०५ |
| नाही | १० | २.८२ |
| एकूण | ३५४ | १००.०० |
| **बचतगट सदस्यत्व** | | |
| प्रतिसाद नाही | ३६ | १०.१४ |
| होय | ८३ | २३.३८ |
| नाही | २३६ | ६६.४८ |
| एकूण | ३५५ | १००.०० |
| **पोस्ट बचत खाते** | | |
| प्रतिसाद नाही | ३३ | ९.३० |
| होय | ८९ | २५.०७ |
| नाही | २३३ | ६५.६३ |
| एकूण | ३५५ | १००.०० |
| **पतसंस्था खाते** | | |
| प्रतिसाद नाही | ३७ | १०.४२ |
| होय | ७५ | २१.१३ |
| नाही | २४३ | ६८.४५ |
| एकूण | ३५५ | १००.०० |
| **सहकारी बँक खाते** | | |
| प्रतिसाद नाही | २७ | ७.६१ |
| होय | १५५ | ४३.६६ |
| नाही | १७३ | ४८.७३ |
| एकूण | ३५५ | १००.०० |
| **एलआयसी** | | |
| प्रतिसाद नाही | ३८ | १०.७० |
| होय | ७७ | २१.६९ |
| नाही | २४० | ६७.६१ |
| एकूण | ३५५ | १००.०० |
| **पशु विमा** | | |
| प्रतिसाद नाही | ४९ | १३.८० |
| होय | ८ | २.२५ |

| | | |
|---|---|---|
| नाही | २९८ | ८३.९४ |
| एकूण | ३५५ | १००.०० |
| **पिक विमा** | | |
| प्रतिसाद नाही | ४७ | १३.२४ |
| होय | २१ | ५.९२ |
| नाही | २८७ | ८०.८५ |
| एकूण | ३५५ | १००.०० |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण

ॲग्रिकल्चरल इन्श्युरन्स कंपनी ऑफ इंडिया (AICI) ची स्थापना १९८४ मध्ये करून भारत सरकारने देशात कृषि पीक विमा सुविधा सुरू केली. परंतु आजपावेतो कृषि पीक विम्याचा वापर/प्रसार साधारणपणे २४.०० टक्क्यांपर्यंतच सिमीत असल्याचे दिसून येते. आंबेओहोळ सिंचन प्रकल्पबाधितांच्या प्राथमिक माहिती पृथक्करणावर दृष्टिक्षेप टाकला तर असे दिसून येते की कृषि पीक विम्याचा प्रसार ०२.९५ टक्क्यांपर्यंतच सिमीत आहे. म्हणजेच देशपातळीवरील सरासरीच्या कमी प्रमाण असल्याचे सत्य समोर येते. मात्र पाळीव प्राणी विमा आकडेवारीकडे पाहता यापेक्षाही असमाधानकारक आकडेवारी समोर येते. कारण पाळीव प्राण्यांचे विमा प्रमाण ०२.३५ टक्के इतके अल्प प्रमाणात आहे. वित्तीय सेवांच्या वापरात प्रामुख्याने बँक ठेवी, कर्ज आणि विम्याची सुविधा या प्रमुख घटकांचा समावेश केला जातो. प्रकल्पबाधितांच्या बँक खाते प्रमाणाचा विचार केला तर मात्र आपणास काहीसे समाधानकारक चित्र दिसून येते (९६.०५ टक्के) परंतु स्वयंसहाय्यता बचत गट (२३.३८ टक्के) आणि पोस्टातील बचत खाते (२५.०७ टक्के) याबाबतची आकडेवारी फारशी समाधानकारक नाही असेच म्हणावे लागेल. विकास सेवा सहकारी सोसायटीत तर सर्वांचे खाते असते अपेक्षित आहे. परंतु एकूण प्रतिसादकांपैकी फक्त २१.१८ टक्के प्रतिसादकांनी याबाबतचे सकारात्मक उत्तर दिले आहे तर सहकारी बँकेतील खाते (४३.६६ टक्के) निम्म्याहून कमी कुटुंबाचे असल्याचे समोर आले. सर्व प्रकारच्या सामाजिक व आर्थिक निर्देशकांचा वापर करून प्रस्तुत प्रकल्पबाधितांचे अवलोकन करण्याकामी आम्ही वित्तीय निर्देशकांचाही वापर करून पाहता आम्हास काहीसे असमाधानकारकच उत्तर मिळाले.

**सारणी ८.२७:** आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित कुटुंबाचे कर्जप्रकार, कर्ज रक्कम, परतफेड व थकबाकीविषयी विवेचन

| | मूळ कर्ज (रूपये) | परतफेड (रूपये) | परतफेड प्रमाण (टक्के) | थकबाकी (रूपये) | थकबाकी प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|---|---|
| पिक कर्ज | ४२०९८४८ | ८७३०६ | २.०७ | १३८५००५ | ३२.९० |
| खावटी कर्ज | १०९००० | ० | ०.०० | ५१९०० | ४७.६१ |
| विहीर | ० | ० | | ० | |
| बोअरवेल | ३०००० | ३०००० | १००.०० | ० | ०.०० |
| पाईपलाईन | ० | ० | | ० | |
| ट्रॅक्टर | १५०००००० | ६००००० | ४०.०० | ११००००० | ७३.३३ |
| डिझेल इंजिन | ८००० | ८००० | १००.०० | ० | ०.०० |
| पंपसेट | ० | ० | | ० | |
| जमीन दुरूस्ती | २५००० | १०००० | ४०.०० | १५००० | ६०.०० |
| गाय खरेदी | ० | ० | | ० | |
| म्हैस खरेदी | ५८४५०० | ९८००० | १६.७७ | १९०००० | ३२.५१ |
| बैल खरेदी | ० | ०० | ० | ० | ० |
| जमीन खरेदी | ० | ० | ० | ० | ० |
| मळणी यंत्र घेणे | २५००० | १०००० | ४०.०० | १५००० | ६०.०० |
| घर बांधणी | ५९४५००० | ७४०००० | १२.४५ | २०५५००० | |
| इतर | ३१०००० | १००००० | ३२.२५८०६४५ | १६०००० | सरासरी: ५१.०५ |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण



प्रत्येक शेतकऱ्यास विविध कारणांकरीता तात्पुरती व गुंतवणुकीच्या उद्देशाने अल्प, मध्यम व दीर्घकालीन कर्जाची आवश्यकता असते. शेतकऱ्यांनी विविध उद्दिष्टांसाठी काढलेली कर्जे वेळेवर परतफेड केली तर पुढच्या कर्जाकरीता ते पात्र ठरतात. अन्यथा त्यांचे कर्जखाते थकबाकीत जावून त्यांना भविष्यातील कर्ज मिळणे अशक्य बनते. पर्यायाने अशा अवस्थेचे रूपांतर थकबाकी कर्जात होवून त्यांच्या आर्थिक परिस्थितीवर गंभीर परिणाम संभवतो. त्यामुळे आम्ही आंबेओहोळ प्रकल्पबाधितांचे सर्वेक्षण करताना त्यांचा कर्ज हेतू, कर्ज रक्कम, परतफेडीची रक्कम आणि थकबाकीची रक्कम अशी विचारणा करून प्राप्त आकडेवारीचे पृथक्करण केले. प्राप्त आकडेवारी व पृथक्करणावरून प्रकल्पबाधितांनी काढलेल्या विविध प्रकारच्या कर्जांपैकी काही कर्जांच्या थकबाकीचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते. कर्ज हेतूनुसार थकबाकीचे प्रमाण; पीक कर्ज – ३२.९०, खावटी कर्ज – ४७.६१, ट्रॅक्टर – ७३.३३, जमीन दुरूस्ती – ६०.६०, म्हैस खरेदी कर्ज – ३२.५१ आणि मळणी यंत्र खरेदी कर्ज –६०.०० टक्के असे निदर्शनास येते. कर्ज परतफेडीच्या अडचणींमुळे थकबाकीची समस्या देशभरातील शेतकऱ्यांसमोर आहेच. त्याचीच पुनरावृत्ती आंबेओहोळ प्रकल्पग्रस्तांच्याबाबतही दिसून आली.

**सारणी ८.२८:** आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना प्रकल्पबाधित जमिनीच्या मोबदल्यात मिळणाऱ्या किंमत समाधानाबाबतचे विवेचन

| | टक्के |
|---|---|
| **होय** | ९.३५ |
| **नाही** | ६४.५९ |
| **प्रतिसाद नाही** | २६.०६ |
| **एकूण** | १००.०० |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण




**सारणी ८.२९:** आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित शेतकऱ्यांनी सिंचन प्रकल्पास केलेल्या विरोधाच्या प्रकारान्वये विवेचन

| | **टक्के** |
|---|---|
| **विरोधी आंदोलन** | ५२.९७ |
| **सौदे करताना ताठर भूमिका** | १३.०३ |
| **समितीच्या माध्यमातून विरोध** | ३.९७ |
| **न्यायालयीन लढाई** | ८.७८ |
| **विरोध नाही** | १७.०० |
| **प्रतिसाद नाही** | ४.२५ |
| **एकूण** | १००.०० |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण




बहुतांशी प्रकल्पबाधितांना (६४.५९ टक्के) त्यांच्या प्रकल्पबाधित जमिनीच्या मोबदल्यात

मिळणारा मोबदला समाधानकारक नाही असेच दिसून येते. पर्यायाने त्यांनी प्रकल्पविरोधी आंदोलन (५२.९७ टक्के), जमिनीची किंमत ठरविताना ताठर भूमिका (१३.०३ टक्के), समितीच्या माध्यमातून संघटित विरोध (८.७८ टक्के) इत्यादी स्वरूपात स्वत:स न्याय मिळविण्याचा प्रयत्न केला. परंतु तरीही प्रामुख्याने पुनर्वसनाच्या प्रश्नामुळेच प्रकल्पाचे कार्य अनेक वर्षे पूर्णत्वास जावू शकले नाही. प्रकल्पपूर्तीस झालेल्या विलंबामुळेच महाराष्ट्रातील प्रत्येक सिंचन प्रकल्पाच्या मूळ खर्चात अनेकपटींनी वाढ झाल्याचे दिसून येते. प्रस्तुत प्रकल्पाबाबतही हेच वास्तव आहे. त्यामुळे पुनर्वसनकामी ताठर भूमिका घेवून प्रकल्पव्ययात अनाठायी वाढ होवू देण्याऐवजी शासनाने जर सुरूवातीसच प्रकल्पबाधितांच्या मोबदला/जमिन किंमतविषयक मागण्या मान्य केल्या तर प्रकल्पाचा विरोध कमी होवून संबंधित प्रकल्प वेळेत पूर्ण होण्यास मदत होईल. आणि प्रकल्पबाधितांना दिलेल्या अधिकच्या मोबदल्यापेक्षा प्रकल्प वेळेत पूर्ण होवून त्यापासून प्राप्त लाभ निश्चितपणे अधिक असतील.

**सारणी ८.३०:** आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित शेतकऱ्यांच्या शासनाकडून प्रमुख मागण्या

| | टक्के |
|---|---|
| **जमिनीच्या बदल्यात जमीन** | ६९.६० |
| **बाजारभावापेक्षा जमिनीस अधिक भाव** | १७.९० |
| **नवीन जागी गावाचे पुनर्वसन** | १.७० |
| **प्रकल्पग्रस्तास नोकरी** | ३.४१ |
| **जमीन व घराची किंमत बाजारभवाप्रमाणे** | ३.६९ |
| **प्रतिसाद नाही** | ४.२६ |
| **एकूण** | १००.०० |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण




प्रकल्पबाधित ''जमिनीच्या बदल्यात जमीन'' (६९.६० टक्के) हीच प्रमुख मागणी असल्याचे निदर्शनास येते. काही प्रकल्पबाधितांना त्यांच्या जमिनीत बाजारभावापेक्षा अधिक दर मिळण्याची अपेक्षा (१७.९० टक्के) आहे. अर्थात प्रचलित बाजारभावाच्या चारपट किंमत हे तत्त्व २०१३ च्या भूमि अधिग्रहण, पुनर्वसन आणि पुनरस्थिरीकरण कायद्यातही नमूद आहेच. प्रस्तुत प्रकल्पात एकूण सात गावातील शेतकऱ्यांची जमीन बाधित होते. परंतु गावे मात्र बाधित होत नाहीत. त्यामुळे गावांच्या पुनर्वसनाचा प्रश्न आपोआपच निकाली निघतो. प्रकल्पग्रस्त कुटुंबातील रोजगारक्षम वयोगटातील व्यक्तीस नोकरी (३.४१ टक्के) असेही काही प्रकल्पग्रस्तांचे म्हणणे आहे आणि त्याकामी शासनाने नकार देण्याचे कारण नसावे.

**सारणी ८.३१:** आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित शेतकऱ्यांचे प्रकल्पाच्या फायद्याविषयी मतप्रदर्शन

| | **टक्के** |
|---|---|
| **होय** | ३६.५४ |
| **नाही** | ६२.६१ |
| **प्रतिसाद नाही** | ०.८५ |
| **एकूण** | १००.०० |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण




**सारणी ८.३२:** आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित शेतकऱ्यांचे प्रकल्पामुळे शक्य लाभांविषयी मतप्रदर्शन

| | टक्के |
|---|---|
| **जमिनीस योग्य किंमत** | २४.९३ |
| **रोजगार मिळेल** | १२.४६ |
| **रोजगार संधी निर्माण होईल** | ९.६३ |
| **सांगता येत नाही** | ५१.५६ |
| **प्रतिसाद नाही** | १.४२ |
| **एकूण** | १००.०० |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण



बहुतांशी प्रकल्पबाधितांना (६२.६१ टक्के) आंबेओहोळ प्रकल्पामुळे प्रत्यक्ष लाभ होणार नाही असेच वाटते. परंतु काही प्रकल्पग्रस्तांना (३६.५४ टक्के) मात्र प्रस्तावित प्रकल्पाचे लाभ संभवतात असे त्यांनी मतप्रदर्शन केले आहे. ज्या प्रकल्पबाधितांना सिंचन प्रकल्पामुळे लाभ होईल असे वाटते त्याचे स्वरूप जमिनीस अधिक किंमती मिळतील म्हणजेच भांडवली मूल्य वृद्धीची शक्यता (२४.९३ टक्के) आणि रोजगार संधी (१२.४६ टक्के) असे दिसून आले. अर्थात प्रत्येक सिंचन प्रकल्पामुळे प्रकल्पबाधन जमिनींव्यतिरिक्त उर्वरित जमिनी आणि प्रकल्पलाभक्षेत्रातील जमिनींच्या बाबतीत असे परिणाम संभवत असतातच.

**सारणी ८.३३:** आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित शेतकऱ्यांचे शेती व्यवसाय न करण्याविषयीची कारणमिमांसा

| | **टक्के** |
|---|---|
| **व्यवसायाचे ज्ञान आहे** | ७७.३४ |
| **व्यवसाय आवडतो** | ८.७८ |
| **परंपरागत व्यवसाय आहे** | ७.३७ |
| **वडिलांचा व्यवसाय आहे** | ४.८२ |
| **प्रतिसाद नाही** | १.७० |
| **एकूण** | १००.०० |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण



राष्ट्रीय नमुना पाहणी २००५ च्या अहवालानुसार देशपातळीवर ४९.०० टक्के शेतकरी जर उदरनिर्वाहाचा पर्यायी माग मिळाला तर शेती व्यवसाय सोडण्याची तयारी असल्याचे निदर्शनास आलेले आहेच. आंबेओहोळ प्रकल्पबाधितांपैकीही अनेक शेतकऱ्यांना शेती व्यवसाय बंद करण्याचीच इच्छा आहे. अर्थात शेती व्यवसाय बंद करण्याची काही कारणे त्यांनी नमूद केली आहेत व ती शेती व्यवसाय तोट्यात चालतो (७७.३४ टक्के), अती कष्टाचे काम परंतु त्याबदल्यात मिळणारा अत्यल्प मोबदला (८.७८ टक्के) तरूणपिढीचे शेतीक्षेत्राकडे दुर्लक्ष (७.३७ टक्के) आणि कृषि व्यवसाय किंवा शेतकऱ्यास समाजात किंमत नाही (४.८२ टक्के) याप्रमाणे नमूद केलयाची दिसून येतात. याचाच अर्थ प्रकल्पबाधित शेतकऱ्यांच्या प्रकल्पबाधित जमिनींची किंमत/मोबदला ठरविताना किंवा त्यांचे उत्पादक पुनर्वसन करताना शासनाने किती संवेदनशील असणे आवश्यक आहे याची यावरून कल्पना येते.

**सारणी ८.३४:** आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित शेतकरी प्रकल्पबाधित शेतीच्या मोबदल्यातून नवीन शेती घेवू इच्छिण्याची कारणे

| | **टक्के** |
|---|---|
| **शेती हाच व्यवसाय करणार** | ६०.३४ |
| **जमीन खरेदी फायदेशीर** | १९.८३ |
| **प्रतिसाद नाही** | १९.८३ |
| **एकूण** | १००.०० |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण



अर्थात असेही काही प्रकल्पबाधित शेतकरी आहेत की जे प्रकल्पबाधित जमिनीच्या बदल्यात नवीन जमीन घेवून त्यांचा शेती व्यवसाय सुरू ठेवू इच्छितात. यापैकी काहींना (६०.३४ टक्के) शेती व्यवसायच करावा असे वाटते तर उर्वरित (१९.८३ टक्के) प्रकल्पबाधितांना शेती घेणे केव्हाही किफायतशीर असते असे वाटते. म्हणजेच राष्ट्रीय पातळीवरील शेतकऱ्यांच्या शेती व्यवसाय त्यागाबरहुकूम जरी अनेक प्रकल्पबाधितांना शेतीचा त्याग करावा असे वाटत असले तरीही काही प्रकल्पबाधितांना शेती व्यवसाय सुरू ठेवावा असेही वाटते.

**सारणी ८.३५:** आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना प्रकल्पबाधित शेतजमिनीच्या मोबदल्यात शक्य जमीन खरेदीविषयक अपेक्षांचे विवेचन

| | **टक्के** |
|---|---|
| **तेवढीच जमीन** | ४.५३ |
| **त्यापेक्षा अधिक** | ६.२३ |
| **त्यापेक्षा कमी** | ३२.२९ |
| **सांगता येत नाही** | ४८.१६ |
| **प्रतिसाद नाही** | ८.७८ |
| **एकूण** | १००.०० |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण




बहुतांशी प्रकल्पबाधितांना प्रकल्पबाधित जमिनीच्या मोबदल्यात आपण नव्याने किती जमीन खरेदी करू शकतो याचा काहीही अंदाज नाही (४८.१६ टक्के) तर काहींना

(४.५३ टक्के) प्रकल्पबाधन मोबदल्यात प्रकल्पबाधित जमिनीइतकी जमीन आपण खरेदी करू शकतो असा आशावाद आहे. विशेष म्हणजे काही प्रकल्पबाधितांना प्रकल्पबाधित जमिनीच्या मोबदल्याविषयी असा आशावाद आहे की त्याच्या सहाय्याने ते (६.२३ टक्के) प्रकल्पबाधित जमिनीपेक्षा अधिक जमीन खरेदी करू शकतात. मात्र बहुतांश (३२.२९ टक्के) प्रकल्पबाधितांना जमिनींच्या वाढत्या किंमतीमुळे प्रकल्पबाधन मोबदल्यात प्रकल्पबाधित जमिनीइतकी जमीन खरेदी करता येणे कदापि शक्य नाही असे वाटते व ते निश्चितपणे सत्य आहे. कारण प्रकल्पबाधनामुळे परिसरात जमिनीची मागणी वाढल्याने किंमती वाढतात व त्यामुळे प्रकल्पबाधितांना जर त्यांच्या ‘‘जमिनीच्या मोबदल्यात जमिन’’ मिळाली नाही तर मिळणाऱ्या पैशाच्या मोबदल्यात पुन्हा जमीन खरेदी शक्य होत नाही.

**सारणी ८.३६:** आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित शेतकऱ्यांचे प्रकल्प कामाविषयी मतप्रदर्शन

| | **टक्के** |
|---|---|
| **होय** | २०.९६ |
| **नाही** | ७७.०५ |
| **प्रतिसाद नाही** | १.९८ |
| **एकूण** | १००.०० |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण



प्रकल्पाचे काम, त्यासाठीचा अक्षम्य विलंब आणि वेळोवेळी बंद पडलेले प्रकल्पाचे काम पुन्हा सुरू करताना शासनाच्या प्रकल्प विभाग, महसूल विभाग आणि पोलीस कर्मचारी व अधिकाऱ्यांनी प्रकल्पग्रस्तांना दिलेल्या वर्तणुकीमुळे आणि केलेल्या अन्याय व अत्याचारामुळे बहुतांश (७७.०५ टक्के) प्रकल्पबाधित शेतकरी कुटुंबे प्रकल्प कामासंबंधी असमाधानी आहेत. अनेकदा अचानक बंद पडलेले काम सुरू झाल्याने आणि पुनर्वसनाचे काम प्रलंबित असल्यामुळे प्रकल्पबाधितांनी विरोध दर्शविला. त्यांना पोलीसांनी बळाचा वापर करून अटक केल्याचे निवेदन सर्वच सर्वेक्षित प्रकल्पबाधितांनी केल्याचा अनुभव आला.

**सारणी ८.३७:** आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित शेतकऱ्यांचे प्रकल्पोपरांत रोजगार संधीविषयी मतप्रदर्शन

| | **टक्के** |
|---|---|
| **नाही मिळणार** | २०.९६ |
| **रोजगार मिळेल** | ६.५२ |
| **प्रत्यक्ष रोजगार** | ११.०५ |
| **सांगता येत नाही** | ५९.४९ |
| **प्रतिसाद नाही** | १.९८ |
| **एकूण** | १००.०० |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण



बहुतांश प्रकल्पबाधित शेतकरी (५९.४९ टक्के) प्रकल्पोपरांत निर्मित रोजगार संधीविषयी आपले मत प्रदर्शन करण्यास असमर्थ असल्याचे दिसून आले. याचाच काहीसा अर्थ असा निघतो की प्रकल्पोपरांत निर्मित रोजगार संधीबाबत त्यांना शाश्वती वाटत नाही. अर्थात यातच कोणत्याही प्रकल्पाचे यशापयश सामावलेले असते. परिणामकारक संख्येने २०.९६ टक्के प्रकल्पबाधितांना प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर त्यांना कोणत्याही रोजगार संधी उपलब्ध होणार नाहीत असे वाटते. कारण प्रकल्पोपरांत सर्व फायदे प्रकल्प लाभक्षेत्रातील लोकांनाच होणार असल्याने प्रकल्पबाधितांना त्याचा काहीही लाभ संभवत नाही असेच वाटते. म्हणजेच प्रकल्पबाधितांचे उत्पादक व आर्थिक पुनर्वसन कसे होते यावरच त्यांचे सर्व भविष्य निर्भर आहे असे मानावे लागेल.

**सारणी ८.३८:** आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधितांना प्रकल्प पूर्णत्वानंतर अपेक्षित परिणाम

| | **टक्के** |
|---|---|
| **गरीबांना पैसा मिळेल** | १७.८५ |
| **सामाजिक संबंध सुधारतील** | १६.१५ |
| **नवीन कृषि तंत्राचा वापर** | ५२.६९ |
| **श्रीमंत अधिक श्रीमंत होतील** | ५.९५ |
| **प्रतिसाद नाही** | ७.३७ |
| **एकूण** | १००.०० |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण



प्रकल्पपूर्ततेनंतर पाणीपुरवठ्याची सुविधा उपलब्ध झाल्यानंतर शेतात आधुनिक तंत्र व औजारांचा वापर शक्य होईल असे (५२.६९ टक्के) बहुसंख्य प्रकल्पबाधितांचे मत आहे. अर्थात या तंत्राचा वापर फक्त प्रकल्प लाभक्षेत्रातच होईल याबद्दलही त्यांना शंका नसल्याचे त्यांनी समूहचर्चेच्या वेळी नमूद केले.

**सारणी ८.३९:** आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प सर्वेक्षित प्रकल्पबाधित शेतकऱ्यांचे प्रकल्प कामावर रोजंदारीस जाण्याविषयी मतप्रदर्शन

| | टक्के |
|---|---|
| **होय** | १८.३६ |
| **नाही** | ७५.४२ |
| **प्रतिसाद नाही** | ६.२१ |
| **एकूण** | १००.०० |

संदर्भ: क्षेत्र सर्वेक्षण




बहुतांश प्रकल्पबाधितांना (७५.४२ टक्के) प्रकल्पाच्या कामावर रोजंदारीसाठी जाण्याची अजिबात इच्छा नाही असे मतप्रदर्शन येते. कारण प्रकल्पबाधितांना प्रस्तुत प्रकल्पाबाबत फारशी आस्था नाहीच परंतु इतरत्र रोजंदारीची कामे उपलब्ध असल्यामुळे त्यांना प्रकल्प रोजंदारीत काहीही स्वारस्थ्य नाही. अर्थात सुरूवातीपासूनच प्रकल्पाचे काम कधीही नियमितपणे सुरू नसल्यामुळे प्रस्तुत प्रकल्पबाधितांच्या प्रकल्प कामावरील रोजगाराविषयीच्या अपेक्षा संपुष्टात आलेल्या आहेत हे एक; आणि दोन म्हणजे प्रकल्प

कामावर शक्यतो मानवी श्रमाऐवजी यांत्रिक श्रमाचाच वापर होत असल्यामुळे प्रकल्प आणि प्रकल्पबाधित यांच्यात कोणतेही रोजगारविषयक संबंध निर्माण होवू शकले नाहीत हे वास्तव आहे.





# प्रकरण: ९

# गडहिंग्लज तालुक्यातील चित्री मध्यम सिंचन प्रकल्पलाभधारक तथा आंबेओहोळ पुनर्वसनकामी प्रकल्पबाधित शेतकरी कुटुंबांचे सर्वेक्षण

**प्रास्ताविक:**

आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्पबाधित एकूण सात गावांच्या शेतकऱ्यांच्या पुनर्वसनातील महत्त्वाची अडचण म्हणजे गडहिंग्लज तालुक्यातील चित्री मध्यम सिंचन लाभधारक पट्ट्यातील जमिनींचे अधिग्रहण होय. आंबेओहोळ सिंचन प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनकामी गडहिंग्लज तालुक्यात चित्री लाभपट्ट्यातील शेतकऱ्यांच्या जमिनींचे अधिग्रहण केले आहे. निदान कागदोपत्री तरी तसे सिद्ध होते. या शेतकऱ्यांना विविध कारणांमुळे त्यांच्या शेतजमिनींचे अधिग्रहण म्हणजे त्यांच्यावरील अन्याय वाटत असल्यामुळे त्यांनी प्रस्तुत पुनर्वसनार्थ अधिग्रहणविरोधी न्यायालयात धाव घेतल्याने पुनर्वसनार्थ भूमि अधिग्रहण प्रक्रिया न्यायप्रविष्ट झाली आहे. पर्यायाने आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्पाच्या पुनर्वसनाचे काम ठप्प झाले आहे. कारण प्रकल्पबाधितांना त्यांच्या जमिनीच्या बदल्यात पुनर्वसनार्थ देण्यासाठी कागदोपत्री जरी उपलब्ध असल्या तरी प्रत्यक्षात मात्र जमिनी उपलब्ध नाहीत ही वास्तव स्थिती आहे. प्रकल्पाचा सापनि अहवाल अभ्यास प्रामुख्याने प्रकल्प पुनर्वसनाची सद्यस्थितीवरही निर्भर असल्यामुळे प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनातील प्रमुख अडचणी तपासणे हादेखील अभ्यासाचा एक उद्देश होताच.

**सारणी ९.१: आंबेओहोळ मध्यम प्रकल्पाकरीता चित्री लाभक्षेत्र संपादन**

| अ. क्र. | गावाचे नांव | कायदेशीर अडचणी नसलेले एकूण खातेदार संख्या | | संपादन पात्र खातेदारांची संख्या | गेत्र/ हे. आर. |
|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | हे. आर. | | |
| १ | मौजे बेळगुंदी | ५ | २२.०१५ | ५ | ३.७४ |
| २ | मौजे जरळी | ७ | ५५.७७९ | ७ | २५.२८ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | मौजे हेब्बाळ क. नूल | ७ | ३६.८७२ | ७ | ७.४६ |
| ४ | मौजे मुगळी | २ | १२.२२ | १ | १.२२ |
| ५ | मौजे दुंडगे | २ | ११.९७२ | २ | २.८९ |
| ६ | मौजे भडगाव | ४३ | १९९.६ | ७ | ६.३४ |
| ७ | मौजे गडहिंग्लज | ९ | १८.४०९ | ५ | २.५१ |
| ८ | मौजे हरळी खुर्द | २ | ३५.१७५ | - | - |
| ९ | मौजे हरळी बुद्रुक | ५ | २६.०९ | ४ | ५.७८ |
| १० | कसबा नूल | ३५ | १५२.८५ | २ | २.८३ |
| ११ | महागाव | २४ | ७.०४ | ३ | १.९६ |
| १२ | हितलगे | १ | ४.९२६ | १ | ०.४० |
| एकूण | | **१४२** | **५८२.९४६** | **४४.००** | **६०.४१** |

**संदर्भ:** कोल्हापूर पाटबंधारे विभाग, कार्यकारी अभियंता कार्यालय, कागदपत्रे

आंबेओहोळ प्रकल्पग्रस्त ग्रामस्थांच्या भेटीतून व चर्चेमधून पुनर्वसनार्थ भूमि अधिग्रहणाची न्यायप्रविष्ठता सापनि अभ्यासगटाच्या लक्षात आल्यानंतर अभ्यासगटाने गडहिंग्लज तालुक्यातील प्रस्तावित पुनर्वसन क्षेत्राचा दौरा केला असता संबंधित प्रकल्पलाभधारक तथा प्रकल्पबाधित शेतकऱ्यांनी अनेक समस्या नमूद केल्या. पयार्यायाने सापनि अभ्यासगटाने संबंधित शेतकरी कुटुंबांचे सर्वेक्षण करून प्राप्त प्राथमिक माहितीवर आधारित प्रस्तुत प्रकरण अभ्यास अहवालाचा भाग बनविण्याचा निर्णय घेतला.

आंबेओहोळ सिंचन प्रकल्पबाधितांच्या उत्पादक पुनर्वसनार्थ गडहिंग्लज तालुक्यात चित्री प्रकल्पलाभक्षेत्रातील अनुक्रमे बेळगुंदी, जरळी, हेब्बाळ, कसबा नूल, मुगळी, दुंडगे, भडगांव, गडहिंग्लज, हरळी खुर्द, हरळी बुद्रुक, महागाव आणि रिलगे या गावांतील एकूण कायदेशीर अडचण असलेले आणि कायदेशीर अडचण नसलेल्या शेतकऱ्यांकडून अनुक्रमे ६०.४१ आणि ५८२.९४६ हेक्टर आर अशी एकूण ६४३.३५६ हेक्टर आर इतकी जमीन संपादन प्रक्रिया शासनाने राबविली आहे. परंतु यापैकी अनेक शेतकऱ्यांना आपल्यावर अन्याय होत असल्याची भावना असल्याने त्यांनी न्यायालयात धाव घेवून

आपले म्हणणे मांडले असल्याने पुनर्वसनाची प्रक्रिया रखडली आहे. म्हणजेच प्रस्तुत पुनर्वसन प्रक्रिया रखडण्यात किंवा धरणाच्या कामास विलंब होण्याकरीता प्रकल्पबाधित शेतकरी निश्चितच जबाबदार नाहीत हे मान्य करावे लागेल. अशा गुंतागुंतीचा अभ्यास करून त्याचा प्रस्तुत सापनि अहवालात समावेश करण्याकरीता आम्ही गडहिंग्लज तालुक्यातील अशा प्रकल्पलाभधारक तथा प्रकल्पबाधित शेतकऱ्यांच्या सर्वेक्षणकामी एक वेगळी प्रश्नावली तयार करून प्रत्यक्ष स्थळभेटीच्या माध्यमातून सर्वेक्षण करून प्राप्त प्राथमिक माहितीवर निर्भर अनेक वास्तव बाबींची कल्पना आली.

विशेष म्हणजे चित्री प्रकल्पलाभक्षेत्रातील या शेतकऱ्यांच्या जमिनी यापूर्वीही प्रकल्पबाधितांना पुनर्वसनार्थ देण्याकरीता अधिग्रहित केल्या होत्या व त्यामुळे आता पुन्हा आंबेओहोळ प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनार्थ त्यांच्या जमिनींचे अधिग्रहण म्हणजे त्यांना त्यांच्यावर अन्याय वाटत असल्याने त्यांचा प्रस्तुत पुनर्वसनार्थ अधिग्रहणास विरोध आहे. त्यामुळे हे शेतकरी न्यायालयात गेले असल्याचे समजते.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे कमाल जमिनधारणा तत्त्वाचे अवलंबन करून गडहिंग्लज तालुक्यातील या सर्व शेतकऱ्यांच्या जमिनींचे पुनर्वसनार्थ अधिग्रहण अवलंबले आहे. परंतु यातील अनेक कुटुंबे एकत्र कुटुंब पद्धतीची आहेत. परंतु त्यांची कागदोपत्री जमिन खातेफोड झालेली नसल्याने वडील किंवा मोठ्या भावाच्या नावावरच जमिनी असल्यामुळे कमाल जमिनधारणा तत्त्वानुसार त्यांच्याकडे अधिकच्या जमिनी दिसतात. परंतु अनेक कुटुंबांच्या बाबतीत खातेफोड आवश्यक आहे. आणि अशी खातेफोड झाली म्हणजे कुटुंबातील इतर भाऊ किंवा वय वर्षे अठरापेक्षा जास्त पुरुषांच्या नावे जमीन विभाजित केली तर कमाल जमिनधारणा सूत्राची अंमलबजावणी करता येणे कदापि शक्य नसणार अशी अनेक कुटुंबे आहेत. अशा शेतकरी कुटुंबांचा प्रस्तुत आंबेओहोळ प्रकल्प पुनर्वसनार्थ अधिग्रहणास विरोध आहे असे दिसते. विशेष म्हणजे वास्तवाचा विचार केला तर या बाबी गंभीर स्वरूपाच्या आहेत. त्यामुळे महसूल विभागाने जमिनींच्या कागदोपत्री नोंदीवरून अधिग्रहणाचे तत्त्व न अवलंबिता संयुक्त

कुटुंबपद्धतीच्या अशा कुटुंबांचे सर्वेक्षण करून जमीन खातेफोडीची आवश्यकता लक्षात घेवूनच या जमिनींच्या पुनर्वसनार्थ अधिग्रहणाचा विचार करणे योग्य ठरेल.

विशेष म्हणजे गडहिंग्लज तालुक्यातील पुनर्वसनार्थ जमीन अधिग्रहण करावयाच्या नावांमध्ये अनेक ठिकाणी देवस्थानच्या जमिनी, इनामी जमिनी, राजेरजवाड्यांच्या जमिनी, वनजमिनी, सरकारी पडिक जमिनी, गायरान जमिनी इत्यादी अनेक प्रकारच्या जमिनी उपलब्ध आहेत. अशा जमिनींचे पुनर्वसनार्थ हस्तांतरण/अधिग्रहण करून या जमिनी आंबेओहोळ प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनाकरीता वापरता येणे शक्य आहे. महसूल विभागाने तसे करणे या सर्व शेतकऱ्यांना अभिप्रेतही आहे. परंतु महसूल अधिकारी याकडे दुर्लक्ष करून गडहिंग्लज तालुक्यातील या शेतकऱ्यांच्या जमिन अधिग्रहणाचे धोरण राबवित आहेत ते योग्य नाही असे मत नोंदवावे वाटते. काही शेतकऱ्यांच्या बाबतीत अशीही परिस्थिती लक्षात आली की या शेतकऱ्यांना जरी चित्री प्रकल्प लाभधारकतेच्या परिक्षेत्रात समाविष्ट केले असणे व त्यामुळे सिंचन प्रकल्प लाभधारक समजून त्यांच्या धारणक्षेत्रावर बागायती कमाल जमिन धारणा तत्त्व लागू केले असले तरीही त्यापैकी अनेकांना अद्याप चित्री धरण पाण्याचा लाभ झालेला नाही. अशा कुटुंबाच्या जमिनधारणेवर बागायती कमाल जमिनधारणा तत्त्व लागू करणे त्यांच्यावरील अन्याय आहे असे त्यांचे मत असल्याने त्यांचा पुनर्वसनार्थ अधिग्रहणास विरोध आहे आणि या युक्तिवादात तथ्यही आढळते.

**सारांशात:**

असे की खातेफोडीचे सर्वेक्षण न करताच पुनर्वसनार्थ भूमि अधिग्रहणाचा अन्याय, परिक्षेत्रात अनेक सार्वजनिक जमिनी उपलब्ध असताना त्याकडे प्रशासकीय दुर्लक्ष करून शेतकऱ्यांच्या जमिनींचे अधिग्रहण, चित्री प्रकलपाचे पाणी न पोहोचता अनेक शेतकऱ्यांवर बागायती जमिन कमाल धारण मर्यादा तत्त्व लागू करणे, यापूर्वीही याच शेतकऱ्यांच्या जमिनी चित्री प्रकल्प पुनर्वसनार्थ अधिग्रहण झाल्याने पुन:श्च अधिग्रहणाचा अन्याय इत्यादी बाबींमुळे हे शेतकरी न्यायालयात गेल्याचे दिसून आले आहे. एकंदरीत

काय तर प्रशासकीय दुर्लक्ष आणि सहजतेने ज्यांच्या जमिनी अधिग्रहित करता येतील अशा शेतकऱ्यांवर घाला घालते अशीच काहीशी भावना सापनि अभ्यासगटास गडहिंग्लज तालुक्यात पाहणी करता दिसून आली. त्यामुळे आंबेओहोळ प्रकल्प पुनर्वसनाचे काम रखडे आहे असे दिसून येते.

मौजे - बोळगुर्दे · ता ३५

पानसंख्या ?

नक्कल अर्ज दि. ३ / ४ / २००२ येथील गा नं ७ ६ चा उतारा

नक्कल तयार दि. ५ / ४ / २००२ फे. नं १३५ चा प्रती

नक्कल दिली दि. ५ / ४ / २००२ उतारा व

| | रु. पैसे |
|---|---|
| लिखाणाबद्दल फी | १०.०० |
| मजकूर फी | २.१५ |
| एकूण | १२.१५ |

| अनुक्रमांक | हक्काचा प्रकार | परिणाम झालेले भूमापन क्रमांक आणि पोट हिस्से | ज्याने तपासणी केली त्याची आद्याक्षरी |
|---|---|---|---|
| १३५ | तारीख २२।१०।६४ इ. सालमाने : बाबूराव दाखल केलेल्या जमिनीचे खातेदार बाळकू शुभाना साळवी हे तारीख २१।०।६४ रोजी मयत झाले कारण त्यांना वारस मुलगे (१) मारुती बाळकू साळवी वय वर्षे २४ (परागंदा) (२) ज्ञानदेव बाळकू साळवी वय वर्षे १८ (३) संभाजी बाळकू साळवी वय वर्षे १५ (४) [illegible] बाळकू साळवी वय वर्षे १२ व मुली (५) [illegible] सखाराम कुमार रा. [illegible] (६) [illegible] बाळकू साळवी वय वर्षे १६ व बायको बायांबाई भ्र. बाळकू साळवी असे असून दुसरे कोणी नाहीत व मुले नं. २,३,४ व मुली न. ? ही अज्ञान असून त्यांचे पालन पोषण मीच आहे आम्ही सर्वजण एकत्रात राहात असोन व मयताचे नांवे असलेले उत्पन्नास इ.कु.पू. म्हणून आपले नांव दाखल होणे बा बायांबाई भ्र बाळकू साळवी हिने वर्दी तारीख २४।१०।६४ ची दिले वरून मयताचे ठिकाणी इ.कु.पू. म्हणून बायाबाई भ्र बाळकू साळवी हिचे नांव दाखल करून नोंद ता.न. | २२२<br>२४२<br>एकूण दोन<br>२ | वर्दी घातली पान नं. ३ मा. ६४-६५ साले ह्याचा पुरावा खाते दार सादरी बायकाबाई भ्र बाळकू साळवी हिचे नांव इ.कु.पु. म्हणून खातेदार सदरी व मार हक्का (१) संभाजी (२) [illegible] (३) [illegible] (४) [illegible] यांची नांवे मार हक्का दाखल [illegible] ता. २४।१०।६४ सही ता. नि. ३५ |

सबंध हिस्सा [illegible] मंडळ [illegible] तलाठी

१---१५ न. पै.

५ / ४ / २००२

खरी नक्कल

तहसिलदार [illegible]

# प्रकरण:१०
# निष्कर्ष व शिफारशी

आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प ऑक्टोबर २००० पासून प्रलंबित असून प्रलंबनाची प्रमुख कारणे प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन, पुनरस्थापन व प्रकल्पबाधीत शेतजमीनी आणि इतर मालमत्तांच्या मोबदल्यांशी निगडीलत आहेत. एकूणच प्रकल्पबाधीतांचे भविष्य व जीवनमान आणि उदरनिर्वाहाचा प्रश्न उपस्थित झाल्याने मौजे उत्तूर, होन्याळी, करपेवाडी, वडकशिवणे, महागोंड, हालेवाडी व आर्दाळ येथील प्रकल्पबाधीतांनी सातत्याने आपला विरोध दर्शविल्यामुळे प्रकल्पाचे काम गेली वीस वर्षे प्रलंबित आहे. या विरोधामुळे प्रकल्पाची इतर कामे जरी पूर्ण झाली असली तरी घळभरणीचे काम पूर्ण करून प्रकल्पात पाणी अडवीने बाकी असल्याने व सततच्या विलंबामुळे प्रकल्पाचा व्ययसुद्धा अनेकपटींनी वाढून २३० कोटी रूपयांपेक्षा जास्त झाला आहे. मौजे उत्तूर, होन्याळी, करपेवाडी, वडकशिवणे, महागोंड, हालेवाडी व आर्दाळ येथील येथील शेतजमीनी प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात जावून या सर्व / बहुतांशी शेतकरी असलेल्या कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर असल्यामुळे या सर्व कुटुंबांचा प्रकल्पास विरोध असल्याचे कारण म्हणजे त्यांच्या मालमत्तेचा योग्य मोबदला व आदर्श पुनर्वसनाची मागणी असे आहे. या सर्व बाबींचा शास्त्रोक्त अभ्यास होवून उभयपक्षी (सरकार व प्रकल्पबाधीत) मान्य तोडगा निघण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागात आम्ही प्रस्तुत अभ्यास करून हा अहवाल सादर करत आहोत. अभ्यास अहवालाच्या या प्रकरणात आम्ही आमच्या अभ्यासावर आधारित प्रमुख निष्कर्ष व शिफारशी करत आहोत.

आंबेओहोळ मध्यम सिंचन प्रकल्प ता. आजरा, जिल्हा कोल्हापूर हाहिरण्यकेशी नदीखोऱ्यातील मौजे (उत्तूर, होन्याळी, करपेवाडी, वडकशिवणे, महागोंड, हालेवाडी) आर्दाळ या गावानजीक बांधण्यात येत आहे. सदर प्रकल्पाचे बांधकाम ७५ टक्के पूर्ण

झाले असून यामध्ये जलरोधीचराचे सर्व काम पूर्ण झाले आहे तसेच भरावाचे काम पूर्ण झाले असून घळभरणीचे काम प्रस्तावितआहे.

१. प्रकल्पग्रस्त कुटुंबाची पाहणी तसेच गटचर्चा केल्यानंतर त्यांच्या अडचणी समजून घेणे शक्य झाले. तसेच प्रकल्पग्रस्तांपैकी अनेक प्रतिनिधींनी लेखी स्वरुपात केलेल्या सूचना प्राप्त झाल्या आहेत. या सर्व सूचनांमधून पुनर्वसन, पर्यायी जमिनी, वनसंपदेचे मूल्यांकन, पुनर्वसनाच्या समस्या इत्यादीविषयक अनेक अडचणी अद्यापही असल्याने प्रकल्पग्रस्तांच्या मनात असमाधानाची भावना असल्याचे निष्पन्न झाले.

२. प्रकल्पग्रस्तांना दिला जाणारा मोबदला हा पर्यायी जमीन,घरासाठी भूखंड तसेच त्यांची मालमत्ता उदा. फळझाडे व वनसंपदा इत्यादींचेमूल्यांकन करून त्यांना देय असलेल्या मोबदल्यासंदर्भात पुढील बाबी निदर्शनास आल्या.

३. राष्ट्रीय जल आयोगाच्या अहवालानुसार राज्यातील मध्यम आणि मोठ्या पाटबंधारे प्रकल्पांच्या जल उपयोग क्षमतेची राष्ट्रीय जल उपयोग क्षमतेशी तुलना केली तर अत्यंत असमाधानकारक किंवा किमान पातळीवर असल्याचे दिसून येते.

४. महाराष्ट्र जल व. सिंचन आयोगाच्या (सन १९९९) अहवालानुसार सन १९३० पर्यंत राज्यातील गोदावरी, तापी व कृष्णा खोऱ्यात पाण्याचा तुटवडा अधिक प्रमाणात भासू शकतो. एकंदरीत काय तर महाराष्ट्राची कृषी व जल अर्थव्यवस्था एकंदरीतच अकार्यक्षम राहिल्याचे सिध्द होते.

५. महाराष्ट्रात जवळजवळ ३०२ प्रकल्पांची कामे गेली १५ वर्षे सुरु अथवा अर्धवट अवस्थेत अपूर्ण आहेत. या सर्व प्रकल्पांच्या प्रकल्पबाधीतांच्या पुनर्वसनात अक्षम्य दिरंगाई झाल्यामुळे प्रकल्प व्ययात ४२८ टक्के इतकी वृध्दी झाल्याचे दिसून येते.

६. पूर्वीच्या प्रकल्पबाधीतांचा अनुभव चांगला नसल्याने संभाव्य प्रकल्पबाधीत शेतकरी सहजा सहजी जमीन देण्यास तयार होत नाहीत. जमिन अधिग्रहण,मूल्यांकन व पुनर्वसनकामी सरकारचा महसूलविभाग जबाबदार असतो. परंतु जलसिंचन आणि महसूल विभागातील अधिकाऱ्यांचे अनेक बाबींवर एकमत होत नसल्यामुळे याकामी अधिकच विलंब झाल्याची उदाहरणे सर्वश्रुतआहेत. लोकशाही व्यवस्थेत प्रकल्पातील राजकीय हस्तक्षेप शक्यतो टाळला जात नाही. नव्हे तशी अपेक्षाही करणे योग्य नाही. अनेकदा राजकीय अनुनयापोटी मूळ प्रकल्पाची क्षमता नंतरच्या टप्प्यावर वाढवून अधिक पिकक्षेत्र लाभक्षेत्रात सामाविष्ट करण्याकरिता राजकीय हस्तक्षेप होतो. परिणामे प्रकल्प खर्च आणि पुरनवसनाची समस्या गंभीर स्वरुप धारण करुन प्रकल्पपूर्तीस अक्षम्य विलंब लागतो. अशी अनेक उदाहरणे देता येतील. तत्सम समस्येपासून सरदार सरोवर प्रकल्पही अलिप्त राहू शकला नाही.

७. अनेकदा तर जलसिंचन प्रकल्प आणि औद्योगिकीकरणाकरिता भूमि अधिग्रहण केलेल्या प्रकल्प बाधितांना मुलभूत रोजगाराच्या संधी अथवा पर्यायी जमिनी न मिळाल्याने त्यांना स्थलांतर करुन शहरी झोपडपट्टी व दारिद्र्याचे जीवन जगावे लागले.पर्यायने सरकाराला न्याय्य विस्थापन व पुनर्वसन धोरणाचा मसुदा तयार करण्याची निकड भासली व साधारपणे सन १९८० च्या दशकात भारत सरकारने सर्व प्रकल्पबाधीतांच्या न्याय्य पुनर्वसनाकरिता विचार करणे सुरु केले.

८. सन १८९४ च्या कायद्यांतर्गत प्रकल्पबाधितांच्या पुनर्वसनाची कोणतीही जबाबदारी सरकारवर असत नव्हती. कारण सन १८९४ च्या ब्रिटीश कायद्यात भूमि अधिग्रहण, प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन व पुनरस्थैर्याच्या बाबतीत जबाबदारीचे उत्तरदायीत्व सरकारवर नव्हते. परंतु अशा उत्तरदायीत्वाची जबाबदारी सन २०१३ च्या राष्ट्रीय पुनर्वसन धोरणामुळे सरकारवर व पर्यायाने प्रकल्प विभागावर आली. इतकेच नव्हे तर या धोरणाअंतर्गत प्रकल्पबाधितांना पुनर्वसनाबरोबरच योग्य

मोबदला देण्याचीही जबाबदारी संबधित राज्य अथवा केंद्र सरकारच्या प्रकल्प विभागावर देण्यात आली.

९. जमीन अधिग्रहणावरून भारत तसेच इतर आशियायी देश व आफ्रिकी देशांतही अनेक तंटे उद्‌भवले (Cao et.al. 2008, FAO 2009). भारतातील प्रमुख उदाहरणात पश्चिम बंगालमधील नंदिग्राम, सिंगूर (Maitreesh Ghatak et.al. 2010) आणि महाराष्ट्रातील नवी मुंबईचा महा मुंबई विशेष आर्थिक क्षेत्र व गोवा विशेष आर्थिक क्षेत्र (Dhanmanjiri Sathe 2016) इत्यादींचा समावेश करावा लागेल.

१०. राष्ट्रीय नमुना पाहणी (NSSO 2005) २००५ च्या अहवालानुसार एकूण ४० टक्के शेतकऱ्यांना शेती व्यवसाय नकोसा झालेला आहेच. या प्रमाणात नंतरच्या काळात वाढसुद्धा झाली असणार (Dhanmanjiri Sathe 2016). याचे प्रमुख कारण कृषी क्षेत्रावरील संकटात सापडते. अशावेळी शेतकऱ्यांना जर जमिनीच्या मोबदल्यात योग्य रक्कम अथवा पर्यायी जमीन आणि रोजगाराच्या संधी निर्माण करून दिल्या तर ते निश्चितपणे आपली शेतजमीन देण्यास तयार होतात असेही दिसून आले आहे.

११. न्यून मूल्य धोरणामुळे शेतकऱ्यांचा जमिन अधिग्रहणास विरोध असतो हे प्रामुख्याने समजून घेणे आवश्यक आहे. जमीन अधिग्रहणास शेतकऱ्यांचा विरोध असण्याचे आणखी महत्त्वाचे कारण म्हणजे संबंधित व त्या आजूबाजूच्या जमिनींचे प्रकल्पोपरांत होणारे मूल्य भांडवलीकरण होय (Value Capitalization). कारण जमीन अधिग्रहण करताना जरी संबंधित जमिनीची किंमत कमी असली तरी प्रकल्पपूर्तीनंतर त्या जमिनीच्या व आजूबाजूच्या जमिनींच्या किंमती अनेकपट वाढतात. आणि अशा जमीन मूल्य भांडवलीकरणाचा फायदा मूळ जमीन मालकास मात्र होत नाही.

१२. अनेकदा तर जलसिंचन प्रकल्प आणि औद्योगिकरणाकरीता भूमी अधिग्रहण केलेल्या प्रकल्पबाधीतांना मूलभूत रोजगाराच्या संधी अथवा पर्यायी जमिनी न मिळाल्याने प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांना स्थलांतर करून शहरी झोपडपट्टी व दारिद्र्याचे जीवन जगावे लागले.

१३. देशातील बहुतांश सिंचन प्रकल्पांच्या प्रकल्पबाधित क्षेत्रांचा अथवा गावांचा विचार केला तर असाच अनुभव आहे की सिंचन प्रकल्पबाधित गावे व क्षेत्र ही आदिवासी, दूर ग्रामीण अशा स्वरूपाची असतात. पर्यायाने बहुतांशी सर्व सिंचन प्रकल्पांच्या पुनर्वसनाचा इतिहास समाधानाचा नाहीच अशाच नोंदी सापडतात.

१४. सिंचन प्रकल्पाचे प्रकल्पबाधित हे ग्रामीण दूरदरास भागातील किंवा आदिवासी शेतकरी असल्यामुळे त्यांच्या पुनर्वसनाकडे सहजपणे दुर्लक्ष करणे शक्य आहे असाच काहीसा प्रशासकीय व राजकियच नव्हे तर सिंचन प्रकल्प लाभधारक शेतकऱ्यांचाही समज झाल्याचे दिसून येते.

१५. सर्व गावांमधील शेतकऱ्यांची पिकपद्धती समान असून त्यात भात, भूईमूग, सोयाबीन, मिरची, ऊस व इतर भाजीपाल्यांच्या पिकांचा समावेश असल्याचे आमच्या निदर्शनास आले. या सर्व गावांची पिकपद्धती एकसमान व शक्यतो मुबलक पाण्याची निकड (भात, ऊस इत्यादी) असलेल्या पिकांचा समावेश असल्याचे कारण म्हणजे कोल्हापूर जिल्ह्याचा हा पश्चिम भाग असून कोकणाशी जोडलेला व कोकणसदृश्यच आहे. येथील वार्षिक सरासरी पर्जन्यमान साधारणपणे १३०० ते १५०० मिमी इतके प्रचंड असल्याने या भागातील नदया व ओढे शक्यतो वर्षभर प्रवाही असतात. त्यामुळे या भागातील पिकपद्धतीत भात व ऊसाचा समावेश असल्याचे दिसून येते.

१६. पर्जन्यमान व त्यामुळे शक्य असलेल्या पिकपद्धतीखालील जमिनी आंबेओहोळ प्रकलपाच्या बुडित क्षेत्रात येत असल्यामुळे संबंधित प्रकल्पबाधितांचे उत्पादक

व आर्थिक पुनर्वसन करताना विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. अन्यथा या प्रकल्पबाधितांवर अन्याय संभवतो.

१७. संपूर्ण सात गावातील एकूण ८६८ शेतकरी कुटुंबांची कमीअधिक प्रमाणात अशी एकूण ३७४.०८ हेक्टर इतकी जमीन प्रकल्पबाधित होत असल्याने या सर्व प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना त्यांच्या बाधित जमिनीच्या मोबदल्यात जमीन किंवा प्रचलित बाजारभावाच्या चारपट वित्तीय स्वरूपात मोबदला आदा करणे आवश्यक आहे.

१८. प्रकल्पबाधितांना त्यांच्या गावापेक्षा अधिक असे नेतृत्व लाभले नसल्याने त्यांचे पुनर्वसनविषयक प्रश्न सरकार दरबारी मांडण्याकरीता त्यांना इतरांवरच अवलंबून रहावे लागणार आहे.

१९. एकूण शिधापत्रिकांचे पांढरी (१३.८४ टक्के), पिवळी (३८.४२ टक्के) आणि भगवी (४५.२० टक्के) असे विवरण पहावयास मिळते. भगवी शिधापत्रिका असणाऱ्यांचे अधिक प्रमाण आपणास प्रकल्पबाधितांच्या बेताच्या आर्थिक परिस्थितीची कल्पना करून देते.

२०. बहुतांशी कुटुंबांनी (५४.९६ टक्के) नोकरीचे स्वरूप प्रकट केले नाही याचे प्रमुख कारण म्हणजे मुंबईत स्थलांतरीत झालेले बहुतेक सदस्य असंघटित क्षेत्रात कार्यरत असल्याने तसे सांगणे त्यांना अप्रस्तुत वाटते. अर्थात याचा उल्लेख त्यांनी सापनि अभ्यासगटाबरोबरच्या खाजगी चर्चेद्वारा केला. उर्वरित स्थलांतरीतांच्या रोजगार व स्थलांतर ठिकाण आदीवर सारणी ११ मध्ये उल्लेख केला आहे.

२१. प्रकल्पबाधितांच्या उत्पादक पुनर्वसनाचा प्रश्न सरकारी अनास्थेमुळे अधिक गंभीर स्वरूप धारण करतो कारण त्यांचे प्रतिनिधित्व सशक्त नसते.

२२. सर्व प्रकल्पबाधित कुटुंबांच्या एकंदरीतच सर्व सामाजिक व आर्थिक लक्षणांवर दृष्टिक्षेप टाकता असेच लक्षात येइल की बहुतांशी प्रकल्पबाधित अत्यंत सामान्य

स्वरूपाचे जीवनमान जगतात आणि शेती व्यवसायाव्यतिरिक्त इतर उत्पादनाची साधने त्यांच्याकडे नाहीत.

२३. बहुतांशी प्रकल्पबाधितांकडे शेती औजारांची उपलब्धता नाही असेच दिसून आले. अर्थात याचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांची अल्पभूधारक स्वरूपाची धारणक्षमता आणि बेताची आर्थिक स्थिती. बहुतांशी सर्वेक्षित प्रकल्पबाधितांनी औजारे मालकीसंबंधीच्या प्रश्नाचे उत्तर दिले नाही. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांच्याकडे ही औजारे नाहीत. तसे ते खाजगीत कबूल करतात. परंतु संबंधित प्रश्नाचे उत्तर टाळतात.

२४. प्रकल्पबाधितांना एकरी सत्तावीस (२७) लक्ष रूपये प्रमाणे एकतर्फी किंमतीची घोषणा केल्याचे वाचनात आले. परंतु अशी किंमत प्रकल्प विभागाने कशी निश्चित केली याचा तपशील समजू शकला नाही. अर्थात अशी अंदाजे किंमत निश्चिती २०१३ च्या ‘‘भूमी अधिग्रहण, पुनर्वसन आणि पुनरनिवास’’ कायद्यातही अपेक्षित नाही.

२५. अधिक पर्जन्यमानाचा परिसर असल्यामुळे वृक्ष लागवडीपेक्षा बहुतांश फळझाडे व वनझाडे आपोआप आलेली आहेत असे सापनि अभ्यासगटास प्रत्यक्ष सर्वेक्षणावेळी अनुभवास आले.

२६. प्रकल्पबाधितांच्या वार्षिक कृषि पाणीपुरवठ्याच्या सुविधांचा आढावा घेता बहुतांशी शेतकरी पावसाच्या पाण्यावर निर्भर अशा स्वरूपाची (८७.६१ टक्के) शेती कसत असल्याचे दिसून येते. विहीर (३.६६ टक्के) किंवा बोअरवेल (५.३५ टक्के) अत्यंत कमी प्रमाणात आहेत.

२७. विहीरीकरीता या भागातील सरासरी भूजलपातळी ८४.०५ फूट तर बोअरवेलकरीता २२०.७७ फूट इतकी खोल असल्यामुळे त्याकामी लागणारा खर्च प्रचंड असल्यामुळे तो प्रकल्पबाधितांच्या आवाक्याबाहेर आहे.

२८. प्रकल्पबाधितांकडे पावसाच्या पाण्याव्यतिरिक्त पाणीपुरवठ्याचे इतर मार्ग उपलब्ध नसल्यामुळे पाईपलाईनसारख्या पायाभूत सुविधाही असणे शक्य नाही. त्यामुळे अत्यल्प प्रमाणात (०९.५५ टक्के) प्रकल्पबाधितांकडे काही प्रमाणात पाईपलाईनची सुविधा असल्याचे दिसून येते.

२९. एकूण आर्थिक परिस्थिती बेताची असल्यामुळे स्थलांतरीत असंघटित रोजगाराच्या उत्पनावर अधिक प्रमाणात निर्भर असल्याचे दिसून येते.

३०. एकंदरीत आर्थिक परिस्थितीवर विचार केला तर अनुभवाअंती सापनि अभ्यासगटास असेच निदर्शनास आले की या सर्व प्रकल्पबाधितांची आर्थिक परिस्थिती सामान्य असल्याने त्यांच्याकडील कृषि जमिनी कुटुंब उदरनिर्वाहासाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत.

३१. बिगर कृषि व्यवसाय आकडेवारीचे निरीक्षण करता अनेक प्रतिसादकांनी या प्रश्नाचे उत्तर टाळले आहे. कारण त्यांच्याकडे तसा काही व्यवसाय नसल्याने संबंधित प्रश्नाचे उत्तर प्रकल्पबाधितांनी टाळले.

३२. विविध प्रकारच्या कर्जांपैकी काही कर्जांच्या थकबाकीचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते. कर्ज हेतूनुसार थकबाकीचे प्रमाण; पीक कर्ज – ३२.९०, खावटी कज – ४७.६१, ट्रॅक्टर – ७३.३३, जमीन दुरूस्ती – ६०.६०, म्हैस खरेदी कर्ज – ३२.५१ आणि मळणी यंत्र खरेदी कर्ज –६०.०० टक्के असे निदर्शनास येते. कर्ज परतफेडीच्या अडचणींमुळे थकबाकीची समस्या देशभरातील शेतकऱ्यांसमोर आहेच. त्याचीच पुनरावृत्ती आंबेओहोळ प्रकल्पग्रस्तांच्याबाबतही दिसून आली.

३३. पुनर्वसनकामी ताठर भूमिका घेवून प्रकल्पव्ययात अनाठायी वाढ होवू देण्याऐवजी शासनाने जर सुरूवातीसच प्रकल्पबाधितांच्या मोबदला/जमिन किंमतविषयक मागण्या मान्य केल्या तर प्रकल्पाचा विरोध कमी होवून संबंधित प्रकल्प वेळेत

पूर्ण होण्यास मदत होईल. आणि प्रकल्पबाधितांना दिलेल्या अधिकच्या मोबदल्यापेक्षा प्रकल्प वेळेत पूर्ण होवून त्यापासून प्राप्त लाभ निश्चितपणे अधिक असतील.

३४. आंबेओहोळ प्रकल्पबाधितांपैकीही अनेक शेतकऱ्यांना शेती व्यवसाय बंद करण्याचीच इच्छा आहे. अर्थात शेती व्यवसाय बंद करण्याची काही कारणे त्यांनी नमूद केली आहेत व ती शेती व्यवसाय तोट्यात चालतो (७७.३४ टक्के), अती कष्टाचे काम परंतु त्याबदल्यात मिळणारा अत्यल्प मोबदला (८.७८ टक्के) तरूणपिढीचे शेतीक्षेत्राकडे दुर्लक्ष (७.३७ टक्के) आणि कृषि व्यवसाय किंवा शेतकऱ्यास समाजात किंमत नाही (४.८२ टक्के) याप्रमाणे नमूद केलयाची दिसून येतात.

३५. जमिनींच्या वाढत्या किंमतीमुळे प्रकल्पबाधन मोबदल्यात प्रकल्पबाधित जमिनीइतकी जमीन खरेदी करता येणे कदापि शक्य नाही असे वाटते व ते निश्चितपणे सत्य आहे. कारण प्रकल्पबाधनामुळे परिसरात जमिनीची मागणी वाढल्याने किंमती वाढतात व त्यामुळे प्रकल्पबाधितांना जर त्यांच्या ''जमिनीच्या मोबदल्यात जमिन'' मिळाली नाही तर मिळणाऱ्या पैशाच्या मोबदल्यात पुन्हा जमीन खरेदी शक्य होत नाही.

३६. बंद पडलेले प्रकल्पाचे काम पुन्हा सुरू करताना शासनाच्या प्रकल्प विभाग, महसूल विभाग आणि पोलीस कर्मचारी व अधिकाऱ्यांनी प्रकल्पग्रस्तांना दिलेल्या वर्तणुकीमुळे आणि केलेल्या अन्याय व अत्याचारामुळे बहुतांश (७७.०५ टक्के) प्रकल्पबाधित शेतकरी कुटुंबे प्रकल्प कामासंबंधी असमाधानी आहेत.

३७. २०.९६ टक्के प्रकल्पबाधितांना प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर त्यांना कोणत्याही रोजगार संधी उपलब्ध होणार नाहीत असे वाटते. कारण प्रकल्पोपरांत सर्व फायदे प्रकल्प लाभक्षेत्रातील लोकांनाच होणार असल्याने प्रकल्पबाधितांना त्याचा काहीही लाभ संभवत नाही असेच वाटते.

३८. सुरूवातीपासूनच प्रकल्पाचे काम कधीही नियमितपणे सुरू नसल्यामुळे प्रस्तुत प्रकल्पबाधितांच्या प्रकल्प कामावरील रोजगाराविषयीच्या अपेक्षा संपुष्टात आलेल्या आहेत हे एक; आणि दोन म्हणजे प्रकल्प कामावर शक्यतो मानवी श्रमाऐवजी यांत्रिक श्रमाचाच वापर होत असल्यामुळे प्रकल्प आणि प्रकल्पबाधित यांच्यात कोणतेही रोजगारविषयक संबंध निर्माण होवू शकले नाहीत हे वास्तव आहे.

**सारांशतः**

प्रकल्प पूर्तीनंतर मिळणारा लाभ हा प्रकल्प खर्चापेक्षा अधिक असून तो या भागासाठी रोजगार उत्पन्न व राहणीमान वाढवणारा तसेच पीक प्रणालीत सकारात्मक बदल करणारा असेल. त्यामुळे याकरिता प्रकल्पग्रस्तांचे समाधानकारक पुनर्वसन होणे गरजेचे आहे.

# प्रकरण:११

# ताजा कलम (Post Script)

नवीन आर्थिक धोरणाच्या अंमलबजावणीनंतर देशात अनेक खाजगी व सार्वजनिक प्रकल्प हाती घेवून विकास प्रक्रिया गतीशील करण्याचे प्रयत्न करण्यात आले. त्याचा एकंदरीत परिणाम देशाच्या विकास/वृद्धी दरावर दिसून आला. परिणामे खुल्या व्यापार धोरणाच्या अंमलबजावणीच्या पहिल्या टप्प्यात औद्योगिक व एकंदरीतच विकासदर झपाट्याने वाढला. या सर्व प्रक्रियांना गती देताना जे अनेक प्रकल्प हाती घेण्यात आल (उदा. विशेष आर्थिक क्षेत्रे, औद्योगिक महामंडळांचा विस्तार, बहुउद्देशीय सिंचन/जलप्रकल्प, बहुपदरी महामार्ग, शहर व निवासी परिसर विस्तार.....इत्यादी)अशा सर्व प्रकल्पांकरीता विविध राज्यांत हजारो हेक्टर शेतजमीनींचे संपादन करण्यात आले. परंतु जमिन संपादन करताना संबंधित शेतकऱ्यांच्या रोजगार पुनर्वसनाकडे दुर्लक्ष झाल्याने देशात आर्थिक दरी निर्माण होवून ती सतत वाढत असल्याचे गेल्या अडीच दशकांच्या (२५ वर्षे) काळात निष्पन्न झाले. परिणामे शेतकरी वर्गाने कधी संघटित तर अनेकदा असंघटित स्वरूपाचे लढे उभारले. प्रामुख्याने हे लढे आर्थिक व निवासी पुनर्वसन आणि भूसंपादन मोबदला इत्यादीसंदर्भात असल्याचे दिसून येते. महाराष्ट्रातील मुंबई-नागपूर समृद्धी महामार्ग व रत्नागिरी जिल्ह्यातील तीन लक्ष कोटी रूपये गुंतवणुकीचा तेलशुद्धीकरण प्रकल्पाविरोधात तेथील शेतकऱ्यांनी उभारलेले लढे याची ज्वलंत उदाहरणे आहेत. प्रस्तुत प्रकल्पविरोधामुळे महाराष्ट्र शासनाने भूसंपादन मोबदल्याविषयीचे बाजारमूल्याच्या चारपट मूल्य धोरण बदलून समृद्धी महामार्ग विस्थापित जमिन मालक शेतकऱ्यांना प्रती एकर किमान एक कोटी रूपये (१ कोटी) मोबदला देण्याची तयारी दर्शविली. नाणार तेलशुद्धीकरण प्रकल्पाबाबतही राज्य शासनाने असेच धोरण स्विकारण्याची तयारी दर्शविली असल्याचे दिसून आले. नाणार प्रकल्प मार्गी

लावण्यासाठी राज्य शासनाने सामाजिक परिणाम निर्धारण अहवाल तयार करण्याचे काम गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्था, पुणे यांचेकडे सोपविले होते.

उपरोल्लेखित प्रकल्प अथवा प्रकल्पबाधीत शेतजमिन मूल्यांकनाविषयी राज्य सरकारने घेतलेल्या भूमिकेकडे अंगुलीनिर्देश करता असे निष्पन्न होते की ज्या ठिकाणी प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांचा विरोध तीव्र आहे अशा ठिकाणी राज्य सरकार जमिन मूल्याचा पुनर्विचार करून शेतकऱ्यांचा विरोध होणार नाही अशा प्रकारचे मूल्य निर्धारण करते असे दिसून येते. या सर्व बाबींचा व प्रस्तुत अभ्यासगटाने प्रत्यक्ष क्षेत्रभेटीतून अवलोकन केलेल्या बाबींवरून प्रकल्पनिहाय मोबदला, जमिन मूल्यांकन, कमाल जमिन धोरण इत्यादी भिन्न असल्याचे स्पष्ट होते.

**परिणामे;**

